
सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २३१ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# काँग्रेसने महिला विकासाचे वाटोळे केले: नेहा बग्गा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ नोव्हेंबर**

७० वर्ष संत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेस पक्षाने या देशातील महीला विकासाचे वाटोळे केले परंतु अवघ्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखंड हिन्दुस्थानातील तमाम महीलांचा सन्मान केला. महीलांचे सबलीकरण केले. त्यांचा आत्मसन्मान वाढवला त्यामुळे आपल्या महीलांचा अधिकारीक सन्मान व्हावा त्यांना बळ मिळावे यासाठी होत असलेल्या लोकसभा निवडणूकीत आणि विधानसभा निवडणूकीत भाजपा महायुतीचे उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन मध्येप्रदेशातील भाजपाच्या नेता नेहा बग्गा यांनी केले.

नांदेड लोकसभेचे भाजपाचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या प्रचारासाठी नांदेड शहरातील शिवनगर, रणजितसिंघ यात्री निवास यासह नांदेड उत्तर आणि दक्षिण भागातील नेहा बग्गा यांनी महीला मतदारांशी संवाद साधला. या प्रसंगी त्या बोलत होत्या.

पुढे बोलतांना नेहा बग्गा म्हणाल्या भाजपा सरकारमुळे देशाचा सर्वांगीण विकास होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा सरकारने महीलांसाठी हगनदारी मुक्ती केली. चुलीच्या धुरा पासून मुक्ती देण्यासाठी उज्वला गॅस योजना राबवली. पंतप्रधान आवास योजनेतून पक्के घर दिले, आर्मी



मध्ये तरूणींना देशसेवेची संधी दिली. शिक्षण, औद्योगीक, तंत्रज्ञान, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात उभारी घेण्यासाठी बळ दिले. बेटी बचाव बेटी पढाव पासून ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने पर्यंत केवळ आणि केवळ महीलांच्या उन्नतीसाठी योगदान केले आहे. असे असतांना आपल्या नांदेड लोकसभा मतदारसंघाचा खासदार आपला नव्हता. जर आपला खासदार असता तर आपल्याला अधिकचा निधी खेचून आला असता. आता पुन्हा संधी आली आहे. या संकल्पात सहभागी होण्याची त्यसाठी येत्या २० नोव्हेंबरला कमळ या निशानी समोरील बटन दाबून डॉ. संतुकराव हंबर्डे यांना खासदार म्हणून संसदेत पाठवा आणि गतीमान नांदेडचे विकासाचे साक्षीदार व्हा. असे आवाहन ही नेहा बग्गा यांनी केले.


## खर्च निरीक्षकानी केली द्वितीय तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ नोव्हेंबर**

भोकर मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी १२ नोव्हेंबर रोजी केली. यावेळी काही उमेदवार तर काही उमेदवारांचे प्रतिनिधी हजर होते.

गुजरात कॅडरचे २००९ बॅचचे आयकर विभागाचे वरिष्ठ अधिकारी मयंक पांडे हे सुरत येथे आयकर विभागात अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. त्याच्याकडे भारत निवडणूक आयोगाने नांदेड जिल्ह्यातील किनवट, हदगाव , भोकर, नांदेड उत्तर व नांदेड दक्षिण या विधानसभा क्षेत्राचे खर्च निरीक्षक म्हणून जबाबदारी सोपविली आहे. मयंक पांडे (आयआरएस) व त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा परिषद नांदेडचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना हे आहेत. खर्च निरीक्षक मयंक पांडे यांनी १२ नोव्हेंबर रोजी उमेदवाराच्या खर्चाची द्वितीय तपासणी करुन मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा भोकरचे तहसिलदार विनोद गुंडमवार, सहायक खर्च निरीक्षक मारोती फुलारी, खर्च विभागाचे पथक प्रमुख पी. व्ही. गोविंदवार, दिपक गवलवाड व बालाजी वाकडे यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### व्हॉइस ऑफ मीडियाच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी डॉ. गणेश जोशी यांची निवड

**नांदेड**-जागतिक पातळीवर ४३ देशात पत्रकारांसाठी काम करणाऱ्या ३ लाख ९० हजार सदस्य संख्या असणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकाराच्या नांदेड जिल्हा पदाधिकारी निवड प्रक्रिया निवडणुकीच्याद्वारे पार पडली. या निवडणुकीमध्ये डॉ. गणेश जोशी यांची जिल्हाध्यक्ष म्हणून निवड झाली. तर बाकी पदाधिकारी यांच्यामध्ये कार्याध्यक्षपदी बाळासाहेब पांडे, उपाध्यक्षपदी तुकाराम सावंत व रवींद्र कुलकर्णी, सचिवपदी अनिल पाटील धमने, सहसचिवपदी सुरेश आंबटवार, कोषाध्यक्षपदी सूर्यकुमार यन्नावार, महानगराध्यक्षपदी नागोराव भांगे पाटील, जिल्हा संघटकपदी ऋषिकेश कोंडेकर, सहसंघटकपदी ज्योती सरपाते, जिल्हा कार्यकारिणीपदी मनोज बुंदेले, श्रीधर नागापूरकर, एस.एम.मुदखेडकर, शरद काटकर, सुनील जोशी, भगवान सूर्यवंशी, प्रवीणकुमार सेलुकर, आनंद सावंत, राज्यपाल गायकवाड, सिद्धार्थ तलवारे, राजपाल चिखलीकर यांची निवड करण्यात आली. गेल्या एक महिन्यापासून व्हॉईस ऑफ मीडियाच्या नांदेड जिल्हा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता या निवडणुकीमुळे नांदेड जिल्ह्याची संपूर्ण कार्यकारणी बरखास्त झाली होती. व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी भारतामधल्या संपूर्ण राज्याच्या निवडणुका होणार असे जाहीर केले होते, त्यानुसार सर्वप्रथम प्रदेश कार्यकारिणीची निवडणूक संपन्न झाली होती, त्यानंतर महाराष्ट्रामध्ये सर्वप्रथमच जिल्हा कार्यकारणीच्या निवडणुकीमध्ये नांदेड जिल्ह्याने प्रथम क्रमांक मारून ही निवडणूक प्रक्रिया अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडली. एकूण ८२ टक्के मतदारांनी आपल्या पसंतीच्या उमेदवारांना पसंती क्रमांक १ ते २१ असे क्रम देऊन मतदान केले. ही मतदान प्रक्रिया सुरळीत राबविण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून प्रदेश उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ व सीए सुरेश शेळके यांनी काम पाहिले. नांदेड जिल्ह्याच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, सरचिटणीस दिगंबर महाले, कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर, विजय चोरडिया, मंगेश खाटीक व मराठवाडा विभागीय अध्यक्ष सतीश रेंगेपाटील यांनी अभिनंदन केले.

### शनिवारी भोकर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची तृतीय तपासणी

**नांदेड**-८५ भोकर मतदारसंघातील उमेदवारांची निवडणूक खर्चाची तीसरी तपासणी उपविभागीय अधिकारी कार्यालय सभागृह, भोकर येथे शनिवार १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ या कालावधीत होणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्दे शित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे. तपासणीस अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असतील तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल यांची नोंद घ्यावी.

### मन्मथअप्पा बेताळे यांचे निधन

**नांदेड**-सिडको येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव तथा नांदेड येथील भारत विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक मन्मतअप्पा



बाबुराव बेताळे यांचे गुरूवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास वृद्धापकालाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी दुपारी १ वाजता वीरशैव लिंगायत स्मशानभूमी नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या या दुःखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात विद्यानिकेतन शाळा हडकोच्या मुख्याध्यापिका सौ. विनया बेताळे, सहशिक्षिका क्षमा बेताळे, श्वेता दलाल ह्या तीन मुली यांच्यासह एक मुलगा प्रसाद बेताळे, जावाई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीला सिडको, हडको तसेच शिक्षणक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# किनवट विधानसभेची लढत दुहेरीच; तीरंगी झाल्यास...?

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १४ नोव्हेंबर**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ०८३-किनवट मतदारसंघ निवडणुकीसाठी वैध ३१ उमेदवारांमधून कापून, छाटून व माघार घेत निवडणुकीच्या मैदानात जरी १७ उमेदवार एकमेकांविरुद्ध दंड थोपटत आव्हानात्मक डरकाळी फोडत असले तरी, किनवट विधानसभेचा आजवरच्या निवडणुकीचा इतिहास डोकावून बघितले असता याठिकाणी केवळ आणि केवळ दुहेरी लढत झाली असल्याचे निवडणुक आकडेवारीचे पुरावे सांगतात. खरेतर या मतदारसंघाला आजपर्यंत त्या तीसरा कौन चे उत्तर मिळालेच नाही. विद्यमान आमदार भीमराव केराम आणि माजी आमदार प्रदीप नाईक यांना निवडणुकीत आव्हान देऊ शकणारा उदयास आला नव्हता.

त्यामुळेच उभयतांचेच आलटून



पालटून राजकीय वर्चस्व या मतदारसंघात राहीले असल्याचे उघड सत्य आहे.असे असले तरी,यावेळी मात्र यंग जनरेशनचे नेतृत्व करणारे अपक्ष उमेदवार सचिन नाईक नावाच्या एका वादळाच्या सुनामी एण्ट्रीमुळे यंदाची निवडणूक ही तिरंगी होण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत असली तरी,ही निवडणूक टी-ट्वेंटी नसून, पाच वर्षांनंतर होणारी पाचवर्षासाठीच्या वर्चस्वाची कसौटी मॅच असून,येथे सचिन नाईक सारखे धमाकेदार एंट्रीकरणारे आरंभशूर टिकत नसतात तर राजकारणाच्या बाऊन्सी पिचवर जम बसलेले अनुभवी फलंदाजच शेवटपर्यंत टिकून राहत मॅचविनर ठरतात.आणि म्हणून किनवट विधानसभेची निवडणूक ही आजजरी तिहेरी वाटत असली तरी मात्र, शेवटच्या टप्प्यात ती खऱ्याअर्थाने महायुतीच्या भाजपाचे विद्यमान आमदार भीमराव केराम विरुद्ध महाविआच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) चे माजी आमदार प्रदीप नाईक या दोन तुल्यबळ पारंपारिक प्रतिस्पर्धीमध्येच होणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ असल्याचा अंदाज राजकीय वर्तुळातून वर्तविण्यात येत आहे.

परंतु,लोकसंख्येच्यादृष्टीने समसमान असलेल्या आदिवासी व बंजारा या दोन समाजातील जवळपास प्रत्येकी ६० हजार मतांची मोट आदिवासी जमातीचे उमेदवार केराम तर बंजारा समाजातील उमेदवार प्रदीप नाईक हे आपल्या झोळीत कशी बांधतात यावरच या दोघांचे निवडणुकीतील भवितव्य अवलंबून आहे. आदिवासी जमातीचे उमेदवार वंचितचे डॉ.आमले व अपक्ष उमेदवार विजय खुपसे हे आदिवासी जमातींच्या गलेगठ्ठ मतांची विभागणी करण्यात यशस्वी होतील का? यावर राजकीय वर्तुळातून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.तर आजपर्यंतच्या निवडणुक इतिहासात तिसऱ्या क्रमांकावर राहणाऱ्या उमेदवाराला प्रदीप नाईक यांच्या मतांच्या अर्ध्या आकड्यापर्यंत देखील पोहचता आलेले नाही.परंतू, यावेळी बंजारा समाजातीलच सचिन नाईक नावाच्या एका वादळाच्या तडाख्याने माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या पुढे मोठे आव्हान उभे केले असून,जर या तीघांत तीरंगी लढत झाली तर,यात ते बंजारा मतांची विभागणी करण्यात यशस्वी होत अधिक इतर मित्रमंडळींचे मते मिळवून स्वत: विजयश्री खेचून आणत यशोशिखरावर पोहोचतात कि, प्रदीप नाईक व सचिन नाईक यामध्ये बंजारा मतांची विभागणी होऊन प्रदीप नाईकांना जोरदार फटका देतात आणि केराम यांच्या सलग दुसऱ्यांदा निवडून येण्याचा मार्ग मोकळा करतात याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# नायगांव विधानसभेत किंगमेकर अल्पसंख्याक समाजाची निर्णायक भूमिका!

## नेत्यांच्या नव्हे विकासाच्या बाजूने धर्माबादचा अल्पसंख्याक समाज

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १४ नोव्हेंबर**

नायगांव विधानसभा निवडणुकीत रणधुमाळी रंगली असून यंदाच्या निवडणूकीत महायुती,महविकास आघाडी व अनेक पक्षाने आप आपले उमेदवारी जाहीर केल्याने नायगांव विधानसभा खूप रंगणार असल्याचे दिसत आहे.

महायुती कडून भाजपाचे विद्यमान आमदार राजेश पवार तर महाविकास आघाडीकडून कंग्रेस पक्षाने डॉ.मिनल खतगावकर व वंचित ने डॉ.माधव विभुते यांना निवडणुकीच्या मैदानात उतरले आहे. गेल्या पाच वर्षापासून भरमसाठ निधी या मतदार संघात खेचून आण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असणारे एकमेव आमदार म्हणजे राजेश पवार यांच्याच नाव चर्चे त असून नायगांव विधानसभेत होणाऱ्या निववडणुकित अल्पसंख्याक समाजचा पाठिंबा कोणाला मिळेल हा एक महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे नायगांव विधानसभेत आता किंग मेकरच्या भूमिकेत असलेला अल्पसंख्याक समाज निर्णायक ठरणार आहे.

यंदाच्या नवडणुकीत नायगांव विधानसभेत महायुतीचे उमेदवार आमदार राजेश पवार आणि माहविकास आघाडीचा डॉ.मीनल खातगावर यांच्यात थेट सामना होत आहे.कांग्रेस पक्षाने आयता उमेदवार नायगांव विधानसभेत दिला असल्याचे मतदारसंघात बोलले जात आहे.तर एकीकडे भाजपा ने आपले नायगांव विधानसभेत विद्यमान आमदार राजेश पवार यांनी आपल्या कार्यकाळात निधीचा वर्षाव करून आपली धमक निर्माण केली आहे. विशेष म्हणजे मुस्लिम समजासाठी भरीव निधी देण्यात आले असून मुस्लिम समजाच्या इतिहासात आज पर्यंत एवढी भरघोस निधी कोणत्याही आमदाराने दिली नाही त्यामुळे धर्माबादच्या अल्पसंख्याक मुस्लिम समाज आता जागी झालेला असून आम्ही कोणत्या पक्षाचे व कोणत्याही नेत्याचे बांधील नसून जे मुस्लिम समजाचे प्रगतीसाठी व त्यांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करेल विकासाच्या बाजूने धर्माबाद चा अल्पसंख्य मुस्लिम समाज निर्णायक भूमिका घेतली जाणार आहे. नायगांव विधानसभेतील ही निवडणूक विकासाच्या मुद्यांवर केंद्रित राहणार असल्याचे एकमताने अल्पसंख्याक समाज एकवटला आहे.

नायगांव विधानसभा निवडणुकीच्या पर्श्वभूमीवर सर्व समाज आप आपल्या संघटनांना बळकट करत होते.मुस्लिम समाजाने एकजुटीचा प्रदर्शन करून अनेक वेळा राजकीय ताकद दाखविण्याचा प्रयत्न केला, मात्र मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी समाजाच्या हिताची काळजी न करता स्वतः स्वार्थाचा विचार करत राजकारण केल्याची चर्चा समाजात होत आहे.ये नेत्यांनी समाजाची परवा न करता स्वतः ची दुकान चालू करण्यावर भर दिला.असा आरोप समाजातील काही जाणकारांनी केला आहे. या निवडणुकीत गेल्या पाच वर्षात ज्यांनी अल्पसंख्याक मुस्लिम समाजाला भरघोस निधी मिळाला असून आता अल्पसंख्याक सामाज जागी झाला आहे या निवडणुकीत पक्षाच्या व नेत्याचा बाजूने नसून विकासाच्या बाजूने उभा राहील असे अल्पसंख्याक मुस्लिम बोलून दाखवत आहे.

# ग्रामीण भागात रोजगार नसल्याने बेराजगारीत वाढ : गंगाधर भांगे

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १४ नोव्हेंबर**

राष्ट्रीय समाज पक्षाचे ध्येय धोरणाचा अजेंडा घेवून जिल्ह्यातील ग्रामीण भागातला सुशिक्षित तरुणाला ग्रामीण भागात रोजगार मिळत नसल्याने राज्यात तरुणाईची बेरोजगारी संख्या वाढत चालली आहे.तर दुसरीकडे युती शासना कडून शेतकऱ्याच्या मालाला योग्य हमी भाव मिळत नाही. बँकिंग क्षेत्रात कर्तव्यावर असताना शासनाच्या नाबार्ड या सारख्या अनेक योजना ग्रामीण भागातील अनेक तरुणांना मंजूर करून त्यांना रोजगार मिळवून दिला आहे. यापुढे ही समाजातील उपेक्षित घटकांना न्याय देवून विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने माझा यापुढे प्रयत्न राहणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाने गंगाधर तुळशीराम भांगे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

१६ नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे राष्ट्रीय समाज पक्षाचे अधिकृत उमेदवार गंगाधर तुळशीराम भांगे यांच्या उपस्थितीत निवडणुकीच्या प्रचारार्थ नरसी येथील नुरी फंक्शन हॉल मध्ये बुधवारी पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजले असुन त्यातच नांदेड जिल्ह्यातील खा.वसंतराव चव्हाण हे दिवंगत झाल्यामुळे भारतीय निवडणूक आयोगा च्या आदेशान्वये राज्यातील विधानसभा निवडणुकी सह १६ नांदेड लोकसभेची पोट निवडणूक लागली असून. त्या अनुषंगाने राज्यातील राष्ट्रीय समाज पक्षाने गंगाधर तुळशीराम भांगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. युती सरकारच्या काळामध्ये मानवी जिवनातील अत्या वश्यक वस्तूची वाढलेली महागाई यासारखे ज्वलंत समस्यांचे निराकरणासाठी राजकारणातून समाज कारणाचा वसा हाती घेण्याचा संकल्प केला आहे. त्यामूळेच राष्ट्रीय समाज पक्षातून उमेदवारी घेऊन १६ नांदेड लोकसभा पोट निवडणुकीच्या मैदानात उतरलो आहे. जिल्ह्यातील सुजाण मतदाराकडून मला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यावेळी गंगाधर भांगे यांनी राष्ट्रीय समाज पक्षाची भूमिका सविस्तर पणे मांडत असताना सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून समाजाला संदेश दिला.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार गंगाधर तुळशीराम भांगे, उत्तमराव वाडीकर, स्वरा मराठे, विद्याताई गिरी, नांदेड जिल्हा शहराध्यक्ष अशोक मगरे, देगलूर तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन कडलवार, उपाध्यक्ष बंटी काळे, तालुका उपाध्यक्ष विजय कोकणे, नागनाथ कोकणे, माधव चन्नावार, प्रकाश कोत्तेवार, नितीन राजुरे, ओमकार निलंगे, मारुती शिरगिरे, राजू मदने हाणमंत कडलवार, नागनाथ उग्यमवार, राजू वाडीकरसह आदिची उपस्थिती होती.

# ब्राम्हण समाजाने प्रतापराव चिखलीकर यांच्या सोबत राहावे : डॉ लव्हेकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १४ नोव्हेंबर**

राष्ट्रहित आणि समाजहित समोर ठेउन महायुतीला मतदान करणे आवश्यक आहे सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणाऱ्या नेतृत्वाला बळकट करण्याची गरज आहे देशाचे पंतप्रधान मोदीजी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र यांच्या नेतृत्वा बळकट करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार .प्रतापराव पाटील चिखलीकर याच्या सोबत समाजांने राहवे त्यांना विजयी करावे असे आवाहन ब्राम्हण समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक लोह्याचे भूमिपुत्र डॉ लक्ष्मीकांत लव्हेकर यांनी केले आहे.

लोहा शहरातील श्री.परशुराम मंदिरात ब्राह्मण महासंघाची महत्वाची बैठक डॉ.लक्ष्मीकांत लव्हेकर यांच्या अध्यक्षतेत पार पडली. महाराष्ट्र राज्य ब्राह्मण महासंघाचे उपाध्यक्ष अविनाश जोशी ब्राह्मण महासंघाचे तालुका अध्यक्ष संजय मक्तेदार, उपाध्यक्ष विजय तावडे,सचिव पेनुरकर, शिरीष मालक, अशोकराव शेवडीकर व बहुसंखेने सदस्य उपस्थित होते.

समाज बांधवांना संबोधित करताना



डॉ लव्हेकर यांनी प्रतावरव पाटील यांना निवडून देणे किती आवश्यक आहे हे सांगितले तसेच या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचे नेतृत्व बळकट करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील यांना ब्राह्मण समाजाने पूर्ण ताकद उभी करावी व निवडून द्यावे असे आवाहन डॉ लक्ष्मीकांत लव्हेकर यांनी केले आहे उमेदवार .प्रतापराव चिखलीकर यांच्या समर्थनार्थ लोहा येथे झालेल्या ब्राह्मण महासंघाने आपली भूमिका जाहीर केली.

# इज्जत करतो, अन्यथा सुपडासाफ करू: सुजात आंबेडकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १४ नोव्हेंबर**

विधानसभा २०२४ प्रचार सभेत वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार फारूक अहमद व लोकसभा पोट निवडणुकीच्या अविनाश भोसीकर यांच्या प्रचार सभेत तरुणाचे आयकॉन असलेले सुजात आंबेडकर विरोधकावर कडाडले आमच्या थोडी शराफत आहे म्हणून तुमची इज्जत करतो अन्यथा तुमचा सुपडा साफ करण्यास क्षणाचाही वेळ लागू देणार नाही.

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विधानसभा २०२४ च्या निवडणूक प्रचार सभेत दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सिडको येथील गुरुवार बाजार मैदानावर मतदार बांधवांना संबोधित करताना तरुणाचे आयकॉन सुजात आंबेडकर यांनी प्रस्तापितांवर व विरोधकावर हल्लाबोल करताना वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर त्यांचे बरे वाईट चितणाऱ्या हरामखोरांना त्यांची जागा दाखवून देऊ



असे म्हणाले पुढे बोलताना ही निवडणूक केवळ विजयाची नसून हरामखोरांना धडा शिकवण्याची आहे पण आमच्या थोडीफार शराफत आहे म्हणून तुमची इज्जत करतो अन्यथा जर आम्ही अवकातीवर उतरलो तर संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात उमेदवारीची लाईन लावून तुमची नशा उतरू टाकू असे मत युवकांचे आयकॉन सुजाता आंबेडकर यांनी सिडको येतील प्रचार सभेला संबोधित करताना म्हणाले.नांदेड दक्षिण मतदार संघातील विधानसभेचे उमेदवार फारूक अहमद व लोकसभेचे उमेदवार अविनाश भोसेकर यांच्या प्रचारार्थ सभेस दक्षिण मतदार संघातील परिवर्तनवादी मतदार राजा मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस व सबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सो. श्वेता अश्विन जैस्वाल रा. चिखलवाडी, नांदेड ता.जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौजे पांगरी तर्फे असदवन ता.जि.नांदेउ ग्रामपंचायत हद्दीतील शेद गट नं. २५६ व २५७ च्या एकत्रीत लेऑउट पैकी गट नं.२५७ मधील अंबिका हिल्स डायमंड मधिल एक प्लॉट नंबर नाही. ज्याचा नंबर डी/११४ आहे. ज्याची लांबी पुर्व पश्चिम १२.२० तर रुंदी दक्षिण उत्तर ९.१५ मी. आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १११.६३ चौ.मी. आहे. ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पुर्वेस - ६.०० मी. रुंद रस्ता आहे, पश्चिमेस - नंबर डी/११९ आहे, दक्षिणेस - नंबर डी/११३ आहे, उत्तरेस - नंबर डी/१५५ या चतु:सिमेच्या आतील प्लॉट मी दत्तात्रय नरोजी बारसे रा.धनगरवाडी ता. जि. नांदेड यांनी खरेदी करण्याचा सौदा केला आहे. बयाणा पोटी काही रक्कम दिली आहे. तरी सदरील प्लॉटबाबत कोणास काही, उजर, आक्षेप मालकी हक्क असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत लेखी कागदपत्रासह आक्षेप दाखल करावा मुदत संपल्यानंतर कोणाचाही उजर, आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**जाहीर प्रगट देणार**
**दत्तात्रय नरोजी बारसे**
**रा.धनगरवाडी ता. जि. नांदेड**
**मो. नं. ९७६६४१६९९२**

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १५ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २३१ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गती, प्रगती, ऐक्य, सुरक्षेसाठी महायूती हाच पर्याय! : पंतप्रधान

### आरक्षण हिसकावून घेण्याचा काँग्रेस, मविआचा कट

नवी मुंबई, १४ नोव्हेंबर : दलित, मागासवर्गीयांमध्ये फूट पाडून, त्यांना परस्परांशी संघर्ष करावयास लावून त्यांचे आरक्षण हिसकावून घेण्याचा काँग्रेस व महाविकास आघाडीचा कट असून महाराष्ट्राची जनता हा कट राज्यात यशस्वी होऊ देणार नाही. गती, प्रगती, ऐक्य, सुरक्षेसाठी महायुती हा एकच पर्याय आहे. केवळ विकास आणि जनहित हा महायुतीचा संकल्प असून तो पूर्ण करण्यासाठी महायुतीला पुन्हा एकदा संधी द्या, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी खारघर येथील जाहीर सभेत बोलताना केले. महाराष्ट्राला देशाच्या प्रगतीचा आधार बनविण्यासाठी एक व्हा, महाराष्ट्राच्या विकासात आम्ही कोणतीही कसूर ठेवणार नाही, अशी ग्वाही देखील पंतप्रधानांनी दिली. या सभेवेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, खा. सुनील तटकरे, खा. श्रीरंग बारणे, महायुतीचे उमेदवार गणेश नाईक, प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, मंदाताई म्हात्रे, महेश बालदी, आ.विक्रांत पाटील आदी उपस्थित होते.

भाषणाच्या प्रारंभी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाला नम्र प्रणाम करून पंतप्रधान मोदी यांनी आपल्या जुन्या स्मृतीस उजाळा दिला. पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून पक्षाने माझी निवड केली, तेव्हा मी रायगडावर छत्रपतींना वंदन करून त्यांचे आशीर्वाद घेतले होते, असे सांगून आपल्या सुमारे अर्धा तासाच्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी स्वराज्यातील छत्रपतींच्या सुराज्याचा संकल्प सिद्ध करण्याची ग्वाही दिली. जेव्हा गरीब सक्षम होईल, तेव्हा सुराज्य स्थापित होईल, आणि हे काम केवळ भाजपाच करू शकते, असे ते म्हणाले. काँग्रेसने 'गरीबी हटाओ' ची घोषणा देत गरीबांनाच लुबाडले. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांनंतरही देशातील गरीब जनता अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करत राहिली. गेल्या दहा वर्षांत आम्ही ही स्थिती बदलली. २५ कोटी लोकसंख्या गरीबीतून बाहेर पडली. चार कोटी गरीबांना पक्की घरे, १२ कोटी गरीबांना शौचालये देऊन जगण्याची प्रतिष्ठा बहाल केली. जलजीवन मिशन अंतर्गत १२ कोटी घरांत नळाचे पाणी पोहोचविले. आज देशातील प्रत्येक व्यक्तीचे बँक खाते आहे, आणि सामान्य



मजूरदेखील मोबाइलवरून 'युपीआय' द्वारे पैशाचे व्यवहार करू शकतो. देशातील दलित, आदिवासी, मागासवर्गीय, वंचित समाज हे या योजनांचे सर्वात मोठे लाभार्थी आहेत. महायुती सरकारची धोरणे ही त्यांची शक्ती बनली आहे. काँग्रेसने गरीबांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले. आजही गरीबांच्या कल्याणाच्या, नागरिकांच्या सुविधांना काँग्रेस विरोध करते. देशातील ८० कोटी जनतेला मोफत धान्य दिले जाते. रायगड जिल्ह्यातील सुमारे १८ लाख लोकसंख्येस याचा लाभ मिळत आहे, याची काँग्रेस व आघाडीस पोटदुखी आहे. गरीब गरीब राहिले तर पुन्हा सत्ता मिळेल या आशेमुळे अशा कामालाही त्यांचा विरोध आहे, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. घुसखोरांनाही स्वस्त सिलिंडर देण्याची घोषणा काँग्रेसच्या एका नेत्याने झारखंडमध्ये केली आहे. अशा लोकांना सत्तेची संधी देऊ नये, असे ते म्हणाले. मतासाठी काँग्रेस देशाच्या सुरक्षिततेशी, भविष्याशी घातक खेळ खेळत आहे, त्यामुळे गरीबांचे शत्रू असलेल्या काँग्रेसच्या वोट बँकेच्या राजकारणास रोखण्याची तुमची जबाबदारी आहे, असे आवाहन श्री. मोदी यांनी केले.

महाराष्ट्रातील महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षांत केलेल्या अनेक जनहितकारी योजनांचा पूर्ण तपशीलच यावेळी पंतप्रधानांनी सादर केला. नवी मुंबई विमानतळ, वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग, मुंबई किनारी मार्ग, द्रुतगती मार्ग, पनवेल कर्जत रेल्वेमार्गाचे दुपदरीकरण आदी कामांमुळे महाराष्ट्राची प्रतिमा आणि भविष्य उजळत आहे. रायगड जिल्ह्यात विकासाची नवी गाथा लिहिली जात आहे. ३० हजार कोटींची गुंतवणूक करून आशियातील दुसऱ्या क्रमांकाचे डेटा सेंटर पार्क आणि कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र रायगड जिल्ह्यात बनत आहे. कळंबोलीत सेंटर ऑफ एक्सलन्स बनत आहे. पनवेलमध्ये सेमि कंडक्टर उद्योगात मोठी गुंतवणूक होऊ घातली आहे. पालघर, जेएनपीटी बंदरांमुळे विकासाचे नवे मार्ग खुले होत असून हे क्षेत्र म्हणजे भविष्यातील संधींचे नवे केंद्र बनेल, व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, आणि महाराष्ट्र हे विकसित भारताचे सर्वात महत्वाचे ग्रोथ इंजिन ठरेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. सागरी संपत्ती आणि सागरी अर्थव्यवस्थेला आणि मच्छीमार बांधवांना बळ देण्यासाठी आमचे सरकार विविध योजना आखत आहे, असेही ते म्हणाले. ४५० कोटींच्या गुंतवणुकीतून कोकणात तीन नवी बंदरे निर्माण होत आहेत. यामुळे मच्छीमारांचे जीवनमान उंचावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## राज्यात ३ दिवस शाळा बंद; मुख्याध्यापकांच्या हातात निर्णय

मुंबई : महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने राज्यात १८ ते २० नोव्हेंबर असे सलग तीन दिवस राज्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात येण्याविषयीचा प्रस्ताव देण्यात आला होता. शाळांना सुट्टी जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. आता या प्रस्तावावर शासनाने उत्तर दिलं आहे. या प्रस्तावानुसार, राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीतपणे पार पडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणं शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावरुन घ्या. तसंच आवश्यक त्या सूचना द्याव्यात, असं सांगण्यात आलं आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाने शाळांना सुट्टीचा प्रस्ताव दिला होता. त्याला सरकारने मान्यता देत, शाळांना सुट्टी द्यावी की नाही हे अधिकार मुख्याध्यापकांना दिले आहेत. त्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक आपल्यानुसार आपल्या शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय घेऊ शकतात, असं शासनाकडून सांगण्यात आलं आहे.

## ऐतिहासिक शिवाजी पार्कवरील सभेसाठी मनसेची बाजी

मुंबई, १४ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा सोमवारी (१८ नोव्हेंबर) सायंकाळी थंडावतील. त्यामुळे प्रचाराच्या टप्प्यातील अखेरच्या रविवारची सभा हे प्रत्येक पक्षासाठी महत्त्वाची असणार आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईतील ऐतिहासिक शिवाजी पार्क मैदानावर सभा घेण्यासाठी सर्वच पक्षांमध्ये रस्सीखेच असते. यंदा मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे हे आग्रही होते. यासाठी दोन्ही पक्षांकडून मैदानाची परवानगी मिळण्यासाठी अर्ज करण्यात आला होता. मात्र यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने बाजी मारली असून त्यांना परवानगी देण्यात आली आहे. पण असे असले तरी १७ नोव्हेंबर हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतिदिन आहे. त्यामुळे कट्टर शिवसैनिकांसाठी या दिवसाला वेगळंच महत्त्व आहे. अशावेळी शिवतीर्थावर बाळासाहेबांच्या स्मारकावर अभिवादनासाठी मोठी गर्दी होत असते. तर यंदा या दिवशीच शिवतीर्थावर राज गर्जना होणार असल्याने, या सभेकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

उद्धव ठाकरे गटाच्या आधी मनसेकडून यासाठी परवानगी अर्ज केला गेला होता. त्यामुळे नियमानुसार ही परवानगी देण्यात आल्याचे सांगितले गेले आहे. मात्र सभा आणि स्मृतीदिन या दोन्ही गोष्टी एकाच वेळी आणि एकाच दिवशी येणार असल्याने राज्यभरातून शिवसैनिक मोठ्या संख्येने येथे येतील. त्यामुळे अभूतपूर्व गर्दीची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी पोलीस आणि प्रशासन यांची विशेष कसर असणार आहे.

बाळासाहेबांच्या स्मृतिदिनी शिवतीर्थावर होणारी उद्धव ठाकरेंची सभा आता बीकेसी मैदानावर घेण्याचं पर्यायी नियोजन आधीच केल्याची माहिती आहे. त्यामुळे राज ठाकरे अमित ठाकरेंसाठी आणि उद्धव ठाकरे वरुण सरदेसाई यांच्या प्रचारार्थ त्यांच्या मतदारसंघात सभा घेताना दिसून येतील. एकाच दिवशी दोन ठाकरी तोफा वाजणार असल्याने सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे लागले आहे.

## शेअर ६१ हजारांनी पडला पण विकताही येत नाहीय

मुंबई : काही दिवसांपूर्वी तुम्ही स्वप्नवत वाटणारी बातमी वाचली असेल. एका कंपनीचा ३ रुपयांवर असलेला शेअर रातोरात सव्वा दोन लाखांवर पोहोचला. ३ रुपयांचे लाखो रुपये करणारा शेअर आपणही घेतला असता तर, असेही अनेकांना वाटले होते. हा शेअर त्यानंतरही वाढून ३,३२,३९९ रुपयांवर गेला होता. सव्वा दोन लाख झाल्यानंतर तो वाढतच होता. अनेकांनी यातही हात साफ करून घेतले. पण आता यात पैसे गुंतविलेल्यांवर अशी वेळ आलीय की त्यांना सांगताही येत नाहीय.

गेल्या पाच दिवसांत एश्रलळव खर्पींशिींशपीं डींव हा शेअर ६१ हजारांनी पडला आहे. या शेअरमध्ये गुंतवणूकदारांचे पैसे अडकलेले दिसत आहेत. हा शेअर सतत लोअर सर्किटवर जात असून त्याला कोणी खरेदीदारही मिळत नाहीय. यामुळे गुंतविणाऱ्यांचे पैसे अडकून पडले आहेत.

गुरुवारी या शेअरचा भाव १४ हजार रुपयांनी घसरून २,६९,१७२ रुपयांवर आला होता. हा शेअर खरेदी करणाराच कोणी नसल्याने या शेअरची किंमत घसरण कधी थांबेल

## महाविकास आघाडीचे सरकार येताच महिलांच्या खात्यात दरमहा ३ हजार : राहुल गांधी

नांदेड - काँग्रेस महाविकास आघाडीने नेहमीच महिलांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे आता काँग्रेस महाविकास आघाडीचे सरकार येताच महिलांच्या खात्यात दरमहा ३ हजार रुपये जमा करण्यात येणार असल्याचे आश्वासन खासदार राहुल गांधी यांनी दिले. नांदेड येथे लोकसभा, विधानसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.



यावेळी बोलताना खा. राहुल गांधी म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सर्वप्रथम महिलांच्या खात्यात दरमहा ३ हजार रुपये त्याचबरोबर महिलांना राज्यभर एसटीचा प्रवास मोफत तर शेतकऱ्यांचे तीन लाखाचे कर्ज माफ व शेतकऱ्याचा उत्पादनाला हमीभाव देण्यात येणार आहे. महायुतीचे सरकार फसवे सरकार आहे. या सरकारचा हेतू केवळ संविधान नष्ट करायचा आहे. परंतु काँग्रेसने मात्र नेहमीच संविधानाचे रक्षण केले आहे. काँग्रेसची लढाई विचारधारेची लढाई आहे. महायुती सरकार तथा बीजेपी सरकार धनदांडगे यांच्या हाती असून या सरकारने २५ लोकांचे कोट्यावधी रुपये माफ केले माफ केले आहे. देशात बेरोजगारी, महागाई वाढली आहे. यातअदानी, अंबानीचे नुकसान नाही तर जनतेचे, शेतकऱ्यांचे आणि बेरोजगारांचे नुकसान होत आहे. त्यामुळे महायुतीचे सरकार आल्यानंतर सर्वात प्रथम महिलांचे प्रश्न त्याचबरोबरच रोजगाराचा प्रश्न देखील सोडविण्यात सोडविण्यात येणार आहे. ज्याप्रमाणे महिलांना दरमहा ३ हजार रुपये त्याचप्रमाणे बेरोजगारांना देखील दरमहा ४ हजार रुपये भत्ता देण्यात येणार असल्याचेही यावेळी राहुल गांधी म्हणाले. या सभेस काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसह नांदेड लोकसभा व विधानसभेच्या काँग्रेस महाविकास आघाडीच्या उमेदवारांची उपस्थिती होती.

## पंतप्रधान मोदी उद्या महाराष्ट्रातील १ लाख बूथ प्रमुखांशी साधणार संवाद

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१४नोव्हेंबर : भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात 'माझा बूथ, सर्वात मजबूत' या अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शनिवारी महाराष्ट्रातील भाजपाच्या सुमारे १ लाख बूथ प्रमुखांशी संवाद साधणार आहेत. नमो पच्या माध्यमातून व ऑनलाइन पद्धतीने सकाळी साडेअकरा वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.लोकसभा निवडणुकीत आलेल्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर विधानसभेत पुन्हा बाजी मारण्यासाठी भाजपाने सर्वस्तरावरून जय्यत तयारी केली आहे . आपल्या उमेदवारांना जास्तीत जास्त मतदान व्हावे ,यासाठी हे अभियान राबवले जात आहे.

भाजपाच्या निवडणूक प्रचार मोहिमेला बळ देण्यासाठी आणि बूथ स्तरापर्यंतच्या सर्व

**बूथ प्रमुखांशी संवाद साधण्यास उत्सूक : मोदी**

**भाजपा – महायुतीला प्रचंड मतांनी विजय मिळवून देण्यासाठी पक्षाचा प्रत्येक समर्पित कार्यकर्ता परिश्रम घेत आहे. १ लाख बूथ प्रमुखांशी संवाद साधण्यासाठी मी उत्सूक असल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली आहे.**

कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी पंतप्रधान बूथ प्रमुखांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाद्वारे पक्षाच्या संघटन व्यवस्थेमधील महत्वाचा घटक असलेल्या प्रत्येक बूथच्या प्रमुखांशी संवाद साधत पंतप्रधान निवडणूक प्रक्रीयेतील प्रत्येक कार्यकर्त्याची भूमिका विषद करतील. बूथ पातळीवर पक्षाची पकड अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक निर्देशही देणार आहेत. यावेळी बूथ प्रमुखांना देखील त्यांचे विचार नमो ॲप द्वारे थेट पंतप्रधान मोदी यांच्यापर्यंत पोहोचवता येणार आहे.

## शिवसेना उबाठा गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

### धनंजय मुंडे यांच्या विजयासाठी काम करण्याचा निर्धार

परळी वैजनाथ प्रतिनिधी...

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे विकासपुरुष ना. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाला बळकटी देण्यासाठी आणि विधानसभा निवडणुकीत पुन्हा धनंजय मुंडे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करत शिवसेना उबाठा गटाच्या असंख्य पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

वडार कॉलनी येथील शिवसेना उबाठा गटाचे युवा नेते उमेश देवकर यांच्या नेतृत्वाखाली असंख्य कार्यकर्त्यांनी ना. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आज या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यामध्ये उमेश देवकर यांच्यासह गणेश देवकर, आकाश हलगुंडे, किरण शिंदे, दिनेश धोत्रे, संजय पवार, सोनू देवकर, विशाल देवकर, संदीप चौधरी, मारुती धोत्रे, अरुण देवकर, उमेश देवकर, कृष्णा इटकर, सारांश चव्हाण, महादू देवकर, सुरेश विटकर रवी मंजुळे, विलास पवार, आकाश देवकर, अनिल जाधव, श्रीनाथ चव्हाण, सुभाष कुऱ्हाडे, अविनाश कुऱ्हाडे, सुरेश कुराडे, लक्ष्मण देवकर, नर्सिंग शिंदे, विशाल मते, सचिन चव्हाण, विलास चव्हाण, समाधान धनवटे, गणेश घनवटे, राम मंजुळे, सिराज शेख, सोमनाथ धोत्रे, पिंटू कुऱ्हाडे, गोरख इटकर, अशोक पवार, धोंडीराम पवार जमान शेठ ,संदीप देवकर भारत विटकर, कोणदराबाई देवकर, नंदाबाई शिंदे, अनिता देवकर, संगीता देवकर, रूपाली पवार शशिकला मंजुळे संगीता, पवार, सुरेखा पवार, सरस्वती चव्हाण, सूरया शेख अप्सरा शेख, शबाना शेख, आलीम शेख, निकत शेख, नसीम शेख, अमित सय्यद, मेहरून सय्यद, मुन्ताफ सय्यद, फर्जना शेख, शमी शेख, साबेरा शेख, अफसरबिन शेख, मना शेख, मिनाज शेख, समदानी, सखाबाई माणिक, सुंदराबाई चव्हाण, मंजुरा शेख, निर्मला कुऱ्हाडे, नलिनी कुराडे, निलाबाई धोत्रे, गंगुबाई धोत्रे, कमल पवार, तारामती जाधव, विवेक हुलगुंडे ,अशा धोत्रे वैजंता पवार, समिंदर पवार, अप्सराबाई पवार, सरूबाई धनवडे, चंद्रकला धोत्रे, शकुंतला पवार, पूजा जाधव, सरस्वती चव्हाण, संगीता पवार, शकुंतला जाधव, सूर्यमाला साळुंखे, विठाबाई देवकर, गजाबाई पवार, महानंदा चव्हाण, सुमनबाई देवकर ,सीनाबाई ईटकर आदींनी प्रवेश केला.

## नेवासा मतदारसंघातील अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणूकीचे द्वितीय प्रशिक्षण संपन्न

### मतदान यंत्रण हाताळणी प्रक्रियेची निरीक्षकांनी केली पाहणी

शिर्डी, दि.१४ – नेवासा विधानसभा मतदारसंघातील ६०० मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे द्वितीय प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण सत्रास निवडणूक निरीक्षक अरूणकुमार यांनी भेट देत पाहणी केली. नेवासा येथील रामलीला लॉन्स येथे दुसऱ्या सत्रातील द्वितीय प्रशिक्षण सत्र पार पडले. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संजय बिरादार, नायब तहसीलदार किशोर सानप,



सोनाली मात्रे, समन्वयक अधिकारी विकास थोटे व विशाल यादव आदी उपस्थित होते या प्रशिक्षण सत्रास निवडणूक निर्णय अधिकारी उंडे यांनी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली, टपाली मतपत्रिका, निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे, मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे, सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, मतदान केंद्र उभारणी करणे, अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. ज्ञानोदय इंग्लिश स्कूल येथे प्रत्यक्ष मतदान यंत्र (हँड्स ऑन ट्रेनिंग) हाताळणीचे प्रशिक्षण सत्र पार पडले. प्रशिक्षण सत्रात आतापर्यंत १ हजार ९० कर्मचाऱ्यांनी पोस्टल मतदान केले आहे.

## काही नेत्यांना तमाशा करण्याची सवय : भाजपचा उद्धव ठाकरेंना टोला

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१३ नोव्हेंबर: 'जाऊ द्या काही नेत्यांना तमाशा करण्याची सवयच असते .उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगची तपासणी झाली. पण, त्यांनी ना कोणता व्हीडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली', अशा शब्दात भाजपा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे.

फडणवीस यांच्या बॅगेची तपासणी झाल्याच्या व्हिडिओ भाजपाकडून ट्विट करण्यात आला आहे. त्यासोबत म्हटले आहे की,' ७ नोव्हेंबरला यवतमाळ जिल्ह्यात आमचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांच्या बॅगची तपासणी झाली. पण, त्यांनी ना कोणता व्हीडिओ काढला, ना कोणती आगपाखड केली.

## मत विभाजन टाळा प्रतापरावांच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा : धनंजय मुंडे

नांदेड– जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता आपल्या सोबत सुख दुःखात गेल्या ३०–३५ वर्षापासून तुमच्या परिवाराचा सदस्य म्हणून राहणाऱ्या प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासारख्या लोकनेत्याला बळ देण्याची गरज आहे.

मत विभागनी करून महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मदत होईल अशी कोणतीही भूमिका घेवू नका,मुंडे कुटुंबियांचे राजकीय वर्चस्व राज्यात कायम ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस–महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा आणि प्रतापरावांना विजयी करा असे आवाहन राज्याचे कृषीमंत्री




धनंजय मुंडे यांनी केले.

माळाकोळी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची निर्णायक जाहीर सभा झाली. व्यासपीठावर खा.अजित गोपछडे,उमेदवार माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे,प्रणितताताई देवरे, चिखलीकर,चित्राताई लुंगारे,चित्ररेखा गोरे,देविदास गीते,नाना तिडके,परमेश्वर मुरकुटे,तिडके मामा,बाबुराव केंद्रे,भगवान राठोड,अर्जुन राठोड,चंद्रमुनी मस्के यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कृषी मंत्री धनंजय मुंडे म्हणाले की ही निवडणूक वेगळ्या कारणाने महत्त्वाची होय,जाती–पातीचे राजकारण बाजूला ठेवा,विकासाच्या राजकारणाला साथ द्या,राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे.या सरकारने लाडकी बहीण,शेतकऱ्यांच्या हिताचे कल्याणकारी अनेक निर्णय घेतले आहेत,शेतकरी,कष्टकरी यांच्यासाठी काम करणारे हे सरकार होय.महालक्ष्मी' योजना सांगून महिलांना एक दमडी अनुदान न देणाऱ्या काँग्रेस महाविकास आघाडीच्या अमिषाला बळी पडू नका,अपक्ष उमेदवार निवडून येणार नाहीत त्यामुळे मतविभाजन टाळा.मत विभाजन करून' महाविकास आघाडी विरोधकांचा फायदा होईल अशी भूमिका घेवू नका,मुंडे कुटुंबियांचे सर्व समभावाचे राजकीय वर्चस्व जपा,आम्हाला संपविण्याची भाषा होत आहे हे ध्यानात धरा तुम्ही मतदार आमची ताकद आहात, ती कायम राहावी व प्रतापराव पाटील यांना मतदान करून निवडून द्या अशी भावनिक साद मंत्री धनंजय मुंडे यांनी घातली.

माजी खा. प्रतापराव पाटील यांनी राजकीय संघर्ष तसेच या मतदारांशी असलेले जन्मोजन्मीचे अतूट जिव्हाळ्याचे नाते यावेळी अधोरेखित केले. खा. अजित गोपछडे, प्रणितानाई देवरे,चित्राताई लुंगारे,चित्ररेखा गोरे,भगवान राठोड,धर्माधिकारी यांची भाषणे झाली.

## अग्रलेख...

# मोदींची प्रचारातील रोखठोक विधाने

पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रचारामध्ये उतरले असून त्यांनी अनेक जाहीर सभांना संबोधित करताना मतदारांच्या मनात १०० टक्के मतदानाच्या आवश्यकतेची ज्योत प्रज्वलित करण्याचे काम केले आहे. विकासाचे मुद्दे दामटण्यासाठी डबल इंजीनचे सरकार कसे आवश्यक आहे, यावरही नरेंद्र मोदी प्रकाश टाकत आहेत. महाराष्ट्रातील मतदारांच्या मनाचा ठाव घेताना त्यांनी 'एक है तो सेफ है'चा रोखठोक संदेशही दिला आहे. ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काय करावे लागेल, या मुद्यांकडेही जनतेचे लक्ष वेधले आहे. पंतप्रधान सांगतात त्याप्रमाणे महाराष्ट्राचा विकास करण्याची दृष्टीच महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित केले जायला हवे. महाविकास आघाडीतील नेते खरोखरीच राज्याच्या भल्यासाठी एकत्र आले आहेत की आपल्या परिवाराच्या भविष्याच्या चिंतेने त्यांना एकत्र येण्यास भाग पाडले, हे मायबाप जनता जाणतेच. विकास कामांना ब्रेक लावण्याचे काम मात्र विरोधी पक्षाच्या नेत्यांना चांगलेच जमते. त्यांनी राज्यातील अनेक विकास प्रकल्पांमध्ये आपले उपद्रव मूल्य सिद्ध करून दाखवले आहे. महायुतीच्या अडीच वर्षांच्या सत्तेपूर्वी राज्याची सत्ता महाविकास आघाडीच्याच हातात होती. त्यावेळी त्यांनी विकास कामे अडकवणे, लटकवणे आणि भटकवण्याचेच काम केले. या कामात त्यांनी आचार्य पदवी संपादित केली आहे. वाढवण बंदराचे काम रेंगाळावे, त्याला मान्यता मिळू नये, पर्यावरणीय परवाने मिळताना त्यात अडचणी निर्माण व्हाव्या, विविध कायद्यांच्या कचाट्यात हा प्रकल्प अडकून पडावा, यासाठी महाविकास आघाडीने केलेले प्रयत्न जनता जाणतेच. हा प्रकल्प प्रचंड रोजगाराची क्षमता असल्याचे जाणूनदेखील त्यात अडथळे आणण्याचे काम विकास आघाडीच्या नेत्यांनी केले आहे. एकीकडे महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातेत चालल्याची ओरड करायची, राज्यातील बेरोजगारी वाढत असल्याचा टाहो फोडायचा आणि तिकडे येथे येऊ घातलेल्या प्रकल्पांना मोडता घालायचा, ही कामे वर्षानुवर्षे आघाडीतील तीन घटक पक्षांनी वेळोवेळी केलेली आहे. आघाडीतील नेते भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले आहेत, याबाबत तर राज्यातील जनतेच्या मनात मुळीच शंका नाही. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांच्या नेत्यांची नावे भ्रष्टाचारात आलेली आहेत. त्यांना ईडीच्या चौकशीसाठीसुद्धा उभे राहावे लागले आहे. कुणा भ्रष्टाचारी नेत्याच्या घरून नोटांची बंडले तर कुणाच्या घरून सोन्या-चांदीचे दागिने जप्त होणे, हे आता नवे राहिलेले नाही. आघाडी सरकारमधील नेत्यांवर गृहबांधणी प्रकल्पांमधील भ्रष्टाचाराबद्दलही कारवाई झालेली आपण बघितले आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्येही या पक्षातील नेत्यांची नावे आल्याचे सर्व जाणतात. मात्र, आधी भ्रष्टाचार करायचा, महिलांना अश्लाघ्य भाषेत हिणवायचे आणि सरकारची चौकशी बसली की त्यांच्यावर ईडीचा दुरुपयोग करण्याचा किंवा सीबीआय हा केंद्र सरकारचा बोलका पोपट झालाय म्हणून टिप्पणी करायची, हे कितपत सत्य आहे, याची शहानिशा जनताजनार्दनाने करून घेतली पाहिजे. म्हणूनच या पक्षाचे नेते भ्रष्टाचारात आकंठ बुडाल्याचे मोदी सांगतात, तेव्हा आश्चर्य वाटत नाही.

महाराष्ट्रामध्ये भाजपाच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मोठमोठ्या योजनांना मंजुरी दिलेली आहे. विशेष म्हणजे शिंदे सरकार दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी प्रसिद्ध आहे. अनेक प्रकल्पांना तर इतक्या अत्यल्प वेळेत मंजुरी मिळालेली आहे की, त्यामुळे आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहात नाही. निवडणुकीमुळे मुख्यमंत्र्यांनी पदाचा राजीनामा दिला असला, तरी त्यांनी लागू केलेल्या योजना भविष्यकाळातही सुरू राहणार, याची गॅरंटी राज्यातील जनतेला आहे. लाडकी बहीण योजना ही राज्यातील महिलांना संजीवनी देणारी ठरणार, याबाबत कुणाच्या मनात किंतु-परंतु नाही. ही बाब ध्यानात घेतली जायला हवी. याच सरकारच्या काळात दलितांसाठी अनेक योजना राबविल्या गेल्या; त्या योजनांची इतर राज्यांनीही री ओढली. शेतकऱ्यांना चोवीस तास वीज पुरवठा, हा निर्णय तर बळीराजाच्या जीवनात परिवर्तन आणणारा ठरणार आहे. पंतप्रधान आवास योजनेचेही अनेक जण लाभार्थी ठरलेले आहेत. अनेकांनी पंतप्रधान सूर्यघर योजनेचा लाभ घेऊन आपले विजेचे बिल शून्यावर आणून ठेवले आहे. पूर्वीच्या सरकारमध्ये डिजिटायझेशन नसल्यामुळे लाभार्थींच्या खात्यात विविध योजनांचे पैसे डीबीटी पद्धतीने टाकण्याची सोय नव्हती. पण आता या योजनांचे लाभ त्या-त्या व्यक्ती, समूहाला कुठलाही गैरव्यवहार न करता थेट मिळत आहेत. ईव्हीएम मशीनमध्ये करण्यात आलेल्या सुधारणा निश्चितच स्वागतार्ह आहेत. नागपुरात निर्माण झालेल्या विभिन्न विद्या शाखांच्या अभ्यासाची एक मालिकाच सांगता येईल. शिक्षणाच्या संधींसोबतच त्याच प्रमाणात रोजगाराच्याही संधी मिळाव्या, ही व्यक्त होत असलेली अपेक्षा चुकीची नाही. याबाबत नव्याने प्रयत्न होतील, अशी अपेक्षा करायला हरकत नसावी. तथापि, महायुती सरकारने विकासाची गती दुप्पट केली याबाबत कुणाचे दुमत असायचे कारण नाही. एक्सप्रेस वे, अटल सेतू आणि समृद्धी महामार्गाचे भूमिपूजन करून सरकार थांबले नाही, तर त्या प्रकल्पांची पूर्तताही करून दाखविली. विकास कामांचा निव्वळ डंका पिटायचा नाही तर त्या कामाच्या प्रगतीचा सातत्याने ध्यास घ्यावा, ही पंतप्रधानांनी व्यक्त केलेली भावना अतिशय समर्पक म्हणायला हवी.

पंतप्रधानांनी महाविकास आघाडीतील नेत्यांवर केलेल्या शरसंधानामुळे त्यांना चांगलीच मिरची झोंबलेली आहे. लोकसभा निवडणुकीत एकगठ्ठा मतदानाच्या झालेल्या कटामुळे साऱ्या हिंदूंमध्ये लोकशाहीतील निवडणुकांचे पर्व सुरू असताना नाराजी पसरली आहे. या प्रकाराबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही आघाडीच्या नेत्यांवर टीका केली आहे. देशातील हिंदूंमधील जाती-जमातींमध्ये संघर्ष पेटविण्याच्या इंडिया आघाडीच्या नेत्यांची कारस्थाने यापुढे यशस्वी होणे नाही; त्याविरुद्ध हिंदू समाजानेच आता रान पेटविण्याचे काम सुरू केलेले आहे. महाराष्ट्रात मतांच्या राजकारणापोटी मराठा आणि ओबीसी यांच्यात तेढ निर्माण करण्याचे आणि आगीत तेल ओतण्याचे काम इंडिया आघाडीतील नेत्यांनी केले आहे. मुस्लिम नेत्यांना भडकावून त्यांना भाजपाविरोधात मतदान करण्यास बाध्य करण्यातही ही नेतेमंडळी आघाडीवर होती. 'चारसो पार' झाले तर भाजपाच्या नेतृत्वाखाली सरकार संविधान बदलेल, मुस्लिमांची धार्मिक स्थळे जमीनदोस्त करेल, असा फेक नॅरेटिव्ह चालवला गेला. त्यातूनच मतदारांनी भाजपा-महायुतीविरोधात मते टाकली; ज्यामुळे अनेक उमेदवारांचा पराभव झाला. भाजपाही बहुमतापासून दुरावला. काँग्रेस आणि त्याच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीच्या नेत्यांना दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींची प्रगती सहन होत नाही, ही वस्तुस्थिती आहे, याकडे मोदींनी अंगुलिनिर्देश केला आहे. डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या आरक्षणासाठी प्रयत्न केले, पण पंडित नेहरूंनी त्यांना आरक्षण मिळू नये, यासाठी शिकस्त केली. बाबासाहेबांना आरक्षणासाठी मोठा संघर्ष करावा लागला. इंदिरा गांधींनीही वडिलांच्या पावलावर पाऊल टाकले. राजीव गांधींनी ओबीसी आरक्षणास जाहीर विरोध केला होता, याकडेही पंतप्रधानांनी उपस्थितांचे ध्यान आकर्षित केले. या सर्व बाबी ध्यानात घेता राज्यातील युती सरकारने अनुसूचित जाती, जनजाती आणि भटक्या विमुक्तांसाठी केलेली कामे आणि त्यांच्या उन्नतीसाठी घोषित केलेल्या योजना लोकांचा उत्कर्ष साधणाऱ्या आहेत. युती सरकारने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात केलेली कामगिरी अवर्णनीयच आहे. मोदींनीही त्यांच्या भाषणात हे मान्य केले आहे. राज्यात मेट्रोचा विकास करताना, त्याची गती गेल्या सरकारच्या कितीतरी पट जास्त राहील, याची काळजी घेतली गेली. रस्त्यांच्या विकासाबाबत मोदी सरकारमधील वजनदार मंत्री नितीन गडकरी यांनी बजावलेल्या कामगिरीचे तर संसदेमध्ये सर्वपक्षीय नेत्यांनी कौतुक केल्याचे आपण बघितले आहे. राज्य सरकारने संस्कृतीच्या क्षेत्रातही उत्तुंग कामगिरी बजावलेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने या भाषेच्या विकासासाठी मोठा निधी मिळणार आहे. गोमातेला राजमातेचा दर्जा आणि प्रत्येक गौळाऊ गायीसाठी दररोज ५० रुपयांचे अनुदान हे निर्णयही या सरकारची जमेची बाजू आहे. जातीय संघर्षाबाबत देशातील चिघळत जाणारी परिस्थिती बघता, पंतप्रधानांनी 'एक है तो सेफ है' अशी घोषणा का केली, याचा अन्वयार्थ काढण्याएवढी जनता सुबुद्ध आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# ये वक्फ, वक्फ हैं... वक्फ!

सगळ्या देशात दिवाळीची धामधूम चालू असताना कर्नाटकातून आलेल्या दोन बातम्या लक्ष वेधून घेत होत्या. या दोन्ही बातम्या कर्नाटक वक्फ बोर्ड आणि मालमत्तांशी संबंधित होत्या. पहिली बातमी कर्नाटकच्या विजापूर जिल्ह्यातील होती. विजापूर जिल्ह्यातील शाह अमिनोद्दिन दर्ग्याने जवळजवळ १२०० एकर शेतजमीन आपल्या मालकीची आहे, असा दावा ठोकला. या दाव्याची दखल घेत तेथील तहसीलदारांनी शेकडो शेतकऱ्यांवर नोटिसा बजावल्या. दुसरी बातमी कर्नाटक वक्फ बोर्डाने भारतीय पुरातत्त्व खात्याच्या ताब्यात असलेल्या कर्नाटकातील ५३ ऐतिहासिक वास्तूंवर आपली मालकी असल्याचा दावा ठोकला असल्याची आहे. विजापूरमधील आदिलशाही राजवटीतील गोल घुमट, बारा कमान तसेच बीदर आणि कलबुर्गीचे किल्ले यांसारख्या ५३ मालमत्ता आपल्या मालकीच्या आहेत, असा दावा कर्नाटक वक्फ बोर्डाने ठोकल्याची बातमी डेक्कन हेरॉल्डने दिलेली आहे.

एका अहवालानुसार वक्फकडे असलेल्या नोंदणीकृत अचल मालमत्तांपैकी ७ टक्के मालमत्तांवर अतिक्रमण आहे. २ टक्के मालमत्तांसंबंधी विवाद चालू आहे तर ५० टक्के मालमत्तांची स्थिती कोणालाही निश्चित माहिती नाही. ज्या उर्वरित ५० टक्के जमिनी आहेत त्यातील १७ टक्के जमिनी या कब्रस्तान आहेत. १६ टक्के शेतजमिनीच्या स्वरूपात आहेत, १४ टक्के जमिनींवर मशिदी असून उरलेल्या १३ टक्के जमिनींवर दुकाने आहेत. याचा अर्थ वक्फ बोर्ड आपल्या मालकीच्या म्हणून ज्या अचल संपत्तीवर दावा करते त्यातील ५० टक्के संपत्तीच्या बाबतीत वक्फ बोर्डाकडे कोणतेही ठोस दस्तऐवज किंवा मालकी हक्क प्रस्थापित करू शकतील, असे कागदोपत्री पुरावे नाहीत. पण तरीही वक्फ बोर्ड त्या मालमत्ता आपल्या मालकीच्या आहेत, असे सांगते आहे.

या पृष्ठभूमीवर भारतातील वक्फ कायद्याचा इतिहास पाहिला तर कायद्याच्या कक्षेत सातत्याने वाढच झालेली दिसते. १९१३ च्या इंग्रज सरकारने केलेल्या तरतुदीनुसार कायदेशीर वक्फ विलेख/करारपत्र (डिड) असणे आवश्यक होते. १९२३ मधील तरतुदीनुसार वक्फ विलेख/करारपत्र नोंदणीकृत असणे आवश्यक होते. तर, १९५४ चा स्वतंत्र भारत सरकारने नेहरूंच्या पंतप्रधानपदाच्या काळातील वक्फ कायदा, वक्फ बोर्डाची स्थापना करतो. १९९५ चा सुधारित वक्फ कायदा अचल मालमत्तांच्या मालकी हक्काचे विवाद सोडविण्यासाठी वक्फ न्यायाधीकरणाची स्थापना करतो आणि या न्यायाधीकरणाचे निवाडे अंतिम मानले जातील, असे सांगतो.

आज भारतात अस्तित्वात असलेल्या वक्फ कायद्यानुसार, तीन पद्धतींनी वक्फ किंवा मुस्लिम धर्मदाय संस्था तयार करण्याची मुभा आहे. (१) मालमत्ता तोंडी सूचना देऊन किंवा लेखी वक्फ विलेख तयार करून (२) एखाद्या मालमत्तेचा/जमिनीचा वापर जर दीर्घकाळ मुस्लिम धर्म आणि मुस्लिम धर्मदाय म्हणून करण्यात येत असेल तर (३) वारस न राहिल्याने एखाद्या आधीच अस्तित्वात असलेल्या वक्फला मालमत्ता दान करून. येथे मालमत्तांची कायदेशीर मालकी असलेल्या व्यक्तीकडूनच वक्फ केले जाणे, हे गृहीत धरलेले आहे. मात्र, प्रत्यक्षात तोंडी वक्फ करण्याचे प्रावधान असल्याने तसेच दीर्घकाळ धार्मिक कार्यासाठी वापराचे प्रावधान असल्याने कुठेही, कोणतीही जमीन वक्फची मालमत्ता म्हणता येऊ शकते. सामाजिक न्याय व सशक्तीकरण समितीच्या अहवालानुसार भारतातील बहुतेक राज्य सरकारांनी वक्फ मालमत्तांचे सर्वेक्षणाचे काम अजूनही पूर्ण केलेले नाही. हे सर्वेक्षण वरील कार्यपद्धतीत संपूर्ण जमीन इस्लामची होत नाही तोपर्यंत होऊ शकणार नाही. कारण सध्याच्या वक्फ कायद्यात सुधारणा न केल्यास, इस्लामचे बंदे भविष्यातही नव्या नव्या जमिनी या सतत ताब्यात घेत राहणार आहेत.

आता केंद्र सरकारने जवळजवळ ४० नियंत्रणात्मक सुधारणा वक्फ कायद्यात करण्यासाठी संसदेच्या मागील अधिवेशनात बिल मांडले आहे. अल्पसंख्यक मंत्री किरण रिजिजू यांनी ०८/०८/२०२४ रोजी मागील लोकसभा अधिवेशनात मांडलेल्या 'एकीकृत वक्फ प्रबंधन सशक्तीकरण दक्षता आणि विकास अधिनियम १९९५' मुळे अनेक प्रादेशिक पक्ष व मुस्लिम समाज आज अस्वस्थ झाले आहेत.

वक्फ कायद्यामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. या कायद्याचा मुस्लिम समाज कसा दुरुपयोग करून घेतो आहे, याचेच कर्नाटकातील दोन्ही बातम्या हे ढळढळीत उदाहरण होय. देशाच्या फाळणीच्या वेळेस पाकिस्तानात स्थलांतरित झालेल्या मुसलमानांची मालमत्ता मुस्लिम समाजाच्या धार्मिक वा सामाजिक कार्यासाठीच उपयोगात याव्यात, त्या मालमत्तांना संरक्षण मिळावे या उद्देशाने स्वतंत्र भारतात वक्फ कायदा १९५४ अस्तित्वात आला. त्याचा उद्देश पूर्णतः सफल होऊन आता त्या कायद्याचा मुस्लिम समाज दुरुपयोग करीत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. हे लक्षात आल्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने जिंदाल विरुद्ध राजस्थान वक्फ बोर्ड (संदर्भ : सिव्हिल अपील नंबर २७८८-८९ ऑफ २०२२) या विवादात राजस्थान वक्फ बोर्डाला, तुम्हाला तुम्ही मालकी हक्काचा दावा ठोकत असलेल्या जमिनीच्या मालकी हक्काचा स्रोत, योग्य ती कागदपत्रे सादर करावीच लागतील, असे खडसावत वक्फ बोर्डाच्या विरोधात आणि जिंदाल कंपनीच्या बाजूने निकाल दिला. कोणी तुमच्या दाव्याचा प्रतिवाद केला नाही, आक्षेप घेतला नाही किंवा एखाद्या जमिनीवर तुम्ही मजार, मशीद वा थडगे बांधले म्हणून ती जमीन तुमच्या मालकीची होत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे आपल्या निकालपत्रात नमूद केले आहे.

फाळणीच्या धामधुमीच्या काळात कदाचित वक्फ कायदा पारित करणे गरजेचेही असेल. पण आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळे या कायद्यात काही मूलभूत बदल करणे आवश्यक झालेले आहेत. केंद्र सरकारने याची योग्य दखल घेत या कायद्यात ४० सुधारणा सुचवल्या आहेत. यापैकी सगळ्यात महत्त्वपूर्ण बदल म्हणजे केंद्रीय वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डांवर दोन मुस्लिमेतर, दोन महिला तसेच एक शिया मुस्लिम, एक सुन्नी मुस्लिम आणि एक मागासवर्गीय मुस्लिम असावा. यामुळे मुस्लिम समाजातील सर्वच वर्गातील लोकांना तसेच मुस्लिमेतर या संस्थांवर प्रतिनिधित्व मिळेल. दुसरे म्हणजे वक्फ सर्वेक्षण आयोगाऐवजी जिल्हाधिकारी हे सर्वेक्षणाचे काम करतील. त्यामुळे पूर्वीच्या वक्फ सर्वेक्षण आयोगाचे सगळे अधिकार या संशोधनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात येतील. तिसरे म्हणजे वक्फने मालकी हक्काचा दावा केलेल्या सगळ्या सरकारी मालमत्तांवरील वक्फचा मालकी हक्क संपुष्टात येऊन जिल्हाधिकारी या मालकी हक्कासंबंधात निर्णय देतील. तर, महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणजे वक्फ न्यायाधीकरणाने दिलेले निर्णय अंतिम समजण्यात येणार नाहीत. उलटपक्षी वक्फसंबंधित विवाद थेट उच्च न्यायालयात दाखल करता येतील.

अर्थात वक्फ (म्हणजे धर्मदाय संस्था) आणि वक्फ बोर्ड हे केंद्र आणि राज्य सरकारच्या सामयिक यादीत असल्यामुळे काही राज्य सरकारे यात अनावश्यक ढवळाढवळ भविष्यात निश्चितच करू शकतात. त्यामुळे जर हिंदू समाजाला आपण आणि आपल्या पूर्वजांनी घाम गाळून मिळविलेल्या मालमत्तांचा निर्वेध उपभोग घ्यायचा असेल तर भविष्यात येऊ घातलेल्या प्रत्येक निवडणुकीत वक्फ कायद्यात सुधारणा करून त्याला कायदा आणि लोकशाहीच्या मर्यादांमध्ये ठेवणाऱ्या हिंदुत्ववादी पक्षाच्या पाठीशी एकवटले पाहिजे.

९८८१२४२२२४


## वेध

**नीलेश जोशी**

# तुष्टीकरणाला ठोस उत्तर देण्याची वेळ

'लव्ह जिहाद' शब्दाचा अर्थ आता सर्वांनाच परिचयाचा झाला आहे. या शब्दामागील भयावहता याआधी अनेक घटनांमधून समोर आली. काही घटना समोर आल्या नसल्या, तरी जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या ठरल्याची अनेक उदाहरणे प्रत्येक गावात प्रत्येकाच्या सभोवताली आहेत. केवळ 'लव्ह जिहाद'च नव्हे तर 'लॅण्ड जिहाद'चे संकटही गावोगावी दिसून पडते. हे सर्व कमी की काय म्हणून 'व्होट जिहाद'ची प्रत्यक्ष घोषणा गत लोकसभा निवडणुकीत देण्यात आली. गठ्ठा मतांच्या जोरावर हवे ते घडवून आणण्याचे जोरकस प्रयत्न देशात सुरू असल्याचे चित्र आहे. 'सत्तेसाठी वाट्टेल ते' ही मनोवृत्ती असणाऱ्या राजकीय विचारधारा या प्रयत्न करणाऱ्यांच्या सापळ्यात सुरुवातीपासूनच अलगद अडकतात. मग त्यांना देश, संविधान, आंतरिक सुरक्षा, बाह्य सुरक्षा आदी या कुठल्याही विषयाचे भान राहत नाही. एरवी संविधानाच्या सुरक्षेसाठी टाहो फोडणारी, आम्ही संविधानाचे एकमेव रक्षणकर्ते आहोत, असा आव आणणारी ही राजकीय जमात जेव्हा संविधानाऐवजी धर्मावर आधारित राज्याच्या पुरस्कर्त्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपते. तेव्हा हे समाजाचे, राष्ट्राचे दुर्दैव नव्हे तर काय, असा प्रश्न पडतो.

लोकसभा निवडणुकीच्या एक महिनाआधी समाजवादी पार्टीच्या एका महिला नेत्याने मुस्लिमांनी गठ्ठा मतदान करावे, असे आवाहन करीत त्याला 'व्होट जिहाद'चे नाव दिले होते. महाराष्ट्रात याच पॅटर्नने मतदान झाल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक पुराव्यानिशी केला. धुळे लोकसभा मतदारसंघातील विजयी आणि पराभूत उमेदवाराच्या आकडेवारीवरून या आरोपांमध्ये तथ्य असल्याचे स्पष्ट होते. विधानसभा निवडणुकीचे मतदान अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. पण विधानसभा निवडणुकीत हाच पॅटर्न राबवून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न सुरू असल्याची वेगवेगळी उदाहरणे पाहावयास मिळतात.



पश्चिम विदर्भातील अकोला पश्चिम या जागेवर गत सहा टर्मपासून भाजपा विजयी होत आहे. हा मतदारसंघ भाजपाचा गड आहे. या मतदारसंघात कथित गठ्ठा मतदारांची संख्या मोठी आहे. महाविकास आघाडीच्या काँग्रेसने येथे मुस्लिम उमेदवाराला संधी दिली. पण पक्षातीलच नाराज दुसऱ्या मुस्लिम नेत्याने काँग्रेसचा त्याग करून वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी मिळविली. या प्रकारामुळे गठ्ठा मतदान विभाजित होण्याची भीती निर्माण झाली. मग काय, थेट दिल्लीपासून ते गल्लीतील सारे उलेमा, मौलवी बंडखोरी करणाऱ्या नेत्याच्या एकत्र घरी गेले. बंडखोरी करणाऱ्या त्या नेत्यावर सर्व प्रकारचा दबाव टाकून त्याला 'कौम'साठी उमेदवारी परत घेण्याच्या आणाभाका देण्यात आल्या. अखेर शेवटच्या क्षणी त्या उमेदवाराला रिंगणातून बाहेर पडावे लागले, अशी चर्चा अकोलेकरांमध्ये आहे. विधानसभेच्या एका जागेसाठी थेट दिल्लीसह स्थानिक धार्मिक नेत्यांचा असा पुढाकार 'व्होट जिहाद' निर्विघ्न व्हावा यासाठीच आहे. एकीकडे गठ्ठा मतदान महाविकास आघाडीच्या पदरात पडावे म्हणून विविध प्रयत्न सुरू असतानाच दुसरीकडे दक्षिणेत असलेला केरळ येथील वायनाडच्या पोटनिवडणुकीत प्रियांका गांधी यांनी कट्टरपंथी इस्लामिक संघटन जमात-ए-इस्लामी हिंद यांचा पाठिंबा घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत, असा आरोप येथील डाव्या आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. जमात-ए-इस्लामी हिंदने प्रियांका यांना पाठिंबा दिला असेल आणि त्यांनी तो घेतला असेल तर 'ये रिश्ता क्या कहलाता है' असेच म्हणावे लागेल.

समाजमाध्यमावर विविध बाबी सतत प्रसारित होत असतात. त्यात गत काही दिवसांपासून ऑल इंडिया उलेमा बोर्डद्वारा काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना उबाठा गटाला दिलेले पत्र चर्चेत आहे. या पत्रात १७ मागण्या मांडण्यात आल्या आहेत. त्यातील अनेक मागण्या असंवैधानिक असून काही मागण्या तर देशद्रोहाचे खुले समर्थन करणाऱ्या आहेत. या पत्रासोबतच काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटांच्या प्रदेशाध्यक्षांचे पत्रही प्रसारित होत त्यांनी उलेमा बोर्डाच्या मागण्या मान्य केल्याचे म्हटले आहे. अद्याप काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट किंवा शिवसेना उबाठा यांनी याबाबत आक्रमणपणे भूमिका मांडून आपले मत व्यक्त केल्याचे समोर आले नाही. जर हे पत्र आणि त्याला दिलेले समर्थन खरे असेल तर हा तुष्टीकरणाचा कळस असून या देशघाती राजकीय वृत्तीला मतदानातून राष्ट्रभक्तांनी ठोस उत्तर देण्याची वेळ आली आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# कोण होणार महाराष्ट्राचा मुख्यमंत्री?

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता एक आठवड्यापेक्षाही कमी कालावधी उरला आहे. आजपासून पाच दिवसांनी प्रचार संपेल आणि २० नोव्हेंबरला विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान होणार आहे. राज्यातील जनतेचा कौल कोणाला मिळाला, याचे उत्तर २३ नोव्हेंबरला मतमोजणीनंतर मिळणार आहे. देशात उत्तरप्रदेशनंतर लोकसभेच्या दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक म्हणजे ४८ जागा महाराष्ट्रात आहेत. उत्तरप्रदेशात लोकसभेच्या देशात सर्वाधिक म्हणजे ८० जागा आहेत. त्यामुळे अन्य राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तुलनेत महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा देशातील राजकारणावर दीर्घकालीन असा परिणाम होणार आहे.

महाराष्ट्रात भाजपाच्या नेतृत्वातील महायुती तर काँग्रेसच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी यांच्यात या निवडणुकीत खरी लढत होत आहे. व्यूहरचनेचा भाग म्हणून महायुती आणि महाविकास आघाडीने आपापला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केलेला नाही. निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदाबाबतचा निर्णय घेतला जाईल, असे दोन्ही आघाड्यांतर्फे सांगितले जात आहे. महायुतीत भाजपा १५१, शिवसेना ८० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागा लढवत आहे. पाच जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आल्या आहेत. महाविकास आघाडीत काँग्रेस १०३, शिवसेना उबाठा ८९ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट ८७ जागा लढवत आहेत. आघाडीने सहा जागा आपल्या छोट्या मित्रपक्षांसाठी सोडल्या आहेत. विशेष म्हणजे जागावाटपाबाबतची अधिकृत घोषणा दोन्ही बाजूने करण्यात आलेली नाही. काही जागांवर दोन्ही आघाड्यात मैत्रिपूर्ण लढती होत आहे. महायुतीत एक माजी आणि एक आजी असे दोन मुख्यमंत्री आहेत. भाजपाचे देवेंद्र फडणवीस हे माजी मुख्यमंत्री आहेत तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे विद्यमान मुख्यमंत्री आहेत. त्यामुळे महायुतीला बहुमत मिळाले तर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यापैकी एकाच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडू शकते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री होण्याची आपली इच्छा कधीच लपून ठेवली नाही. मात्र, यावेळीही ती पूर्ण होईल, असे वाटत नाही. कारण, महायुतीत तिसऱ्या क्रमांकाच्या जागा त्यांच्या पक्षाला मिळू शकतात. त्यामुळे त्यांच्या नावाचा मुख्यमंत्रिपदासाठी विचार होण्याची शक्यता नाहीच्या बरोबरच आहे. महायुतीत मुख्यमंत्र्याची निवड करताना ज्या पक्षाच्या जागा सर्वाधिक राहतील, त्या पक्षाला संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. महायुतीत जागा जिंकण्यात भाजपा पहिल्या क्रमांकावर, शिवसेना शिंदे गट दुसऱ्या क्रमांकावर तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट तिसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिराळा येथे आयोजित सभेत महायुतीला बहुमत मिळाले तर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे संकेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्यामुळे भाजपा गोटात उत्साहाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राचे नेतृत्व करावे, अशी फक्त भाजपा कार्यकर्त्यांचीच नाही तर राज्यातील सर्वसामान्य जनतेचीही इच्छा आहे. मात्र, महायुतीच्या मुख्यमंत्रिपदाचा निर्णय तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून करतील, त्याआधी भाजपा संसदीय मंडळाचीही बैठकही बोलवावी लागेल. त्यामुळे महायुतीचा मुख्यमंत्री कोण राहील, याबाबत आताच मतप्रदर्शन करणे घाईचे होईल. महाविकास आघाडीत शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण हे माजी मुख्यमंत्री आहेत. यातील पृथ्वीराज चव्हाण हे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र मुख्यमंत्रिपदाचे दिवसरात्र स्वप्न पाहणारे उद्धव ठाकरे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले नाहीत. विधानपरिषदेचे अनेक सदस्य निवडणुकीच्या रिंगणात असले, तरी उद्धव ठाकरे यांना विधानसभा निवडणूक लढवण्याची हिंमत झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी अर्धा डझन इच्छुक नेते गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत. यात प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, नितीन राऊत यांच्यासह आणखी अनेकांचा समावेश आहे. वेळ पडली तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणही यात मागे राहणार नाहीत. कोरोना काळात मुख्यमंत्री झालेल्या आणि मंत्रालयात कधीच न गेलेल्या उद्धव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने आपल्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावे, असा अयशस्वी प्रयत्न त्यांनी आपले 'हिज मास्टर्स व्हॉईस' संजय राऊत यांच्यामार्फत करून पाहिला. मुख्यमंत्रिपदाबाबत उद्धव ठाकरे यांची द्विधा मनस्थिती आहे. आपण मुख्यमंत्री व्हावे की आपल्या मुलाला आदित्य ठाकरेला मुख्यमंत्री करावे, याबाबत त्यांचा गोंधळ उडत आहे. याचाच अर्थ उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची संधी आहे, असा नाही.

एका शिवसैनिकाला मुख्यमंत्री करेल, असा शब्द मी बाळासाहेबांना दिला होता, असा दावा उद्धव ठाकरे पाच वर्षांपूर्वी करीत होते. स्वत:ला मुख्यमंत्री करत त्यांनी बाळासाहेबांना दिलेला आपला शब्द खरा करून दाखवला. पण त्यावेळी राज्यातील भाबड्या जनतेला ठाकरे घराण्यातील कोणी मुख्यमंत्री होण्याऐवजी शिवसैनिकांमधून एखादा कर्तबगार नेता मुख्यमंत्री होईल, असे वाटत होते. नंतर जनतेच्या मनातील ही भावना एकनाथ शिंदे यांनी पूर्ण केली, हा भाग वेगळा. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात आता प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील वगळता मुख्यमंत्री होण्यासाठी नेतेच उरले नाहीत. महायुतीत जी स्थिती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची आहे, तीच महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आहे. महाविकास आघाडीत जागांच्या बाबतीत काँग्रेस पहिल्या, शिवसेना उद्धव ठाकरे गट दुसऱ्या तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट तिसऱ्या स्थानावर राहील, असा अंदाज आहे.

उद्धव ठाकरे यांना ज्याप्रमाणे आपल्या मुलाला आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करायचे आहे, त्याचप्रमाणे शरद पवार यांना आपल्या मुलीला सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्री करायचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा सुप्रिया सुळे यांचाच होता. शरद पवार आपल्याला कधीही मुख्यमंत्री करणार नाही, याची खात्री असल्यामुळे अजित पवार शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडले होते. एकंदरीत महाराष्ट्रात महायुतीला बहुमत मिळेल की महाविकास आघाडीला, नवीन मुख्यमंत्री महायुतीचा होणार की महाविकास आघाडीचा, महायुतीला बहुमत मिळाले तर मुख्यमंत्री महायुतीतील कोणत्या पक्षाचा होणार, भाजपाचा की शिवसेनेचा तसेच महाविकास आघाडीला बहुमत मिळाले तर काँग्रेसचा होणार की शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा याबाबत जनमानसात मोठी उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

९८८१७१७८१७

### प्रशासन व्यस्त, विद्यार्थी त्रस्त!

महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला विधानसभेची निवडणूक होत आहे. युद्धस्तरावर तयारी सुरू आहे. अगदी तलाठीपासून तर तहसीलदारपर्यंत संपूर्ण प्रशासन मागील एक ते दीड महिन्यापासून निवडणुकीच्या कामात व्यस्त आहे. अशातच एका महत्त्वपूर्ण परीक्षेच्या नोंदणीचा कालावधी जाहीर झाला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे जानेवारी २०२५ शेवटी जेईई (जॉईंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) ही अभियंता प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या प्रवेश परीक्षेकरिता महाराष्ट्रातील जवळपास दीड ते दोन लाख विद्यार्थी बसणार आहेत. विद्यार्थ्यांना नोंदणीकरिता उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र, जात पडताळणी, नॉन क्रिमीलेअर आणि तत्सम प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. परंतु संपूर्ण प्रशासन निवडणुकीच्या कार्यात व्यस्त असल्याने अशाप्रकारचे दाखले मिळायला विद्यार्थ्यांना, पालकांना अडचणी येत आहेत. यामुळे राज्यातील अनेक विद्यार्थी या परीक्षेपासून वंचित राहू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने स्वतः तसेच राज्यातील शिक्षण संस्थांनी, संघटनांनी, लोकप्रतिनिधींनी यात लक्ष घालून, पुढाकार घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे किंवा नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडे महाराष्ट्रातील जेईई नोंदणीची तारीख किमान एक ते दोन आठवड्यांनी पुढे ढकलण्याची विनंतीवजा मागणी करावी; जेणेकरून निवडणुकीमुळे विद्यार्थ्यांच्या करीअरचे नुकसान टाळता येईल.


**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

### त्रिपुरारी पौर्णिमा

त्रिपुरारी पौर्णिमा हा उत्सव कार्तिक पौर्णिमा या तिथीला साजरा केला जातो. या दिवशी श्री शंकराने त्रिपुरासुर राक्षसाचा नायनाट केल्यामुळे हा उत्सव कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी साजरा करतात. त्रिपुर या दैत्याने ब्रह्मदेवाची आराधना करून त्यांची कृपा प्राप्त केली. त्रिपुराने 'त्याला अमरत्व प्राप्त होवो,' असे वरदान ब्रह्मदेवाला मागितले. वरदान मिळाल्यावर त्याने देवतांचा छळ सुरू केला. श्रीविष्णूलाही त्रिपुराला विरोध करता आला नाही. शेवटी श्री शंकराने तीन दिवस युद्ध करून

## वाचक पत्रे



कार्तिक शुक्ल पक्ष पौर्णिमेला त्रिपुर राक्षसाचा वध केला आणि देवांचे हरवलेले वैभव परत मिळवून दिले. आपले गेलेले वैभव परत मिळालेले पाहून सर्व देवांना आनंदीआनंद झाला आणि त्यांनी शंकराची स्तुती करून दीपोत्सव साजरा केला. तेव्हापासून कार्तिक शुद्ध पौर्णिमेस हा उत्सव साजरा केला जातो. या दिवशी मोठ्या उंच दगडी खांबाच्या सभोवती दिवे लावले जातात. या खांबांना 'त्रिपुरी' म्हणतात. आसुरी शक्तीवर चांगल्या शक्तीचा विजय म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. आपणदेखील तेजाचे अधिष्ठान असलेला हा दीपोत्सव साजरा करूया. आपल्या मनातील दुष्प्रवृत्तींचा नाश होऊन अंतःकरण निर्मळ करून या दीपोत्सवाच्या निमित्ताने भगवंताच्या चरणी प्रार्थना करूया...

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### अज्ञानातून गैरसमज

रस्त्यावर होणाऱ्या वाहनांच्या अपघातांची कारणे तपासली तर बरेचसे अपघात योग्य माहिती नसल्यामुळे झाल्याचे आढळून येईल. समृद्धी मार्ग हा महाराष्ट्रातला आतापर्यंतचा सर्वात चांगला रस्ता आहे. पण वाहनांचा वेग, चाकातल्या हवेचा दाब किती ठेवावा, याची नीट माहिती नसल्यामुळे बरेचसे अपघात होतात. शहरातील रस्त्यांवरून जाणाऱ्या वाहनांचे मोमेंटम (वजन व वेग गुणाकार) यात किती फरक असतो, याची कल्पना नसल्यामुळे लहान वाहनांच्या चालकांचे जीवघेणे अपघात होतात. एकाच वेगाने जाणारा डांस व जड वाहन यांच्या 'मोमेंटम' मध्ये खूप फरक असतो. सर्कसमध्ये हत्तीने मारलेला फुटबॉल किती दूर जातो, हे ज्यांनी पाहिले असेल त्यांना मोमेंटममधल्या फरकाची कल्पना येईल. दोन जात असलेल्या चारचाकीमध्ये नको तिथे धाडस दाखवून मध्ये घुसणाऱ्या स्कूटर चालकाला मागच्या चारचाकी वाहनांचा थोडा जरी धक्का लागला तरी तो किती दूर फेकला जातो, हे खूप उशिरा कळते. एका पारड्यात पाच सेकंद व दुसऱ्या पारड्यात आपला जीव टाकून हे 'बाईक बहाद्दर' मोठी रिस्क घेत असतात. दुसरे उदाहरण द्यायचे झाल्यास, कॉम्प्युटर चिपची कल्पना नसलेले व इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनवर बेछूट आरोप करणारे राजकारणी; देशाचा विकास म्हणजे काय व तो कसा होऊ शकतो, याचे ज्ञान नसताना केवळ पैसे कमवायच्या उद्देशाने निवडणुकीत उमेदवार असणारे भ्रष्ट राजकारणी यांचे देता येईल. सुदैवाने आज सुशिक्षित मतदारांची संख्या वाढते आहे, ही जमेची बाजू आहे. आजच्या या आधुनिक जगात वावरताना, योग्य ते ज्ञान ठेवून शहाणपणाने वागणे, यातच स्वतःचे, समाजाचे व देशाचे हित आहे, हे नेहमी लक्षात ठेवावे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मॅरेथॉन दौंडद्वारे केली मतदार जनजागृती

## जिल्हाधिकाऱ्यांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ – १०८–औरंगाबाद (पश्चिम) मध्ये आज मतदार जनजागृतीसाठी मॅरेथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी हे स्वतः या रॅलीत सहभागी झाले. १०८–औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा मतदार संघात मतदार जनजागृतीसाठी आज सकाळी ८ वा. क्रांती चौकातून मॅरेथॉन दौड आयोजित करण्यात आली जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या दौडची सुरुवात करण्यात आली.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी, उपायुक्त मनपा अंकुश पांढरे, उपसंचालक आपत्ती व्यवस्थापन स्वप्नील सरदार, सहसंचालक तंत्रशिक्षण अक्षय जोशी, शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर व गटशिक्षणाधिकारी तथा स्विप नोडल अधिकारी दीपाली थावरे यांची यावेळी उपस्थिती होती.

सहभागी धावपटूं व विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी व सर्व उपस्थित मान्यवरांनी मॅरेथॉन मध्ये सहभागी होऊन धावण्यास सुरवात केली. 'मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो', 'माझे मत माझा अभिमान', 'आपले अमूल्य मत–करेल लोकशाही मजबूत' अशा घोषणा देत मतदान जनजागृती करत मोठ्या संख्येने सहभागी झाले. या रॅली मध्ये एमआयटी, देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय, हायटेक महाविद्यालय,छत्रपती शाहू महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, श्रेयस अभियांत्रिकी महाविद्यालय इ.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या आयोजनासाठी देवगिरी महाविद्यालयातील एनसीसी व रासेयो विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रविण लोहाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक नोडल अधिकारी मनोज बिरुडे, गोविंद उगले, साहेबराव धनराज,अनंत कणगारे,परसराम बाचेवाड, तुकाराम वांढरे आदींनी परिश्रम घेतले. देवगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात या दौडचा समारोप झाला.

# मतदानासाठी भरपगारी सुटी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका)– विधानसभा निवडणूक २०२४ साठी बुधवार दि.२० रोजी मतदान होणार आहे. या निवडणूकीत मतदान करता यावे व मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भर पगारी सुटी देण्यात यावी,असे आवाहन कामगार उपआयुक्त चंद्रकांत राऊत यांनी केले आहे. निवडणूक होत असलेल्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी हे जर कामानिमित्त निवडणूक क्षेत्राबाहेर असले तरी त्यांना भरपगारी सुटी द्यावी. उद्योग विभागाअंतर्गत येणारे उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांना ही सुटी लागू राहिल. अपवादात्मक स्थितीत पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास मतदारांना किमान दोन तासांची सवलत देण्यात यावी याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घ्यावी. मतदानासाठी सुटी मिळण्यासंदर्भात उद्भवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कामगार उपआयुक्त यांच्या कार्यालयात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून संबंधित कामगार, संघटना यांनी ०२४०–२३३४६०३ या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ५१३/२०२४

अर्जदार – १. मीना बापुसाहेब पवार, वय ४८, धंदा शेती रा. गंगापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. प्रकाश बबनराव राऊत वय ४४ वर्ष, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ३. अर्जुन बबनराव राऊत वय ४० वर्ष, धंदा – शेती, रा. वरील प्रमाणे ४. शिला परसराम मोरे, वय ३८ वर्ष, धंदा शेती रा. दुगलगांव, नासिक ता. व जि. नासिक रा. वरील प्रमाणे

विरूध्द

गैरअर्जदार – निरंक

विषय – कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ ते ४ हे मयत गयाबाई बबनराव राऊत यांची मुले व मुली आहेत. गयाबाई बबनराव राऊत हया दिनांक ३१/०३/२०२३ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत गयाबाई बबनराव राऊत यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत गयाबाई बबनराव राऊत यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता आहे. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत गयाबाई बबनराव राऊत यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख २०/१२/२०२४.

आज दिनांक १४/११/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क–स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. २७७/२०२४

अर्जदार : १) सॅन्ड्रा उर्फ सँडा भ्र. विल्यम खंडागळे वय ५९ वर्षे, धंदा गृहिणी रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. २) वेसली पि. विल्यम खंडागळे वय ३१ वर्षे धंदा नौकरी रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्केट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. ३) वॉल्टर पि. विल्यम खंडागळे वय २५ वर्षे धंदा शिक्षण रा. न्यु स्नेहनगर सोसायटी, मार्कर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे. ४) वेनिला पि. विल्यम खंडागळे, वय ३४ वर्षे, धंदा नौकरी रा. न्यू स्नेहनगर सोसायटी, मार्कर्ट यार्ड, लास्ट बस स्टॉप जवळ, गुलटेकडी पुणे.

विरुध्द

गैरअर्जदार :– निरंक

प्रकरण :– हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ व ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील नामे विल्यम वाबुराव खंडागळे हे मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते तं नौकरी निमीत्त पुणे येथे राहण्यास गेले होते व ते तेथेच दिनांक २३/०६/२०२२ रोजी मयत झाले आहे. मयत विल्यम बाबुराव खंडागळे यांचे नावे मौजे गंगापुर ता. गंगापुर नगर परिषद हद्दीत वॉर्ड क्र.७ मध्ये मिळकत नं.२३२ क्षेत्रफळ १०५ बाय २० चौ. फुट क्षेत्रफळाची सहान जागा आहे. सदर मिळकत नावाबर करणे कामी तसेच शासकीय–निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत विल्यम बाबुराव खंडागळे यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवाचा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही ये है न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १४/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ५१५ /२०२४ प्रकरणात पुढील तरीख दि. ४/१/२०२५

अर्जदार : १) ताराबाई भ्र. मधुकर औटी, वय ७१ वर्ष, धंदा घरकाम, रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. २) प्रभावती भ्र. चंद्रकांत ढकीफळे, वय ५८ वर्ष, धंदा घरकाम, रा. पान रांजनगांव ता. पैठण जि. औरंगाबाद. ३) सुहास पि. मधुकर औटी, वय ३७ वर्ष, धंदा मजुरी, रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद. ४) कल्याणी भ्र. दिपक भवर, वय ३३ वर्ष, धंदा घरकाम, रा. हर्षनगर, लेबर कॉलनी, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. ए. आर. बरडे, गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार ते ४ यांची आई असुन अर्जदार क २ हे आपसात क २ व ४ सख्खे विवाहीत बहिनी असुन अर्जदार क ३ हा त्यांचा भाउ आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील नामे मधुकर दत्तोपंत औटी हे दि.०८/०७/२००९ रोजी मौजे तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत मधुकर दत्तोपंत औटी यांना अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ४ या विवाहीत मुली व अर्जदार क ३ हा मुलगा कायदेशीर वारसदार आहेत. मयत मधुकर दत्तोपंत औटी यांना अर्जदार क १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत मधुकर दत्तोपंत औटी यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

दिले. आज दि.१४/११/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १८८/२०२४

अर्जदार : १/– ग्यारसीबाई प्रभाकर जाधव, वय ७४ वर्ष, धंदा घरकाम, रा. निंबायती, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/– राजेंद्र प्रभाकर जाधव, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/– समाधान प्रभाकर जाधव, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४/– गिताबाई राजेंद्र पवार, वय ४४ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ५/– छायाबाई रणजित राठोड, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ६/– वैशाली दिपचंद राठोड, वय ३० वर्ष, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन एस. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत प्रभाकर बाळू जाधव यांचा दि. २०.१०.२०२२ रोजी मौजे निबायती, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे एकमेव वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत प्रभाकर बाळू जाधव यांचे वारस असुन त्यांना मयत प्रभाकर बाळू जाधव यांच वारस प्रमाणपत्र हे शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.१४/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता/२/२०२४ २१/१२

आदेशावरुन

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात**

दि.कि अर्ज क्र. २६८/२०२४

अर्जदार : १) जिभाऊ शंकर गडवे वय ३९ वर्षे, धंदा मजुरी, मु. चिमणापुर, पोस्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) गंगाधर शंकर गडवे, यय ७७ वर्षे, धंदा मजुरी, मु. चिमणापुर, पोस्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) भीमराव शंकर गडवे वय. ५७ वर्षे, धंदा मजुरी, मु. चिमणापुर, पोस्ट नागापूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ४) दिलीप शंकर गडवे वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, मु. चिमणापुर, पोस्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ५) राधाबाई भुरा गडवे, यय– ४८ वर्षे, धंदा घरकाम, मु. चिमणापुर, पोस्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ६) विनोद पि. भूरा गडवे, वय २० वर्षे, धंदा शिक्षण, मु. चिमणापुर, पोस्ट नागापूर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ७) आनंद पि. भुरा गडवे, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण, मु. चिमणापुर, पोन्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ८) मिलींद पि. भुरा गडवे, वय– २४ वर्षे, धंदा– शिक्षण, मु. चिमणापुर, पोस्ट नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तफे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

मा. महोदय,

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. के. साळवे यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ आहे, तसेच अर्जदार क्र. ५ ही मयत भुरा शंकर गडवे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. ६ ते ८ ही त्यांची मुले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ५ यांचे सासरे व अर्जदार क्र. ६ ते ८ यांचे आजोबा नामे शंकर मनाजी गडवे हे होते ते दिनांक ०१/०३/२०१४ रोजी राहत्या घरी मौजे चिमणापुर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांच्या आई तसेच अर्जदार क्र. ५ यांच्या सासु व अर्जदार क्र. ६ ते ८ यांच्या आजी नामे सोनाबाई शंकर गडवे या होत्या त्या दिनांक १७/१२/२०१६ रोजी मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांचे भाऊ व अर्जदार क्र. ५ यांचे पती व अर्जदार क्र. ६ ते ८ यांचे वडील नामे भुरा शंकर गडवे हे देखील दिनांक २६/०५/२०१५ रोजी मयत झालेले आहे. सोबत तिन्ही मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे. अर्जदार यांना शंकर मनाजी गडवे व मयत सोनाबाई शंकर गडवे हे मयत झाल्यामुळे अर्जदार क्र. १ ते ८ यांना शासकिय तसेच निमशासकिय तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरल जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवून उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १५/१०/२०२४

आदेशावरुन

सहाय्यक अधिक्षक कन्नड

विकास

**जळगांव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, जळगांव**

पोस्ट बॉक्स नं. ३२, शिवाजी नगर रोड, जळगांव - ४२५००१

फोन नं. ०२५७ - २२२६६४५-४८ फॅक्स नं. ०२५७ - २२२५६११

**टेंडर नोटीस**

जळगाव जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघासाठी खालील नमुद केले प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशील |
|---|---|
| ०१ | पॉलीफिल्मचे टेक्नीकल |

सदर निविदेतील कामाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी व शर्ती इत्यादी माहिती संघाच्या www.vikas.coop या वेब साईटवर पाहावयास मिळतील. **अ.क्र. 01 च्या निविदा दि 23/11/2024 रोजी दुपारी 5.00 वाजेपर्यंत संघाच्या कार्यस्थळी अनामत रक्कमेसह पाठवावे.** सदरच्या जाहीराती मध्ये काही बदल झाल्यास त्याची सुचना संघाच्या **www.vikas.coop** या वेबसाईटवर अपलोड करण्यात येईल. कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशता मंजुर अथवा नामजूर करण्याचा अधिकार संघाने राखून ठेवलेला आहे.

**कार्यकारी संचालक**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 99 - Partur | Babanrao Dattatreya Yadav (Lonikar) | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 99-Partur

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 91- Mukhed | Tushar Govindrao Rathod | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 91- Mukhed

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 90 - Deglur (S.C.) | Jitesh Raosaheb Antapurkar | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 90 - Deglur (S.C.)

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 85 - Bhokar | Sreejaya Ashok Chavan | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

Name of constituency : 85-Bhokar

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# परतुरात प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात दररोज बदलते परिस्थिती! लोणीकर-बोराडे व जेथलियात सुपर फाईट

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचाराचा दुसरा टप्पा सुरू झालेला असून या प्रचारात महायुतीचे उमेदवार व विद्यमान आमदार बबनराव लोणीकर, महाविकास आघाडीचे व पहिल्यांदाच उमेदवारी मिळालेले उबाठा शिवसेनेचे ए जे बोराडे व काँग्रेसकडून तिकीट न मिळाल्याने व बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार सुरेश कुमार जेथलिया यांच्यामध्ये सुपर फाईट होत असल्याचे सध्याचे चित्र आहे. या निवडणुकीत कधी नव्हे ते सामाजिक ध्रुवीकरणाचे मोठे चित्र दिसत आहे सर्वच उमेदवारांमध्ये आपापल्या परीने मोठा प्रचार केला जात आहे. प्रचारामध्ये कधी लोणीकर तर कधी बोराडे तर कधी घेतली अशाप्रकारे दररोज चित्र बदलत आहे निवडणूक आता केवळ आठ दिवसावर येऊन ठेपलेली असताना प्रचाराची गतीही वाढलेली आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत परभणी लोकसभा क्षेत्रात येत असलेल्या परतुर विधानसभे च्या क्षेत्रामध्ये महाआघाडीचे संजय जाधव यांना परतूर मतदारसंघात ८५०६० म्हणजेच ४५.८४% एवढी मते मिळाली तर महायुतीचे रासपा उमेदवार महादेव जानकर यांना ५९७१६ म्हणजेच ३२.१८% एवढे मतदान मिळाले होते तर वंचित बहुजन आघाडीचे पंजाबराव डक यांना या मतदारसंघात १४९२२ म्हणजेच ८.५% मतदान मिळाले होते यात परतूर मतदारसंघात महा आघाडीचे उमेदवार संजय उर्फ बंडू जाधव यांना २५ हजार ३४४ मतांची आघाडी होती परतुर मतदारसंघात दोन्ही उमेदवार मधील फरक हा १३.७% एवढा होता सदरील आकडेवारी पाहता यावेळी संजय जाधव यांना मराठा आंदोलक व जरांगे पाटील यांचे खुले समर्थन याचा भरपूर फायदा झालेला होता यात पंजाबराव डक यांनी दलित मते मोठ्या प्रमाणात आपल्याकडे ओढलेली होती तसेच ही केवळ दुहेरी लढत असताना जाधव यांना मतदारसंघात २५ हजार ३४४ चे मताधिक्य लाभलेले होते परंतु या विधानसभा निवडणुकीत चित्र अगदी वेगळे असणार आहे या निवडणुकीत

## शासकीय योजना आ.बबनराव लोणीकरांच्या जमेची बाजू





महायुती सरकारच्या कार्यकाळात गावोगावी झालेले रस्ते, गाव तेथे पाणी, व वीज याशिवाय शेतकरी सन्मान् योजना, लाडकी बहीण योजना, घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजना याचबरोबर शेतकऱ्यांसाठी राबविलेली सौर ऊर्जा योजना व शेती साहित्य अनुदान योजना या विकास कामांचा मोठा प्रभाव लोणीकर यांच्या बाजूने असू शकेल. एकूण मात्र अंतिम टप्प्यात ही निवडणूक अतिशय रंगतदार अवस्थेत पोहोचलेली असून शेवटच्या टप्प्यात सर्वच उमेदवार आपापल्या परीने जोर लावीत आहेत.

मराठा चेहरा असलेले भाजपचे अनुभवी नेते व आठव्यांदा उमेदवारी प्राप्त झालेले बबनराव लोणीकर यांचा मतदारसंघातील असलेला दांडगा जनसंपर्क मतदार संघात ठिकठिकाणी झालेले कोट्यवधी रुपयांचे विकासकामे व गाव पातळीपर्यंत पोहोचलेल्या शासकीय योजना यामुळे लोणीकर यांची बाजू भक्कम आहे याचबरोबर जरांगे पाटील यांच्या आंदोलनात भाजपातील अनेक मराठा कार्यकर्ते सामील असल्याने त्यावेळी परतूर मतदारसंघात महादेव जानकर यांना प्रभावी मतदान पडले नाही परंतु यावेळी खुद्द लोणीकर निवडणूक मैदानात आहेत व त्यांची सर्व समाजाला सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पद्धत असल्याने व त्यांची ही अखेरची निवडणूक असावी यामुळे त्यांच्या बाजूने मतदारांचा कल आहे शिवाय हिंदुत्ववादी विचारसरणी असलेल्या मतदारांसाठी लोणीकर हाच पर्याय असल्याने त्यांची बाजू भक्कम दिसते तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे एजे पाटील बोराडे हे गेल्या कित्येक वर्षापासून शिवसेनेचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहेत व त्यांच्या रूपाने आघाडीला प्रतिनिधित्व मिळाल्याने मतदार संघात नवीन चेहरा असल्याने त्यांची उमेदवारी भक्कम स्थितीत मानली जाते विशेष म्हणजे बोराडे यांच्यासोबत कपिल भैया आकात यांचा मोठा संच प्रचारात असल्याने व मंठा तालुक्याला उमेदवारी स्वरूपात बऱ्याच काळानंतर प्रथमच संधी मिळाल्याने मंठा तालुक्यात त्यांना चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा आघाडीचे समर्थक करीत आहेत.

लोकसभा निवडणुकीतील गणिते मांडून आपलाच विजय नक्की असल्याचा दावा बोराडे यांच्यावतीने करण्यात येत असला तरीही लोकसभा निवडणुकीतील चित्र व सध्याचे विधानसभा निवडणुकीतील चित्र यात मोठी तफावत असल्याचे दिसते महाआघाडीचे परंपरागत मतदानावर जेथलिया सारख्या तगड्या उमेदवाराच्या बंडखोरीने सुरुंग लागलेला आहे शिवाय वंचित बहुजन आघाडीचे रामप्रसाद थोरात हेही बहुतांशी दलित मतावर प्रभाव टाकत आहेत.

हे पाहता महाआघाडीच्या बोराडे यांच्यासाठी मोठी पंचायत होण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीत परतूर मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुती यांना पडलेल्या मतांची आजच्या विधानसभा निवडणुकीत वर्गवारी केली असता महाविकास आघाडीमध्ये गत वेळेस मराठा मतांसोबतच मुस्लिम व बंजारा मतांचा मोठा भरणा होता त्या जोडीलाच दलित मतांची ही भर पडल्याने बंडु जाधव हे ८५००० पर्यंत पोहोचलेले होते परंतु आजच्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्याच मतातून लोणीकर यांना मराठा मतांसोबतच बंजारा व काही प्रमाणातील दलित व अल्प प्रमाणातील मुस्लिम मते वळू शकतील यामुळे महाआघाडीचा आकडा हा घसरू शकतो, तर महायुतीचा आकडा येथे वाढू शकतो.

याच दरम्यान महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही मतांमध्ये अपक्ष असलेले जेथलिया व वंचित हे मतांची सेंधमारी करतील यात वाद नाही. ओबीसी चळवळीतील सक्रिय राहिलेले व पूर्वाश्रमीचे भाजप कार्यकर्ते राहिलेले रामप्रसाद थोरात यांनी वंचित आघाडी कडून उमेदवारी दाखल केलेली आहे थोरात हे लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या पारड्यातील दलित व आदिवासी मते व काही प्रमाणातील मुस्लिम मते आपल्याकडे ओढू शकतील तर महायुतीतील जानकर यांना पडलेले ओबीसी समुदायातील माळी व धनगर या समाजातील मते आपल्या पारड्यात होण्यासाठी प्रयत्नशील आहेत यात थोरात हे महायुती व महाआघाडी या दोन्ही उमेदवारांची डोकेदुखी ठरत आहेत त्यातच काँग्रेस कडून तिकीट नाकारलेले सुरेश कुमार जेथलिया यांची उमेदवारी आघाडीचे उमेदवार बोराडे यांना अधिक धोकादायक ठरत आहे त्यांच्या परड्यातील बहुतांशी मुस्लिम मते शिवाय दलित व काँग्रेस विचारसरणीचे मते आपल्या पारड्यात ओढून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत या सर्व मतांच्या ओढा ओढीच्या राजकारणात चारही उमेदवार सध्य स्थितीत मजबुतीत आहेत.

## संक्षिप्त

### महायुतीचे उमेदवार खोतकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा- अरविंदराव चव्हाण



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातून भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी व रिपाई या महायुतीचे उमेदवार अर्जुनराव खोतकर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे. जालना विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात श्री. चव्हाण हे खोतकर यांच्या प्रचारासाठी गांव, तांडे व वस्त्यांमध्ये जावून प्रत्यक्ष मतदारांच्या भेटी घेत असून त्यांच्या या प्रचार दौ-यास कार्यकर्ते व मतदार मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आहे.

राज्यातील महायुतीच्या सरकारने गेल्या अडीच वर्षात अनेक लोकहीताचे निर्णय घेतल्याचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी या प्रचार दौ-यानिमित्त सांगितले. त्यामध्ये मुख्यतः शेतकऱ्यांना मोफत वीज, एक रुपयामध्ये पिक विमा, पिकविमा व अतिवृष्टी चे अनुदान, शेतकऱ्यांना मागेल त्याला सौर पंप, महिलांना लाडकी बहीण योजना मासिक १५०० रूपये,महिलांना बसमध्ये ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षण, युवकांना रोजगार, वृध्दांना मोफत बस, वयोश्री व तिर्थक्षेत्र योजना यासारख्या अनेक कल्याणकारी योजना सुरू करून त्या प्रत्यक्षात अंमलात आणल्या. या योजनांचा सर्व समाजातील गोर-गरीब व कष्टकरी वर्गाला न्याय मिळाल्याचे जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी खोतकर यांच्या प्रचारार्थ सांगितले. यापुढे ही महायुतीचे सरकार राज्यात आल्यास केंद्र सरकारकडून या योजना चालू ठेवण्यासाठी व विकास कामांसाठी मोठा निधी मिळेल अशी अपेक्षा श्री चव्हाण यांनी व्यक्त केली. त्यामुळे जालना विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी विरोधकांच्या भूलथापांना बळी न पडता भाजपा-शिवसेना - राष्ट्रवादी व रिपाई या महायुतीच्या उमेदवारांस आप आपल्या भागातून प्रचंड मताधिक्य देवून विजयी करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले आहे.

### जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ व पोलीस अधिक्षक बन्सल यांनी केली मतमोजणी व मतदान केंद्राची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी आज १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी केंद्र आणि मतदान केंद्राना आज भेट देवून पाहणी केली.

यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, प्रशिक्षणार्थी आयएएस अरुण एम, १०३ भोकरदन विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. दयानंद जगताप, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संतोष बनकर आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी डॉ. पांचाळ यांनी १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील नगर परिषदेच्या मंगल कार्यालयातील मतमोजणी केंद्राना प्रत्यक्ष भेट देवून मतदान यंत्रे (इव्हीएम) सज्ज करण्याच्या प्रक्रिये दरम्यान उमेदवारांच्या नावांची तपासणी करुन एका मशीनवर 'मॉकपोल' करून व्हीव्हीपॅटद्वारे दिसणाऱ्या चिठ्ठीचीही खात्री करुन घेतली. तसेच यावेळी स्ट्रॉन्ग रुमला भेट देवून रॅन्डमझायशेन प्रक्रियेनुसार मतदान यंत्रे (इव्हीएम) असल्याची देखील त्यांनी खात्री करुन घेतली. यावेळी डॉ. पांचाळ यांनी यावेळी १०३ भोकरदन विधानसभा मतदारसंघातील भोकरदन येथील न्यु हायस्कुल आणि नांजावाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्र तसेच १०२ बदनापूर विधानसभा मतदार संघातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्राना भेट देवून पाहणी केली. तसेच निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार केंद्रावर आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधांचे नियोजन करण्याच्या यावेळी सूचना दिल्या.

## मंठा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत कापूस खरेदी करावी शेतकऱ्यांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

येथे कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत कापुस खरेदी करण्यात यावा अशी मागणी मंठा तालुक्यातील शेतकऱ्यांकडुन होत आहे.

मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती चालु नसल्या कारणाने शेतक-यांना आपला कापुस कवडीमोलाने विकावा लागत असुन मानवत बाजारपेठेत कापुस नेणारे शेतकऱ्यांची खुप हेडसांड होत आहे. शेतकऱ्यांना आपला कापूस नाईलाजास्तव प्रायव्हेट जिनिंगला द्यावा लागत आहे व मंठा येथील काही जिनिंग धारकाकडून ड्राईव्हरला कमीशन देऊन व शेतक-यांची दिशाभूल करून आपल्या कडे कापुस आणण्यास भाग पाडत आहे. त्यामुळे शेतक-यांना आपला कापुस कवडीमोल भावात विकावा लागत असल्यामुळे, मंठा येथे कृषी उत्पन्न बाजार समिती (मंडीला) बिट करण्यात यावा अशी मागणी मंठा येथील शेतक-यांची होत आहे. तरी या संबंधित अधिकाऱ्यांनी या विषयाकडे गांभिर्याने लक्ष देऊन मंठा येथे (मंडी) बिट चालु करण्यात भावी अशी मागणी केली आहे.

## सुरेशकुमार जेथलिया यांनी घेतली प्रचारात आघाडी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मागील ४० वर्षापासून जनसेवेमध्ये स्वतःला वाहून घेतलेले सुरेशकुमार जिथलिया यांनी आपला जनसंपर्क आजपर्यंत कायम ठेवला असून गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी केव्हाही रस्त्यावर उतरणारे व कार्यकर्त्यांसह पदाधिकारी व सर्वसामान्यांच्या सुखा दुखात धावून जाणारे सुरेश कुमार जेथलिया यावर्षी अपक्ष म्हणून विधानसभेमध्ये उभे राहिले आहेत. पक्षाकडून त्यांच्यावर अन्याय झाल्याने गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या आग्रहास्तव त्यांनी अपक्ष म्हणून परतूर मंठा विधानसभा मतदार संघामध्ये उमेदवारी अर्ज सादर केला आहे. महाविकास आघाडी व महायुतीच्या प्रचारापेक्षा सुरेश कुमार जेथलिया यांच्या प्रचाराने आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला जात आहे. गोरगरीब , सर्वसामान्य जनता त्यांच्या पाठीशी असल्याचे दिसून येत आहे . प्रत्येक गावामध्ये त्यांना भरपूर पाठिंबा व प्रेम दिल्याचे दिसून येत आहे तसेच गावागावांमध्ये जनता त्यांना आशीर्वाद देताना दिसून येत आहे. त्यांच्यावर महाविकास आघाडी कडून अन्याय झाल्याची भावनिक लाट सुरेश कुमार जेथलिया यांच्या विजयाचे कारण ठरणार आहे. महाविकास आघाडीतील अंतर्गत वादामुळे सदर जागा ही उबाठा गटाकडे गेली असल्याचे देखील कार्यकर्त्यातून बोलले जाते उबाठा गटाचे उमेदवार हे जनसंपर्कात नसून नेता म्हणून या शअसा देखील गोरगरीब सर्वसामान्य चर्चा ऐकायला मिळत आहे. यासह यांची दादागिरी व गुंडगिरी देखील मोठ्या प्रमाणावर शहरात व तालुक्यात वाढत गेलेली आहे. त्यामुळे जनता यांच्यापुढे जरी बोलत नसली तरी मतदानामध्ये यांना दाखवून देणार असल्याचे देखील बोलले जात आहे. दुसरीकडे महायुतीचे उमेदवार यांनी देखील विकास कामाच्या नावावर मोठ मोठ्या गप्पा मारत आहेत. सर्वसामान्यांची कुठलीही कामे केली नसल्यामुळे जनता त्यांच्यावर नाराज आहे. सध्या प्रचारामध्ये अपक्ष म्हणून उभे राहिलेले जेथलिया यांना गोरगरीब सर्वसामान्य जनतेकडून उस्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

## महायुतीकडून जातीय ध्रुवीकरणाचे प्रयत्न-माजीमंत्री आ.अमित देशमुख




**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुतीची नेते मंडळी पुढे सत्ता येणार नाही, या भीतीने जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत असून कोणत्याही भुल-थापांना बळी न पडता जनतेने जाल-नेकरांच्या भवितव्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यांना भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी आज येथे केले. आमदार कैलास गोरंट्याल व आपण स्वतः निश्चितपणे विजयाचा चौकार मारणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जालना विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल यांच्या प्रचारार्थ जालना शहरातील सुयेशा लॉन्स येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विचारपिठावर खासदार डॉ. कल्याण काळे, उमेदवार आमदार कैलास गोरंट्याल, जालना लोकसभेचे पक्षनिरिक्षक डॉ. पी. सी. शर्मा, पक्षनिरिक्षक नामदेव पवार, आमदार राजेश राठोड, जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र राख ,माजी आमदार संतोष सांबरे, काँग्रेसचे प्रदेश सचिव कल्याण दळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, शिव-सेनेचे शहरप्रमुख बाला परदेशी, रिपाइंचे ( गवई गट) जिल्हाध्यक्ष किशोर मघाडे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे,महिला काँग्रेसच्या अध्यक्षा नंदा पवार,मुरलीधर शेजूळ, शिवाजी शेजूळ, प्रभाकर पवार, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदर चाऊस,कल्याण बोराडे, बाबुरावमामा सतकर, राम कुराडे,ड.सय्यद तारेख आदींची उप-स्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार देशमुख पुढे म्हणाले की, आमदार कैलास गोरंट्याल हे मराठवाड्यातील काँग्रेस पक्षाचे सर्वात सिनियर आमदार आहेत, आपण व आमदार कैलास गोरंट्याल हे चौथ्यांदा विजयी चौकार लगावणार आहोत. आमदार गोरंट्याल हे विधिमंडळात काँग्रेस पक्षाचे स्टार आमदार म्हणून ओळखले जातात, विकास व जनकल्याणाची तळमळ असलेले आमदार म्हणून ते ओळखले जातात.पिण्याच्या पाण्यासाठी शहरात घागर मोर्चे, पाणी भरण्यासाठी लागलेल्या रांगा हे चित्र बदलून टाकण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी संघर्ष केला व जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली. जालना शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यासाठी आमदार गोरंट्याल यांनी पुढाकार घेतला, आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री असतांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा तसेच आवश्यक त्या परवानग्या काढून दिल्या, त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय महाविकास आघाडीच्या काळातच मंजूर झाले.आता पुढे येणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकाळातच वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन होईल. सत्तेचा दुरुपयोग करून पक्ष फोडाफोडीचे राजकरण करणाऱ्या महायुती व घटक पक्षांची नेते मंडळी जाती- धर्माचे राजकरण करून जातीय ध्रुवीकरणाचे प्रयास करीत आहेत. जनतेने त्यांच्या भुलथापांना बळी पडू नये, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार ही काळ्या दगडावरील रेष आहे, यासाठी आपण विधानसभेच्या आवारात उपोषणाला बसलो. जालना शहरात मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे खरे श्रेय हे आमदार अमित देशमुख यांनाच आहे, इतर कुणीही याचेश्रेय वाटण्याचा प्रयत्न करता कामा नये. लातूर व जालना जिल्ह्याची निर्मिती एकाच वेळी झाली, लातूर जिल्ह्याला विलासराव देशमुख यांच्या सारखे दमदार नेतृत्व लाभल्याने लातूरचा विकास झाला. याउलट जालन्याचे झाले, १९९० पासून आमदार व दोन वेळा मंत्री राहिलेले खोतकर यांनी शहर विकासाच्या कोणत्याही योजना आणल्या नाहीत, उलट रामनगर साखर कारखाना, लालबाग जिनिंग, देखरेख संघ, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून स्वतःचा फायदा करून घेतला. जालना शहरासाठी आपण संघर्ष करून जायकवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करून घेतली, आता जालना शहरात नवीन जलकुंभ व जलवाहिनीचे कार्य हाती घेण्यात आले आहे, हे कार्य पूर्ण झाल्यावर जालनेकरांना दररोज पाणी पुरवठा केला जाईल. हातवन बृहत प्रकल्प कार्यान्वित करून त्याचे पाणी जालना शहरात आणले गेले तर जालना शहराला मुबलक पाणी मिळेल, याशिवाय खडकपूर्णा धरणातून ७२ गावांना पाणीपुरवठा झाला तर या गावातील पाणी प्रश्न सुटेल. जालना शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे, अशी मागणी करत आपणास जनतेने भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहनही आमदार गोरंट्याल यांनी यावेळी केले. यावेळी राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख, नामदेव पवार डॉ. पी. सी. शर्मा आदींनी जालना शहराच्या विकासासाठी आमदार कैलास गोरंट्याल यांना निवडून द्यावे, असे आवाहन केले. सभेचे संचालन राम सावंत यांनी केले तर दिनकर घेवंदे यांनी आभार मानले. या जाहीर सभेस अकबरखाँ बनेखॉ,मधुकर घेवंदे,विजय चौधरी,दुर्गेश काठोठीवाले, विजय पवार, मनकर्णाबाई डांगे, विनोद यादव यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते , महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जालना शहरातही अर्जुनराव खोतकर यांचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत; डोअर टू डोअर प्रचाराने विरोधक धास्तावले

### नुसते स्वागतच करु नका, तर येत्या वीस तारखेला धनुष्यबाणाला मतदान करा -खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातही महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार श्री. अर्जुनराव खोतकर यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. त्यावेळी बोलतांना श्री.खोतकर म्हणाले की, गाफील राहू नका, नुसते स्वागतच करु नका, तर येत्या वीस तारखेला धनुष्यबाणाला या निशाणी समोरील बंटन दाबून भरभरुन मतदान करा, असे आवाहन श्री. खोतकर यांनी यावेळी केले.



याप्रसंगी पंडीतराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, रामेश्वर भांदरगे, रतन पिपरिये, नरेश खुदभैय्ये युवा सेना, महिला आघाडी, शिवसेना, महायुतीचे पदाधिकारी व शहरातील नागरीकांची व महिलांची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती.

यावेळी बोलतांना श्री. खोतकर म्हणाले की,मी तुमच्याकडे आशिर्वाद मागण्यासाठी आलो आहे. येत्या वीस तारखेला धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटन दाबून मला प्रचंड मतांनी विजयी करा, तुमचे कुठलेही काम करण्यास मी सज्ज आहे. सत्तेवर असो वा नसो तरीही मी मोठ्याप्रमाणात निधी आणून या शहरातील कामे केली आहेत. आज जे कुणी माझ्या नावाने बोटे मोडीत असतील परंतू सत्य हे लपून राहत नाही. नगर पालिका कोणी खाल्ली, हे सर्वांना माहितच आहेत. शहराला थेट जायकवाडीतून पाणी कोणी आणले, मेडीकल कॉलेज कुणी आणले, हेही जनतेला माहित आहे, असे असतांनाही तो भामटा म्हणतो की, माझ्यामुळेच हे सर्व आले आहे, असे सांगून ते म्हणाले की, शहरी भागातील महिला, नागरीक आणि युवा पिढीसाठी विद्यमान सरकारने फार मोठ्या प्रमाणावर योजना राबवल्या आहेत. आखल्या आहेत, भविष्यात या योजना बंद होऊ नयेत, याची खबरदारी ही मतदार म्हणून आपल्याला घ्यायची आहे. जालना महानगर पालिकेच्या निवडणूका आता लवकरच होणार आहेत, महापालिकेचा कारभार आपल्याला सुधारवा लागेल, रस्त्यांसाठी महायुतीच्या सरकारने भरमसाठ पैसा दिल्याने तोही प्रश्न निकाली निघाला आहे. वीजेचा प्रश्न देखील सुटलेला आहे. त्यामुळे बहुतांश प्रमुख प्रश्न सुटले असले तरी अजूनही बरेच कामे करणे बाकी असल्याचे ते म्हणाले.

# देगलूर मतदार संघाचे वाळवंट करणाऱ्या महाविकास आघाडीला धडा शिकवा : खा. अजित गोपछडे

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. १४ नोव्हेंबर**

बलोली - देगलूर मतदार संघाचे वाळवंट करणाऱ्या काँग्रेस आणि महाविकास आघाडीला या निवडणुकीतून धडा शिकवा. देगलूर बिलोली मतदार संघाच्या विकासाची नवी पहाट करा. लोकसभेसाठी डॉक्टर संतुकराव हंबर्डे आणि विधानसभेसाठी जितेश अंतापुरकर यांना प्रचंड मतांनी विजयी करा. त्यानंतर आपल्या मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी माझी राहील. असा विश्वास खा. अजित गोपछडे यांनी बिलोली तालुक्यातील सावळी आणि आरळी येथे झालेल्या बैठकांमधून दिला. लोकसभेचे भारतीय जनता पार्टी महायुतीचे उमेदवार डॉ. संततुकराव हंबर्डे आणि देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार जितेश अंतापूरकर यांच्या प्रचारासाठी तालुक्यातील आरळी , सावळी येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये खासदार अजित गोपछडे बोलत होते.

आमदार जितेश अंतापुरकर, बालाजी बच्चेवार, उमाकांत गोपछडे, व्यंकटराव पाटील गुजरिकर, माणिकराव लोहगावे, श्रीनिवास नरवाडे, गणेश पाटील शिंपाळकर, शंकरराव काळे, चंद्रशेखर पाटील साळवीकर, बाबाराव लोकडे, विश्वनाथराव समन, बालाजी दुगावकर, हज्जपा पाटील सुकोनोड, दत्ताराम भोजने, संभाजी शेळके, बीगे साहेब, कनेर साहेब, संगीता मिरगेवार , सुलोचनाताई स्वामी यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा. गोपछडे म्हणाले की, देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघ गेल्या पन्नास वर्षाच्या काळात ज्यांना तुम्ही नेता म्हणून खांद्यावर घेतले. ज्यांना आमदार, खासदार आणि राज्याचे मंत्री केलात. त्या आमदार, खासदार आणि राज्याच्या मंत्र्यांनी केवळ स्वतः च्या कुटुंबापुरता विचार केला. स्वतःच्या नातेवाईकांपुरता विचार केला. त्यामुळे देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचा विकास होऊ शकला नाही. खर तर काँग्रेसने आणि काँग्रेसच्या नेतृत्वाने देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील विकासाचा खून केला अशी जहरीली टीका ही खा. गोपछडे यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून शंकरनगर येथे सुरू केलेला कारखाना कोणी बंद पडला? का बंद पडला? हे जनतेला चांगले माहीत आहे . या कारखान्यातून खतगावकरांनी सात पिढ्या बसून खातील एवढा पैसा कमवला . पोट भरून ढेकर दिल्यानंतर शेतकऱ्यांना, कर्मचाऱ्यांना मरणाच्या दारात सोडून कारखाना विकून खाल्ला आणि याची खापर एका सामान्य माणसाच्या डोक्यावर फोडले. त्यामुळे सोबत असणाऱ्यांचाही राजकीय बळी देणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांना आता सत्तेतून हद्दपार करून कायमचे घरी बसवायचे आहे. देगलूर बिलोली चे वाटोळे करून आता नायगावर डोळा ठेवला आहे . परंतु नायगाव मध्ये जनता हुशार आहे. अशा लबाडाला ते साथ देणार नाहीत. त्यासाठी बिलोली-देगलूर मधून आता आपण दक्ष होण्याची गरज आहे. आपला भाग हा तेलंगणा आंध्र प्रदेशाला लागून असल्यामुळे आपण अधिक भोळे भाबडे आहोत. हा भोळे भाबडेपणा बंद करा. काँग्रेसच्या आमिषाला आणि भूलथापांना बळी पडू नका .त्यांना सत्तेतून कायमची हाकला कारण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे . त्यामुळे आपल्या नांदेड जिल्ह्याचा आणि आपल्या बिलोली देगलूर भागाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर खासदार आपला असला पाहिजे. त्यामुळे आता होत असलेल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीत आपल्याला मोठी संधी उपलब्ध झाली आहे. आपल्या विकासाची नवी संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातून भाजपाला सर्वाधिक लीड मिळवून द्या. या भागाच्या सर्वांगीय विकासासाठी मी स्वतः खासदार अजित गोपछडे आपली जबाबदारी स्वीकारतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारतात नांदेड जिल्ह्यातील सर्वात टॉपचा तालुका म्हणून देगलूर बिलोली चा विकास होईल याची शाश्वती देतो असे ते म्हणाले.



# जात वैधता प्रमाणपत्र निकाली काढण्यासाठी २८ नोव्हेंबरपर्यंत विशेष मोहिमेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ नोव्हेंबर**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक पाठयक्रमासाठी प्रवेशित एसईबीसी, इमाव व इतर राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी जाती दावा प्रस्ताव प्रलंबित आहेत, अशी प्रकरणे त्वरीत निकाल काढण्यासाठी १४ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत विशेष मोहिम शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष मोहिम शिबिराचा मागासवर्गीय विद्यार्थी, पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष सुनिल महिंद्रक्रर, उपायुक्त तथा सदस्य डॉ. छाया कुलाल व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव रामचंद्र वंगाटे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षामधील एसईबीसी, इमाव व इतर राखीव प्रवर्गातून प्रवेशित ज्या विद्यार्थ्याचे समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र जाती दावा प्रस्ताव दाखल होऊन त्रुटी पुर्तता अभावी प्रलंबित आहेत, अशा सर्व प्रकरणामध्ये विद्यार्थ्याचे जात वैधता प्रमाणपत्रा अभावी शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी समितीकडून त्यांना विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तसेच विद्यार्थी, पालक यांना त्यांच्या अडीअडचणीबाबत ऑनलाईन वेबिनारद्वारे मार्गदर्शन करण्यासाठी १४ ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत समितीमार्फत विशेष मोहिम शिबिर राबविण्यात येत आहे.

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नांदेड कार्यालयाचा पत्ता- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, हिंगोली रोड, ग्यानमाता शाळेसमोर, नमस्कार चौक, नांदेड-४३१६०४ येथे १४ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सन २०२४ या कालावधीत सन २०२४-२५ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित एसईबीसी, इमाव व इतर राखीव प्रवर्गातील ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे त्यांचे ऑनलाईन भरलेले प्रस्ताव दाखल केलेले आहेत. परंतु प्रस्तावातील त्रुटी पुर्तता अभावी समितीकडे त्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, अशा सर्व प्रकरणामध्ये समितीकडून अर्जदारांना ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांचे नमूद केलेल्या ईमेल आयडी द्वारे व संपर्क क्रमांकावर एसएमएसद्वारे त्रुटी पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे. अशा प्रकरणांमध्ये अर्जदार, पालकांनी विशेष मोहीम शिबिराचा लाभ घेण्यासाठी समितीस्तरावर स्वत: समिती कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच त्यांच्या प्रस्तावातील ईमेलद्वारे कळविण्यात आलेल्या त्रुटीची पुर्तताबाबत मुळ कागदपत्रे अथवा साक्षांकित सादर करावेत. जेणेकरून अशा प्रकरणांमध्ये नियमानुसार समितीकडून त्वरीत तपासणीची कार्यवाही करुन संबंधित अर्जदारांना शिबिरादरम्यान जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येणार आहे.

# एन-८ मध्येही लहुजी साळवेंना जयंतीनिमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

सिडको एन-८ येथील लहुजी चौकात आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त विविध संघटनांचे पदाधिकारी व विविध पक्षांचे कार्यकर्त्यांसह समाज बांधवांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. वस्ताद लहुजी यांच्या जीवनकार्या बद्दल माहिती दिली. यावेळी वस्ताद लहुजींच्या जयघोषाने परिसर दणाणून गेला होता.

याप्रसंगी डॉ. दिवाकर कुलकर्णी, प्रा. बी. डी. खोतकर, उत्तमराव कांबळे, किशोर दणके, प्रा. संजय गायकवाड, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गजानन कांबळे, योगेश दणके, भाऊसाहेब काळुंके, उत्तम दणके, चंद्रकांत सिरसाट, ज्ञानेश्वर हनवंते, रामदासजी गायकवाड, नागेश भालेराव, उमेश नेमाडे, कैलास पवार, राजू खाजेकर, सुरेश काळुंके, राजू अहिरे, विनोद साबळे, संदीप मानकर, अजय गाढे, मुकेश वाघुले, विशाल भालेराव, विजय अहिरे, गजानन मानकर, रवींद्र खरात, अनिल दाभाडे, किशोर भाऊ तुपे, संजय तुपे, बी. आर. पारसकर, अतुल खंडगावकर, संदीप गवळी आदी मान्यवरांसह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, समाज बांधवांची उपस्थिती होती.

# युवा तरुणाचा अब्दुल समीर यांना सकारात्मक प्रतिसाद



सिल्लोड : सिल्लोड येथील सेना भवन आणि डोंगरगाव फाटा येथे शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. अब्दुल सत्तार साहेब यांच्या प्रचारार्थ सर्व कामगार आणि युवा तरुणांशी अब्दुल समीर यांनी संवाद साधला.

कामगारांना विविध शासकीय योजनेचा लाभ देण्यासाठी व मतदारसंघाच्या उज्वल भविष्यासाठी अब्दुल सत्तार यांना पुन्हा विधानसभेवर पाठविण्यासाठी धनुष्यबाण निशाणीवर।मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र बांधकाम व इतर कामगार मंडळ अंतर्गत मतदार संघातील ६० हजार नोंदणीकृत कामगारांना आपण सुरक्षा संच पेटी तसेच गृह उपयोगी वस्तू भांडे दिले. कामगाराच्या हिताचा निर्णय घेणारे अब्दुल सत्तार यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन अब्दुल सत्तार यांनी केले.

अब्दुल सत्तार यांच्या पुढाकारातून सिल्लोड येथे एमआयडीसी उभी राहत असून नॅशनल सहकारी सूतगिरणी टेक्स्टाईल स्पार्क यासारखे प्रकल्प उभे राहत असलेले रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणारा असल्याचे अब्दुल समीर म्हणाले यावेळी शिवसेना महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते व मतदार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची शनिवारी 'दिलखुलास' कार्यक्रमात विशेष मुलाखत

मुंबई, दि.१४: राज्यात विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. बुधवार दि.२० रोजी मतदान तर शनिवार दि.२३ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. विधानसभेची ही निवडणूक नि:पक्षपाती वातावरणात पार पडावी यासाठी भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोगामार्फत काटकोरपणे तयारी करण्यात आली असून जिल्हास्तरावर यंत्रणा सज्ज झाली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी यंत्रणेच्या तयारीची माहिती जनतेला व्हावी या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात विशेष मुलाखतींचे प्रसारण होणार आहे. 'दिलखुलास' हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७ वा. २५ मि. नी प्रसारित होतो. याच विशेष मुलाखतींच्या श्रृंखलेत शनिवार दि.१६ रोजी सकाळी ७ वा. २५ मि. नी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. ही मुलाखत समरजीत ठाकूर यांनी घेतली आहे.

# शकुंतला आजींचे गृह मतदान नोंदविण्यासाठी स्वतः जिल्हाधिकारी जातात तेव्हा

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका)- श्रीमती शकुंतला मारुती अनवडे (वय ८६ वर्षे) कन्नड शहरातील शांतीनगर येथील रहिवासी. त्यांनी आज आपल्या राहत्या घरीच मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यातील सर्वच मतदार संघात गृह मतदान नोंदविण्याचे काम सुरु आहे. मात्र शकुंतला आजींचे मतदान विशेष ठरले कारण त्यांचे मतदान नोंदविण्यासाठी स्वतः जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी त्यांच्या घरी गेले होते.भारत निवडणूक आयोगाने वय वर्षे ८५ व त्यापेक्षा अधिक वय असणारे वृद्ध व्यक्ति तसेच दिव्यांग व्यक्ति ज्यांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणे शक्य नाही अशा मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी गृह मतदानाचा पर्याय देण्यात आला आहे. जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदार संघांत गृहमतदान प्रक्रिया सुरु झाली आहे. गृह मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रत्यक्ष निवडणूक यंत्रणेतील गृह मतदानासाठी नियुक्त चमू मतदाराच्या घरी जाऊन मतदाराचे मतदान नोंदवून घेतात. त्यासाठी आवश्यक ती गोपनियता पाळली जाते. मतदाराला त्याचे मतदान नोंदविण्यासाठी त्यांच्या घरात पुरेशी गोपनीयता उपलब्ध करुन दिली जाते. आज १०५-कन्नड मतदार संघात गृहभेटीद्वारे मतदानासाठी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे स्वतः चमूत सहभागी झाले.

त्यांनी श्रीमती शकुंतला मारुती अनवडे वय ८६ वर्षे यांचे मतदान नोंदविण्यासाठी आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, १०५ कन्नडचे निवडणूक निर्णय अधिकारी संतोष गोरड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर, गृह मतदान नोंदणी पथक क्रमांक १ चे अधिकारी संदीप महाजन, संदीप पाटील, श्रीमती अनिता जालनापुरकर, पोलीस कर्मचारी श्रीमती गिरी , सूक्ष्म निरीक्षक संजय देशपांडे यांच्यासह टपाली मतदान कक्षाचे योगेश मुळे व दिलीप मगर उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- १८९/२०२४.

अर्जदारः- १) भाग्यश्री दिपक जाधव, वयः २८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. घाणेगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद. २) आनंदी दिपक जाधव, वयः ०८ वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं. ०१. ३) आनश्री दिपक जाधव, वयः ५ वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं. ०१.

// विरुध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. दिपक ममराज जाधव हे दिनांकः १९/१०/२०२४ ला मौजे घाणेगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांक:- २०/१२/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- १४/११/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,
सोयगांव.


**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 232 - Kaij (S.C.) | Namita Akshay Mundada | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 232 - Kaij (S.C.)**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 109- Aurangabad East | Atul Moreshwar Save | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 109 - Aurangabad East**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Assembly - 2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 103- Bhokardan | Santosh Raosaheb Danve | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : 103 - Bhokardan**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule, President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**



उन्मेष वाघ, आयआरएस, अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए); प्रशासक चौधरी, आयएएस, संचालक, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट्स, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार; स्वाती सालगावकर, चेअरपर्सन, सीआयआय पश्चिम विभाग; ऋषि कुमार बगला, CII पश्चिम विभाग आणि सीएमडी, बीजी लाईन इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद; सौरभ सांगला, कार्यकारी अधिकारी, सिग्नेट इंडस्ट्रीज; वैभव वोहरा, व्यवस्थापकीय संचालक, कॉन्टिनेंटल कॅरियर्स.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून रोमांचक ऑफर्स

छत्रपती संभाजीनगर - टोयोटा किर्लोस्कर मोटर ने कार चाहत्यांसाठी चालू आर्थिक वर्षाचा अखेर अविस्मणीय करण्यासाठी आपल्या लोकप्रिय मॉडेल्स-ग्लांझा, अर्बन क्रूझर टेसर आणि अर्बन क्रूझर हायराइडरच्या स्पेशल लिमिटेड एडिशन लाँच करीत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नुकत्याच सादर झालेल्या फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन्सला मिळालेल्या उदंड प्रतिसादानंतर, आपल्या ग्राहक केंद्रित वचनबद्धतेच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकत टोयोटाने स्पेशल लिमिटेड-एडिशन टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरी पॅकेजेसची ग्राहकांना ऑफर दिली आहे.

## खानमिगो टूल भारतातील शिक्षकांना सक्षम बनवेल

छत्रपती संभाजीनगर - खान अकॅडमी ही कोणालाही, कुठेही मोफत, जागतिक दर्जाचे शिक्षण देण्यासाठी वचनबद्ध असलेली जागतिक ना-नफा संस्था असून खान अकॅडमीने त्यांचे एआय टूल 'खानमिगो', भारतातील सर्व शिक्षकांसाठी मोफत लाँच करण्याची घोषणा केली आहे. १४ नोव्हेंबर २०२४ पासून याची सुरवात होत आहे. या लाँचचा एक भाग म्हणून, शिक्षकांना 'खानमिगो' या टूलमध्ये 'शिक्षण सहाय्यक' म्हणून विनामूल्य प्रवेश करता येईल. इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांमध्ये 'खानमिगो' उपलब्ध असून हे एक एआयपॉवर शिक्षक सहाय्यक टूल आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सोपे व्हावे, शिक्षकांची उत्पादकता वाढावी आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण वृद्धिंगत व्हावे याकरिता हे डिझाइन केलेले आहे. खान अकॅडमी नेहमीच वचनबद्ध आहे की उच्च-गुणवत्तेची शैक्षणिक संसाधने सर्व भाषांमध्ये उपलब्ध व्हावी आणि त्यांचा प्रभावीपणे वापर व्हावा.

## स्टार रिफाइंड ऑइल मोहिमेने बरसो का भरोसा रवीना टंडनसोबत वारसा साजरा केला

पुणे : घोडावत कंझ्युमर लिमिटेड, भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या संजय घोडावत ग्रुपच्या एफएमसीजी विंगने, प्रसिद्ध अभिनेत्री रवीना टंडन अभिनीत, स्टार रिफाइंड ऑइलसाठी अधिकृतपणे एक उत्तेजक नवीन मोहीम सुरू केली आहे. सणाचा हंगाम. बरसो का भरोसा - अब नई पाहन के साथ नावाच्या या मोहिमेचा उद्देश ग्राहकांशी जोडणे आणि गुणवत्तेसाठी ब्रँडचे समर्पण अधिक मजबूत करणे हे आहे. दोन दशकांहून अधिक काळ, स्टार रिफाइंड ऑइल हे स्वयंपाकाच्या तेलासाठी एक विश्वासार्ह पर्याय आहे, महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये मजबूत स्थान राखले आहे. मोहिमेमध्ये नवीन लोगो आणि पॅकेजिंग डिझाइनसह ब्रँड रिफ्रेश आहे जे त्याचे प्रीमियम आकर्षण वाढवते. उत्पादन लाइनमध्ये १ लीटर, ५ लिटर आणि १५ लिटरच्या सोयीस्कर पॅकेजिंग आकारात सूर्यफूल, सोयाबीन आणि कापूस बियाणे तेलांचा समावेश आहे जे विविध प्रकारच्या स्वयंपाकाच्या गरजा पूर्ण करतात. स्टार रिफाइंड ऑइलने कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, बेळगाव, हुबळी, धारवाड, नाशिक, पुणे आणि मुंबई या प्रमुख क्षेत्रांमध्ये मजबूत उपस्थिती प्रस्थापित केली आहे.

## अधिक सुंदर भविष्यासाठी फर्निचर उद्योगाला नवसंजीवनी

मुंबई - एचपीएल उत्पादकांना लॅमिनेट्सला साजेशा कडांची वाणवा जाणवेपर्यंत भारतात एजबँड बरेचसे दुर्लक्षित होते. एचपीएल उत्पादकांना लॅमिनेट्ससाठी साजेशा आणि अनुरूप कडा मिळवण्यातील अडथळ्यांचा सामना करावा लागेपर्यंत भारतात एजबँडिंगचे महत्त्व अधोरेखित झाले नव्हते.वितरक असोत वा सुतार, इंटेरिअर डिझायनर्स वा आर्किटेक्ट व्यवसाय आणि व्यक्ती आता बाजारपेठेतील अधिक चांगले ट्रेंड्स आणि दर्जाला महत्त्व देणारे पर्याय याबद्दल माहिती जाणून घेणे, सजग होणे यावर भर देत आहेत. या बदलत्या स्थितीला आता 'मेक इन इंडिया' मोहिमेचेही बळ लाभले आहे. येत्या काही वर्षांत एजबँड्ससाठीची बाजारपेठ लक्षणीय प्रगती करेल, या उद्योगक्षेत्राचा कम्पाऊंड ॲन्युअल ग्रोथ रेट (सीएजीआर) १५ टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. फर्निचरचे संरक्षण करण्यासोबतच फर्निचरच्या सौंदर्यात अधिक भर टाकणाऱ्या परिणामकारक उत्पादनांची मागणी वाढत असल्याने या क्षेत्रात बरीच प्रगती साधली जाईल.

## 'दोनो' प्रीमिअर न्ड पिक्चर्सवर!

मुंबई : सज्ज व्हा एका हृदयस्पर्शी प्रवासासाठी 'दोनो'च्या प्रीमिअरसह न्ड पिक्चर्स वाहिनीवर ह्या शनिवारी, १६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता. हा चित्रपट अगदी ताज्या दमाचा आणि हलकेफुलके प्रणयी नाट्य असलेला आहे. ऑन नही, फूल ऑन मनोरंजन प्रदान करण्यासाठी मानली जाणारी वाहिनी न्ड पिक्चर्स अभिमानाने प्रस्तुत करत आहे राजश्री प्रॉडक्शन्सचा सर्वात नवीन हिरा - एक कथा जी आजच्या तरूणाईच्या आयुष्यातील एकूणच आकांक्षा आणि खासकरून प्रेम टिपते. राजश्रीच्या कौटुंबिक मनोरंजन प्रदान करण्याच्या परंपरेला दोनोमधून कायम ठेवले गेले आहे.

## सोनी सबवर 'बादल पे पांव है'

सोनी सबवरील 'बादल पे पांव है' मालिकेत बानी (अमनदीप सिद्धू) या एका महत्त्वाकांक्षी तरुणीची कथा उलगडून दाखवली आहे, जी अनेक आर्थिक समस्यांना तोंड देऊनही आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध आहे. अलीकडेच प्रेक्षकांना एक जबरदस्त धक्का बसला होता, जेव्हा रजत (आकाश आहुजा) बानीला सोडून लावण्या (भाविका चौधरी) सोबत राहण्यास निघून गेला. उद्ध्वस्त झालेली बानी आपल्या सासू-सासऱ्यांसोबत राहणे पसंत करते आणि आपले सासरे बिशन (सूरज थापर) यांच्या जोडीने काम करून कुटुंबाचा आधार बनण्यासाठी किफायतशीर वेडिंग प्लॅनिंग व्यवसाय करू लागते.

## 'सा रे ग म प' च्या सेटवर स्पर्धक जयची प्रशंसा


झी टीव्हीवरील 'सा रे ग म प' हा भारताचा सिंगिंग रिॲलिटी शो आपल्या कला, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या अचूक मिलाफासह प्रेक्षकांना थक्क करत आहे. हा मंच भावी गायकांसाठी एक व्यासपीठ बनले असून त्यांना इथे अमूल्य मार्गदर्शन आणि आवश्यक प्रसिद्धीही मिळत आहे. हा शो सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरू रंधावा अशा नवीन ताज्या दमाच्या मेंटॉर्स पॅनल आणि सूत्रधार विपुल रॉय आणि सलमान अली यांच्यासह परतला असून ह्या वीकेन्डला प्रेक्षकांसाठी पर्वणी असणार आहे कारण ख्यातनाम गायक कुमार सानू आणि गायिका अनुराधा पौडवाल हे ह्या शो च्या मंचाला भेट देणार आहेत.

## 'श्रीमद् रामायण' मध्ये सत्य हनुमानाला समजले

सोनी सबवरील 'श्रीमद् रामायण' ही भव्य दिव्य मालिका श्रीराम (सुजय रेऊ) आणि सीता (प्राची बंसल) यांची कथा सांगते. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, लव (शौर्य मंडोरिया) आणि कुश (अथर्व शर्मा) यांनी अश्वमेधाचा घोडा अडवल्यानंतर त्याच्या रक्षणार्थ आलेल्या शत्रुघ्न (सामर्थ्य गुप्ता)ला त्या जुळ्या भावंडांनी पराजित केले. आपला पराजय स्वीकारत शत्रुघ्नने बेशुद्ध होण्याअगोदर ती दोन्ही मुले सामर्थ्यशाली असल्याचे कबूल केले. कथानकातील तो एक लक्षणीय क्षण होता.

# बिबट्याच्या हल्ल्यात मुलीचा मृत्यू; वनविभागाच्या हलगर्जीपणा

### नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण



तभा वृत्तसेवा बिडकीन दि .१४ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीतील ७४ जळगाव येथे दि १३ बुधवार रोजी शेतामध्ये कापूस वेचणी करत असताना प्रणाली भरत मुळे या १० वर्षीय इयत्ता चौथी मध्ये शिकणाऱ्या मुलीवर बिबट्याने हल्ला केल्याने प्रणालीचा मृत्यू झाला याबाबत माहिती अशी की गट नंबर १९९ मधील राधाकिसन रामभाऊ मुळे यांच्या शेतामध्ये मनीषा भरत मुळे ही महिला गेली होती तिच्यासोबत तिची मुलगी प्रणाली भरत मुळे वय १० ही पण होती कापूस वेचणी करत असताना प्रणालीवर बिबट्याने साडेचार वाजता हल्ला करून तिला तुरीच्या पिकामध्ये ओढत नेत असताना सोबत कापूस वेचणी करत असलेल्या सहा ते सात महिलांनी ओरडा केल्याने बिबट्याने प्रणालीला जागेवरच सोडले मात्र त्याने तिची मान धरल्याने प्रणाली मरण पावली नंतर त्या परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्या फरार झाला दरम्यान या घटनेची माहिती वनविभागास देण्यात आली आहे तर बिडकीन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने,सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे यांनी त्वरित घटनास्थळ गाठून प्रणालीस ग्रामीण रुग्णालयात बिडकीन आणले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. निकीता जोंधळे यांनी तपासून तिला मृत घोषित केले सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी ग्रामीण रुग्णालयात प्रणालीच्या नातेवाईकाशी भेट घेऊन माहिती घेतली ग्रामीण रुग्णालय येथे प्रणालीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आणण्यात आला असून दि .१३ गुरुवार रोजी वैद्यकीय अधिकारी डॉ. निकीता जोंधळे यांनी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले,या घटनेची बिडकीन पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली.

गेली तीन ते चार महिने पासून ७४ जळगाव परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे येथील ग्रामस्थ व सरपंच गौतम सोनवणे यांनी वनविभागास कळवले होते मात्र वन विभागाने याची गंभीर दखल न घेता एक पिंजरा रोडच्या बाजूला आणून ठेवला त्यानंतर ते तिकडे पंधरा दिवस फिरकले ही नाही पिंजरा लावून वनविभागाने ग्रामस्थांची फक्त समज काढली त्यांच्या तक्रारीची गंभीर न घेतल्याने आजची वेळ आली असा आरोप सरपंच सोनवणे व ग्रामस्थ यांनी केला.

### वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी उशिरा दाखल

वनविभागास सकाळ घटनेची माहिती देऊनही वनविभागाची टीम उशिरा बिडकीन रुग्णालयात दाखल झाली, यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, पदाधिकाऱ्यांनी संताप व्यक्त केला, रात्री उशिरा घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी आडूळ विभागांच्या वनपाल कल्पना राठोड कर्मचारी प्रभाकर सोरमारे आदींच्या टीमने ग्रामीण रुग्णालयात उपस्थितांकडून घटनेची माहिती घेत ७४ जळगाव कडे रवाना झाल्याची माहिती अमोल एरंडे यांनी दिली

### एकाच दिवशी दोन घटना वनविभागाचे दुर्लक्ष

७४ जळगाव परिसरातील शेतात बिबट्याच्या हल्ल्यात 10 वर्षीय मुलीचा मृत्यु झाल्याची घटना ताजी असतानाच बुधवारी रात्री तोंडोळी येथील बाबासाहेब सखाराम तांबे.रा.दगडखाणी यांच्या घरासमोर उशिरा रात्री बिबट्याने बकरीवर हल्ला केल्याने यामध्ये बकरीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून घटनेमुळे लोहगाव सर्कल मधील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे अजूनही याकडे वन विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे.

# रेकीतज्ज्ञ राजेश्वरी मोदी देणार आजीवन सुखी राहण्याचा मंत्र

## रविवारी कांचनवाडीत कार्यक्रम

संभाजीनगर/प्रतिनिधी

नारायण रेकी सत्संग परिवाराच्या संस्थापिका तथा आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्त्या, रेकीतज्ज्ञ राजेश्वरी मोदी उर्फ राजदीदी रविवारी, १७ नोव्हेंबरला शहरात येणार आहेत. गुलमंडी, राजाबाजार प्रभाग माहेश्वरी समाजातर्फे सकाळी ९ ते दुपारी १ पर्यंत वाल्मीसमोरील कल्याण सेलिब्रेशन हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात राजदीदी शहरवासीयांना आजीवन सुखी राहण्याचा मंत्र देणार असल्याची माहिती पत्रपरिषदेत दिली.

एनआरएसपीच्या संस्थापक राजेश्वरी मोदी रेकी ग्रँडमास्टर, क्युप्रेशर, थेरपिस्ट आणि उत्कृष्ट सल्लागार आहेत. आपण जर विचार, शब्द आणि कृतीत सकारात्मक असलो तर आपण '७ स्टार' आयुष्य जगू शकतो. त्यांना राजस्थान शिरोमणी पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी ३५ वर्षांपासून सामाजिक कार्याला वाहून घेतले आहे. स्वत: विकसित केलेल्या 'नारायण रेकी', 'करुणा रेकी', आणि 'वरदान रेकी' तंत्रांद्वारे सेवारत असून, हजारो लोकांना याचा फायदा झाल्याचा दावा प्रभाग प्रमुख वल्लभ दरक यांनी केला. त्या प्रेरक वक्ता असून, सकारात्मकता, आनंद आणि यश यावर सत्रे आयोजित करतात. प्रत्येकाला सकारात्मक जीवन जगण्यासाठी प्रेरित करतात. 'खुशियों का खजाना', 'सतयुग का सफर', 'यु करे भाग्य का निर्माण', आणि 'लक्ष्य प्राप्ती मंत्र' ही सत्रे आयोजित केली जातात.

नारायणप्रसादीचेही आयोजन

गुलमंडी राजबजार प्रभाग सदैव समाजकल्याणच्या कार्यासाठी अग्रेसर आहे. त्यांनी केवळ माहेश्वरीच नव्हे, तर सर्व समाजाला लाभ होण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन केले असून, नारायणप्रसादीचेही आयोजन केले आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यप्रमुख श्रीवल्लभ (शीतल) दरक यांच्यासह सरिता मालाणी, पल्लवी मालाणी, वैशाली गट्टानी, शुभम चांडक, जीतू झंवर, राजेश गट्टानी, विजया तापडिया, सीमा दरक, सीमा मालपाणी, विशाल बजाज, सपना मुंदडा यांनी केले आहे.

# श्री.क्षेत्र कचनेर वार्षिक यात्रा महामहोत्सवाची धर्म ध्वजारोहणाने भव्य सुरवात

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ चिंतामणी पाश्श्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर ता.जि.औरंगाबाद येथे आजपासुन चार दिवसीय वार्षिक यात्रा महोत्सवाल मोठया उत्साहाने सुरैवात झाली. मुनिश्री समता सागर महाराज विहर्ष सागरजी महाराज ससंघाच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने करण्यात आले

सर्व प्रथम यात्रा महोत्सवाचे महाप्रसाद आयोजन कर्ता धर्मानुरागी दानशूर अर्पण ग्रुप चे श्री जयकुमारजी अमितजी अभिजितजी सुमितजी कासलीवाल ( जैन ) परिवार गल्लीवाला, श्री प्रमोदकुमारजी( पप्पू ) निशांत कासलीवाल परिवार गल्लीवाला, श्री रितेशजी राहुलजी कैलासजी पाटणी परिवार अंधारीवाला, श्री आशिषजी स्वप्नीलजी अशोककुमारजी छाबडा परिवार तांडापूरवाला, श्री सुमितजी संयोगजी सुभाषचंदजी गंगवाल परिवार पुरीवाला पैठण , श्री डॉ अनिलकुमारजी डॉ चेतन नितेश डॉ कार्तिक चि. कबीर कासलीवाल आडूळवाला बालानगर पैठण, श्री माणिकचंदजी राजेंद्रजी डॉ पवनजी डॉ किशोरजी अपनजी चि. तिर्थ बडजाते नांदरवाला पैठण, श्री बाबुलालजी राकेशकुमारजी चेतनकुमारजी पांडे साष्टपिंपळगाववाला,क्षेत्राचे सुरेश कासलीवाल, वृषभ गंगवाल,महामंत्री विनोद लोहाडे, एम.आर.बडजाते, संजय




कासलीवाल, मुकेश कासलीवाल, जयेश काला, हेमंत बाकलीवाल, नितीन गंगवाल, राजेंद्र कासलीवाल, प्रकाश गंगवाल, निलेश काला, किरण मास्ट सर झूंबरलाल रावका यांच्या हस्ते ध्वजारोहणाने केले

तदनंत भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी भगवंताचे सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचे सौभाग्य शैला नेमीचंद देशमाने यांना मिळाला, तर दुग्ध अभिषेकाचा मान झुंबरलालजी रावका परिवार यांना मिळाला तर सर्व औषधीचा मान प्रकाशचंद कस्तुरचंद कासलीवाल व अभय कासलीवाल यांना मिळाला, तसेच मंगल आरतीचा मान एम.आर.बडजाते यांना मिळाला. तसेच भगवंताचे शांतीमंत्राचा मान सौभाग्यसागरजी महाराज गुरैभक्त परिवार यांना मिळाला तसेच अर्चनाफळ चढविण्याचा मान सौ. सुनिता प्रमोदकुमार कासलीवाल यांना मिळाला. यावेळी जैनेश्श्वरी दिक्षार्थी यांचा क्षेत्राच्या वतीने ओटी भरण्यात आली व त्यांचे अभिनंद करण्यात आले. .

यावेळी मुनिश्री विहश सागरजी महाराज यांनी दिक्षार्थींना आर्शिवाद प्रदान केला व मुनिश्री म्हणाले की मोठया पुण्याच्या उदयाने दिक्षाचे भाव उत्पन्न होतात व जैनेश्श्वरी दिक्षा ही मोक्षाची निशाणी आहे. मनुष्य जीवन हा चार भागमध्ये विभागला गेला आहे. ब्रम्हचर्य्र, ग्रहस्थ, वानप्रस्त व सन्यास प्रत्येक जीव हिच भावना भात असतो जेव्हा जीवनाचा अंत येईल तेव्हा आपली आत्मा साधु संत व्हायला पाहिजे असे सांगीतले. तसेच जैनेश्श्वरी दिक्षाचे महत्व उपस्थितांना आचार्यश्रींनी विशद केले. महोत्सव प्रसंगी औरंगाबाद, मुंबई, पुणे, लखनउै, नागपुर, हैद्राबाद, इंदौर, कोल्हापुर, सातारा, सांगली, देउैळगांवराजा, जालना आडुळ, पाचोड, एलोरा, कचनेर, सिल्लोड, कन्नड,गेवराई आदी ठिकाणाहुन भविक उपस्थित होते.

या चार दिवस चालणा-या यात्रा महोत्सवात राज्यभरातुन हजारोच्या संख्येने भाविक दाखल झाले आहे. ठिकठिकाणाहुन पायी यात्रेकरैच्या दिंडयाही क्षेत्रावर दाखल झाल्या आहेत यामध्ये परभणी, षहिंगोली, केसापुरी, आष्टी, मुरैड, वडोदबाजार, श्रीरामपुर, षचिखली, जालना, जितुर,औरंगाबाद,कळमनुरी,सेलु, मानवत आदी ठिकाणाहुन दाखल झाल्या आहेत.

यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी डी. यु. जैन ( अध्यक्ष विश्वस्थ मंडळ ) ,सुरेशकुमार कासलीवाल ( मॅनेजिंग ट्रस्टी ), संजयकुमार कासलीवाल ( उपाध्यक्ष विश्वस्थ मंडळ ), महेंद्रकुमार काले, सुभाषचंद बोहरा, ललितकुमार पाटणी, भरतकुमार ठोळे, रविंद्र खडकपुरकर, एम. आर. बडजाते, प्रमोदकुमार कासलीवाल, फुलचंद इंगलवार, ऋषभकुमार गंगवाल ( अध्यक्ष कार्यकारिणी मंडळ ), विनोदकुमार लोहाडे ( महामंत्री ), हेमंतकुमार बाकलीवाल ( उपाध्यक्ष कार्यकारिणी मंडळ ), महेंद्रकुमार ठोळे ( उपाध्यक्ष कार्यकारिणी मंडळ ), मुकेशकुमार कासलीवाल ( उपमहामंत्री ) आदी प्रयत्न करीत आहेत.



# विकासकामांसाठी घेतलेली पुढाकाराची पोचपावती...



सकल मातंग समाज, सकल धनगर समाज,अर्जुनअस्त्र फाउंडेशन, सह्याद्रीचा छावा संघटना, सकल धनगर मल्हार सेना, संभाजी सेना संघटना, छावा मराठा संघटना, आदींनी देखील पूर्व मतदार संघातील महायुतीचे उमेदवार श्री अतुल सावे यांना जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

छत्रपती संभाजीनगर : न्यू हनुमान नगरच्या मराठा समाजाने महायुतीचे उमेदवार श्री अतुल सावे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. मागील दशकभराच्या काळात अतुल सावे यांच्या नेतृत्वाखाली गारखेडा परिसरातील अनेक महत्वाची विकासकामे यशस्वीरीत्या पूर्ण झाली. या कामांची पोचपावती देत मराठा समाजाच्या प्रमुख सदस्यांनी विधानसभा निवडणुकीत श्री सावे यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे.

मराठा समाजाच्या वतीने श्री अनुराग सावे यांना पाठिंबा पत्र गुरुवारी सुपूर्द करण्यात आले, ज्यामध्ये नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी अतुल सावे यांच्या भरीव प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले आहे. परिसरातील रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा व वीज यांसारख्या सुविधांमध्ये झालेली सुधारणा ही सावे यांच्या विकासविषयक दृष्टिकोनाची साक्ष देते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये आशादायक वातावरण तयार झाले आहे.

यावेळी रामेश्वर सोनवणे पाटील, सुनील लुटे पाटील, रामेश्वर बोडखे पाटील, हरिश्चंद्र भोसले पाटील, गजानन मदन पाटील, ज्ञानेश्वर चव्हाण पाटील यांच्यासह अनेक मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.







सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरणार

वाळूज महानगर प्रतिनिधी: मतदान करण्यासाठी फक्त मतदान कार्डच पाहिजे असे नाही या व्यतिरिक्त १२ प्रकारचे ओळखपत्र मतदान करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

## आज 'उद्यमी मराठवाडा' युवा उद्योजकांचे संमेलन

छत्रपती संभाजीनगर : महात्मा फुले कृषी प्रतिष्ठानच्या वतीने शुक्रवार, १५ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे 'उद्यमी मराठवाडा' या यशस्वी युवा उद्योजकांच्या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन शहरातील तापडिया नाट्यगृह, निराला बाजार येथे शुक्रवार रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५:३० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. संस्थेच्या सावड (सस्टेनेबल अँड व्हायबल ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ऑफ मराठवाडा) या प्रकल्पा अंतर्गत आयोजित करण्यात येत असलेल्या 'उद्यमी मराठवाडा' संमेलनात मराठवाड्यातील सक्रिय शेतकरी उत्पादक कंपन्या, लाकडी तेल घाणे उद्योजक तसेच महिला उद्योजिका व युवा उद्योजक सहभागी होणार आहेत. मराठवाड्याच्या विकासासाठी भरीव योगदान देत असणाऱ्या अशा उद्योजकांना एका व्यासपीठावर आणून त्यांचे अनुभव, प्रशिक्षण, व्यावसायिक मार्गदर्शन, परिचय व परस्पर पूरकता निर्माण करणे आवश्यक आहे.

## हयातीचा दाखला पोस्टातून काढण्याची सुविधा

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका)- पेन्शन धारकांना आपले हयात प्रमाणपत्र नोव्हेंबर महिन्यात द्यावे लागते. त्यासाठी पेन्शन कल्याण विभाग आणि पोस्ट विभाग यांच्यावतीने बायोमेट्रिक प्रणालीद्वारे पोस्टमन किंवा शाखा डाकपाल मार्फत हे प्रमाणपत्र काढता येते. पोस्टमन किंवा शाखा डाकपाल ही सुविधा अगदी घरपोहोचही देऊ शकतात. तरी विभागातील पेन्शनधारकांनी आपले हयात प्रमाणपत्र पोस्टातून काढावे असे आवाहन प्रवर डाक अधीक्षक छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## पंडीत जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका)- देशाचे प्रथम पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगिता राठोड, नायब तहसिलदार मनोज बारवाल, श्रीमती वसुधा बागुल तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रामीण भागातील महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे : दिलीप स्वामी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- ग्रामिण भागातील महिलांची मतदानाची आकडेवारी बघता मोठ्या प्रमाणात महिलांनी मतदान करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले

शहरातील जवाहर नवोदय विद्यालयात आयोजित अंगणवाडी सेविका,आशा सेविका,महिला बचत गटांच्या कार्यक्रमाला त्यांनी संबोधित केले पुढे बोलताना ते म्हणाले की कन्नड सोयगाव विधानसभा क्षेत्रात ग्रामीण भागातील महिलांच्या मतदानाची आकडेवारी वाढावी यासाठी प्रशासन भर देत आहेत,मतदान केंद्रावर महिलांसाठी सर्व सुविधां उपलब्ध करण्यात येणार आहे,



**लोकसभे पेक्षा विधानसभेला मतदानाची आकडेवारी अधिक प्रमाणात करणार आहे पण लोकसभेचे मानधन अद्याप पर्यंत मिळाले नसून निदान विधानसभेचे मानधन तरी लवकर मिळावे अशी अपेक्षा आशा सेविका जनाबाई नेटके यांनी व्यक्त केली.**

**या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी येणार असल्याने दांडी मारणारे अधिकारी, कर्मचारी दिसून आले,एरवी कार्यालयात न दिसणारे अधिकारी, कर्मचारी आज मात्र हजर होते**

पाळणाघर,वैद्यकीय पथक,प्रसूत महिलांसाठी रांगेत न थांबता सरळ मतदान,वयोवृध्द,दिव्यांगासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे

बचत गट,अंगणवाडी सेविका, आशासेविका,यांची कामगिरी उत्कृष्ठ असून लोकसभेला मोठ्या प्रमाणात त्यांनी मतदान जनजागृती केल्याने मतदानाची आकडेवारी वाढली आहे,त्याचीच पुनरावृत्ती विधानसभेला करावी असे ते म्हणाले कार्यक्रमाच्या सुरुवातीला भाऊसाहेब सोननिस, प्रवीण दाभाडे यांनी मतदान जनजागृती पर गीत सादर केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवडणूक अधिकारी संतोष गोरड यांनी केले तर आभार प्रदर्शन सहाय्यक निडणुक अधिकारी विद्याचरण कडवकर यांनी केले सूत्रसंचालन योगेश पाटील यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

## हर्षवर्धन जाधवाच्या व्यासपीठावर शिवसेना, राष्ट्रवादी नाराज गटाचे पदाधिकारी

तभा वृत्तसेवा

कन्नड : निडणुकीच्या रणधुमाळीत कन्नड सोयगाव विधानसभेत राजकीय घडामोडीना वेग आला असून,शिवसेना शिंदे गट,राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नाराज पदाधिकारी हतनुर ता.कन्नड येथील सभेत दिसून आल्याने मोठा चर्चेचा विषय झाला आहे

दि.१४ रोजी सायंकाळी अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांची प्रचारार्थ सभा हतनुर येथे झाली या सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) माजी आमदार नितीन पाटील गटाचे पदाधिकारी तर शिवसेना (शिंदे) माजी तालुकाप्रमुख केतन काजे गटाचे पदाधिकारी उपस्थित होते

तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांचे निलंबन केल्याने नाराज झालेले पदाधिकारी



महायुतीच्या उमेदवार असलेल्या संजना जाधव यांच्या विरोधात प्रचार करताना दिसून आल्याने पक्षश्रेष्ठींनी केलेल्या कारवाईमुळे मोठ्या प्रमाणात मतदानावर फटका पडण्याची चित्रे दिसत आहे, तर एकीकडे माजी आमदार नितीन पाटील यांचे तालुक्यात त्यांना मानणारा वर्ग असून त्यांनी सुद्धा युती धर्म न पाळता माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांना पाठींबा दिल्याने महायुतीच्या अडचणीत वाढ झाल्याचे चित्र आहे

एकूण तालुक्याच्या राजकारणात मोठी उलथापालट होताना दिसून येत असल्याने सामान्य नागरिक सुद्धा संभ्रमात आहे,हर्षवर्धन जाधवांना मिळालेल्या पाठींब्यामुळे त्याचे गणित सोयीस्कर होत आहे अशी चर्चा तालुक्यात रंगताना दिसून येत आहे यासभेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) कैलास अकोलकर,साहेबराव अकोलकर,गंगा मोहिते,बाळू परांडे होते तर शिवसेना (शिंदे गट) वैभव सरोवर,सचिन जाधव,प्रताप सूर्यवंशी,सतीश शेळके,सोमनाथ जाधव,राहुल बोलधने,साई कोरडे,विशाल कोरडे सह पदाधिकारी कार्यकर्ते होते.

## २६ नोव्हेंबरला ठाण्यात लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारोह

### 'मृदगंध पुरस्कार-२०२४' चेही वितरण

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : संगीत नाटक अकादमी पुरस्कारप्राप्त लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या १४ व्या स्मृतीदिनानिमित्त १४ वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृतीसंगीत समारोह मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त विठ्ठल उमप फाउंडेशनचा 'मृदगंध पुरस्कार-२०२४' चे वितरण करण्यात येणार आहे. याप्रसंगी कलेच्या विविध क्षेत्रातील कलावंत आपला कलाविष्कार सादर करून लोकशाहीर विठ्ठल उमपांना सांगितिक मानवंदना देणार आहेत. याप्रसंगी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना सन्मानपूर्वक विठ्ठल उमप फाउंडेशनचा 'मृदगंध पुरस्कार-२०२४' प्रदान करण्यात येणार आहे.

प्रमुख अतिथी म्हणून अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, 'कालनिर्णय' चे संपादक जयराज साळगावकर, ठाण्याचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी उपस्थित राहणार आहेत. २६ रोजी ठाण्यातील काशीनाथ घाणेकर नाट्यगृहात सायंकाळी ६ वा. कार्यक्रम सादर होणार आहे.

जीवन गौरव पुरस्कार पुरुषोत्तम बेर्डे, लेखक व पत्रकार ज्ञानेश महाराव, लोककला क्षेत्र सुरेखा पुणेकर, सामाजिक क्षेत्र श्रीगौरी सुरेश सावंत, अभिनय व सूत्रसंचालक आदेश बांदेकर, अभिनेत्री व निर्माती सुचित्रा बांदेकर, संगीत क्षेत्रातील नवोन्मेष प्रतिभा रोहित राउत, क्रीडा क्षेत्र दीपाली देशपांडे आदी पुरस्कारांचे मानकरी आहेत. शाल, पुष्प, पुस्तक, मानपत्र व विठ्ठल उमपांची प्रतिकृती असलेले मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## उस्मानपुरा भागातील शेकडो तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

### तरुणांनी महाविकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांच्या विजयात मोलाचा वाटा उचलावा - राजू वैद्य

छत्रपती संभाजी नगर: विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) चे जिल्हा प्रमुख त्रिंबक तुपे, महानगर प्रमुख राजू वैद्य, महा विकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत रत्नदीप उफाडे आणि विकास राजगिरे यांच्या सह उस्मानपुरा भागातील शेकडो तरुणांनी शिवसेनेत ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा दि. १४ नोव्हेंबर गुरुवार रोजी पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेनेने महानगर प्रमुख राजू वैद, शहर प्रमुख हरिभाऊ हिवाळे, उपजिल्हा प्रमुख गिरिराज हाळनोर, संतोष खेडके, विधान सभा संघटक दिग्विजय शेरखाने, कांतीलाल नीलपगारे, बापू कवले, विजय काळे, नंदू लकडे, जयंत जावळे, निर्मळ कनघरे, नाना निळे, गिरीश चपळगावकर





### गांधेलीच्या तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

छत्रपती संभाजीनगर: विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख त्र्यंबक तुपे, महाविकास आघाडीचे उमेदवार राजू भाऊ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत गांधेली येथील तरुणांनी बुधवारी दि. १३ नोव्हेंबर रोजी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा महाविकास आघाडीचे उमेदवार राजु शिंदे यांच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयात पार पडला. प्रवेशकर्त्यात गयास पठाण, समीर शेख, अतिक शेख, फईम बेग, समद शेख, मुख्तार शेख, पप्पू शेख , अज्जू शेख, मोहसीन भाई, इमरान शेख, सय्यद निसार, यश सावंत , साहिल शेख , फिरोज पठाण , सरफराज शेख , सिराज शेख, आदी सावंत, रफिक शेख, साबीर खान, अलीम शेख आदींचा समावेश आहे.

### डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चा जाहीर पाठिंबा

महा विकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे यांना डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. यावेळी अध्यक्ष सुकुमार कांबळे बीड, प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांची उपस्थीती होती.

आदींची उपस्थिती होती. प्रातिनिधिक स्वरूपात रत्नदीप उपाडे आणि विकास रजगिरे यांच्या गळ्यात शिवसेनेचे उपरणे टाकून मान्यवरांच्या उपस्थितीत प्रवेश करून घेतला. यावेळी शिवसेनेचे महानगर प्रमुख राजू वैद्य यांनी उपस्थीत तरुणांना संबोधित केले. ते म्हणाले, कि वाऱ्याची दिशा ओळखणारा तरुण वर्ग आहे. विकासासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा. महा विकास आघाडीचे उमेदवार राजू शिंदे हे खात्रीने निवडूण येणार आहेत. मात्र आपण गाफील न राहता आपण आपल्या वॉर्डात स्वतः जाऊन मशाल या चिन्हावर मतदान करून घ्यावे. आणि राजू शिंदे यांच्या विजयाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले. यावेळी श्री सावंत यांनी देखील दिवस थोडे उरले आहेत. आता राजू शिंदे यांना मताधिक्याने निवडून आणण्यासाठी तयारीला लागा, असे आवाहन केले. यावेळी रूपेश कसबे, रवी कसबे, करण चौथमल, रोहीत हिवराळे, तुषार चाबुकस्वार, रोहन जाधव, आदित्य म्हस्के, अजय पट्टेकर, अशोक आठवले, आकाश साळवे, मुक्तेश गवळी, किशोर गायकवाड आदिंसह शेकडो तरुणांनी शिवसेनेत जाहिर प्रवेश केला.

## संत तुकारामांचे अभंग, आनंद निर्मितीचा आधारस्तंभ होत : ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

संभाजीनगर - जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांची अभंगवाणी मानवी जीवनात मानसिक व वैचारीक रोगाचा शिरकाव होऊ न देण्याचा आणि मानवी जीवन आनंदमय ठेवण्याचा आधारस्तंभ असल्याने महाराजांचे अभंग वाचले व अनुभवले पाहीजेत, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज ३७५ व्या वैकुंठागमन सोहळयानिमित्त, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समिती व्दारा आयोजित तुकोपनिद्-गाथा अष्टादशाह कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी तुकाराम गाथेतील वीस अभंगावर प्रवचन सेवा करण्याचे सेवाभाग्यसंधी जालन्याचे ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांना मिळाली. ह. भ. प. डॉ. नारायण जाधव बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या या कार्यक्रमात बोलतांना त्यांनी



संत तुकारामांच्या गाथेचा अभ्यास करणे म्हणजे मानवी जीवनाचा सर्वांगिण अभ्यास करणे होय. हा अभ्यास केवळ आनंदच देतो असे नाही तर जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील समस्यावर, अडीअडचणीवर मात करुन योग्य प्रकारे मार्गक्रमण करता येण्यासारखा मार्गही दाखवण्यास मदतीचा ठरतो, असे म्हटले. महाराजांनी अंधश्रध्दा, काम, क्रोध, मत्सर, व्देष, अहंकार, मीपणा अशा सहजासहजी नष्ट न होणाऱ्या व मानवालाआणि पर्यायाने समाजाला रोगग्रस्त करणाऱ्या बाबींवर प्रचंड प्रहार केल्याचे त्यांनी सोदाहरण सांगितले. महाराजांची गाथा समजून घेणारा व्यक्ती नकारात्मक मनोवृत्ती, वैचारिकता आणि वृत्तीतून पूर्णत: बाहेर पडतो. त्यामुळे न दिसणाऱ्या; पण व्यक्तींवर आणि पर्यायाने समाजावर विपरित परिणाम करणाऱ्या मानसिक व वैचारीक रोगांवर आपोआप प्रतिबंध बसून माणूस अशा रोगांपासून मुक्त होऊन आनंदी जीवन जगतो. अर्थात, महाराजांची गाथा माणसाला स्वार्थ, अहंकार, इर्षा, तणाव, क्रोध, नकारात्मक दृष्टी अशा रोगातून मुक्त करते. त्यामुळे तुकोबांची गाथा म्हणजे निरोगी समाजाचे प्रतिबिंब व निरोगी समाज निर्मितीचा तसेच मानवी जीवनाच्या आनंदाचा आधारस्तंभ होय, असे फड म्हणाले. संगीत तज्ञ किशोर कुलकर्णी, श्री माऊली भजनी मंडळाचे मार्गदर्शक तथा गायनाचार्य ह. भ. प. दिगंबर म्हस्के माऊली, बाळासाहेब खरात, अनिल वडगावकर, रमेश केसकर, दर्शन आगवान, ज्ञानदास भगिणी इंद्रायणी मुंढे, प्रा. दत्तात्रय डुंबरे आदी उपस्थीत होते.

## मुतारी बांधू शकले नाही ते विकास काय करणार - डॉ. सोमवणे

रांजणगाव प्रतिनिधी : गंगापूर शहरात पाच मुतारी पंधरा वर्षात आमदार बांधू शकले नाही त्यामुळे त्यांच्याकडून तालुक्याचा विकास होईल याची अपेक्षा करू नका अपक्ष उमेदवार डॉक्टर सुरेश सोनवणे यांनी गंगापूर शहरात संवाद दौऱ्या दरम्यान सांगितले.

गंगापूर शहरांमध्ये अपक्ष उमेदवार डॉ सुरेश सोनवणे यांनी वेगवेगळ्या ठिकाणी भेटी दिल्या व मतदारांशी संवाद साधला.

यावेळी शहरातील मुख्य बस स्टँडची दुरावस्था झाली असून पूर्ण शहरांमध्ये पंधरा वर्षांमध्ये पाच सुलभ शौचालय आमदार बांधू शकले नाही लाडके बहीण योजनेचा गाजावाजा करणाऱ्या आमदारांनी आपल्या मतदार संघातील लाडकी बहिणीच्या इज्जतीबाबत आणि सुरक्षेबाबत विचार करणे गरजेचे असताना निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजनेतून तालुक्यातील महिलांना मोठा



लाभ झाला असा गाजावाजा करत आहे सरकारी योजना ह्या आपल्या हक्काच्या असतात परंतु मुख्य सुविधा देणे त्यासाठी निधी आणणे हे आमदाराचे काम असते परंतु मागील पंधरा वर्षात प्रशांत बंब हे या कामात सपशेल अपयशी ठरले आहे.तर सतीश चव्हाण हे मागील सतरा वर्ष पदवीधर आमदार असून देखील तालुक्यात कधी डोकुन पाहिले नाही परंतु निवडणुकीच्या तोंडावर गावागावात विकासाची गंगा आणल्याचा दावा करत आहे. हे फक्त पैसे कमावण्यासाठी राजकारण करतात. पैसा कमवायचा त्या बाळावर निवडणूका लढवायच्या आणि पाच वर्ष मतदारसंघात फिरून देखील बघायचं नाही ही यांची काम आहेत त्यामुळे आता योग्य वेळ आहे तुमच्यासमोर पर्याय आहे योग्य विचार करून मतदान करा असे आवाहन अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांनी यावेळी केले.प्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## राष्ट्रीय स्तरावर चमकली टीम मेकव्हेंजर्स: स्मार्ट इंडिया हैकाथॉन २०२४ फायनमध्ये देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा गौरव

छत्रपती संभाजीनगर:- देवगिरी अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यायाच्या टीम मेकव्हेंजर्सने स्मार्ट इंडिया हैकाथॉन (डखक) २०२४ च्या ग्रँड फायनलसाठी स्थान मिळवुन एक अभूतपुर्व कामगिरी केली आहे. देशभरातून ४,९२,९६० विद्यार्थ्यांनी ५७,००० पेक्षा जास्त कल्पना सादर केल्यावर, टीम मेकव्हेंजर्स एकमात्र टीम जिने भारत सरकारच्या उर्जा मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या समस्यावर अभ्यासपुर्वक काम करत समाधान देत राष्ट्रीय स्पर्धेच्या फायनलमध्ये पोहोचली आहे, ही असाधारण सफलता त्यांच्या अथक परिश्रम, सर्जनशीलतेचा आणि तांत्रिक कौशल्याचा परिणाम आहे. जी देवगिरी महाविद्यालयाच्या परीवारासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.

टीम मेकव्हेंजर्स जी देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत आहे, यात दुसऱ्या वर्षाचे यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी सहभागी आहेत यात प्रसाद पवार, अपुर्वा लकडे, प्राजक्ता जाधव, गौरांग माकोडे, भुमिका पाटील व चेतन जाधव या सर्वांनी एकत्र येऊन ॲश युटिलायझेशन युनिट नावाचा एक अत्यंत प्रभावी प्रकल्प तयार केला आहे जो देशातील इतर उत्कृष्ट कल्पनांच्या तुलनेत खास ठरला



आहे. ॲश युटिलायझेशन युनिट प्रकल्प हे थर्मल पॉवर प्लांटमधून निर्माण होणाऱ्या कोळस्याच्या राखेचे व्यवस्थापन आणि पुर्नवापर करण्याच्या अंत्यत महत्वाच्या मुद्दयावर लक्ष केंद्रीत करतो. कारण राखेचे योग्य प्रकारे व्यवस्थापन न केल्यास ते पर्यावरणासाठी गंभीर धोका ठरु शकते. या टीमने कोळशाच्या राखेचा आणि पॉलीथीलीन टेरेफ्थेलेटचे मिश्रण करुन एक टिकाऊ कॉम्प्रेसिव्ह स्ट्रेंन्थ सहन करणारे साहीत्य व साहीत्य तयार करणारे यंत्र विकसीत करत आहे. ज्याचा वापर बांधकाम व इतर श्रेत्रामध्ये केला जाऊ शकतो. या प्रकल्पाचे उद्दीष्ट कोळशाच्या राखेचा वापर करणेच नाही तर रिसायकल पॉलीथीलीन टेरेफ्थेलेटचा समावेश करुन एक पर्यावरणपुरक उपाय सादर करणे आहे. ज्यामुळे दोन पर्यावरीणीय समस्याचा एकाचवेळी सामना केला जाऊ शकतो. टीमचा टेक्नीकल दृष्टीकोण टिकाऊपणा व हवामान प्रतिरोधकता सारख्या विविध प्रकारावर आधारीत आहे. ज्यामुळे हे मिश्रित साहीत्य पांरपारीक बांधकाम सामुग्रीसाठी एक प्रभावी पर्याय ठरु शकतो. त्याच्या इनोव्हेटीव टिकाऊ अभियांत्रिकी उपायाने स्मार्ट इंडिया हैकाथॉन चे उद्दीष्ठ सर्वोत्तम तयार करा आणि रुपांतरीत करा चे एक आदर्श उदाहरण साकारले आहे.

स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारीणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ. सचिन बोरसे, डॉ. सुगंधा असोदेकर, डॉ. आरती वाढेकर, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, प्रा. संजय कल्याणकर, डॉ. राजेश औटी, श्री. अच्युत भोसले यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना डॉ. सचिन अग्रवाल व प्रा. अमोल वखरे यांचे मार्गदर्शन लाभले.



# मतदान करताना...

**निवडणूक कुजबूज**

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांची मतदान प्रक्रिया २० नोव्हेंबरला पार पडणार आहेत. या मतदानामध्ये सहभागी आपले लोकशाहीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी आपण सारेच उत्सुक आहोत. मतदानात सहभागी होण्यासाठी मतदार ओळखपत्राशिवाय अजून १२ प्रकारची ओळखपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. मतदार ओळखपत्र सादर करता येत नसेल तर आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागाद्वारे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅनकार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तवेज, केंद्र अथवा राज्यशासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधान परिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळख पत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे पुरावे मतदानासाठी स्वीकारले जाणारा आहेत. अनिवासी भारतीयांना त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक आहे. ओळखपत्र जवळ ठेवा. मतदान करा. लोकशाहीतला आपला हक्क बजावा. आपले सरकार निवडून द्या.




# महाराष्ट्रामध्ये 'हरियाणा' पॅटर्न

**महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा समाजाचे नेहमीच वर्चस्व राहिले आहे आणि सर्व राजकीय पक्ष या समाजाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र या वेळी भाजपने संपूर्ण निवडणूक प्रचारामध्ये मराठ्यांबरोबरच ओबीसी समाजाला महत्त्व दिले आहे, असे दिसते**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या महाराष्ट्रातील निवडणूक प्रचारसभांमध्ये 'काँग्रेस विभाजनाचे राजकारण करत असून जातगणनेच्या माध्यमातून एका जातीला दुसऱ्या जातीविरुद्ध उभे करायचे आहे', असे म्हटले आहे. पंतप्रधान म्हणाले, की काँग्रेसला अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी समाजाची प्रगती नको आहे. मंडल राजकारणाच्या आगमनानंतर ओबीसी जाती एकवटल्या आणि काँग्रेस सतत खालावत चालली आहे आणि त्यामुळे काँग्रेसला ओबीसी समाजाची एकजूट कमकुवत करून तोडायची आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी गेल्या काही वर्षांपासून राजकारणामध्ये ओबीसींच्या हक्क आणि सहभागासाठी सातत्याने आवाज उठवत आहेत. मोदी यांनी 'एक है तो सेफ है'चा नारा दिला, तर याआधी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी 'बाटेंगे ते काटेंगे' या घोषणेद्वारे हिंदू जातींच्या ऐक्याची भाषा केली. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीचे आंदोलन तीव्र झाल्याने महाराष्ट्रातही ओबीसी विरुद्ध मराठा समाज असा संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. मंडल आयोगाच्या अहवालानंतर ओबीसी समाजाला आरक्षण मिळाले; मात्र मराठा समाज सातत्याने आरक्षणाची मागणी करत आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाची राजकीय ताकद पाहून अनेक राजकीय पक्षांनी मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी समर्थन दिले; परंतु ओबीसींचा मराठा समाजाला आरक्षण देण्यास विरोध आहे.



महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाजाची लोकसंख्या ३८ टक्के तर मराठा समाजाची लोकसंख्या ३३ टक्के आहे. महाराष्ट्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती आघाडीला मराठा समाजाचे प्राबल्य असलेल्या जागांवर राजकीय फटका बसल्याचे सांगण्यात आले. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला मोठा फटका बसला. महायुती सरकार विशेषतः एकनाथ शिंदे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाच्या बाजूने आहे, असे वाटल्याने लोकसभा निवडणुकीमध्ये ओबीसी मतदार भाजपवर नाराज होते. लोकसभा निवडणुकीमध्ये हा समाजही भाजपपासून दूर गेला; परंतु लोकसभेला बसलेल्या फटक्यानंतर महायुतीने जरांगे यांना अजिबात किंमत दिली नाही. आता जरांगे यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ओबीसी मतदार पाठीशी राहावेत, म्हणून भाजप सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या निकालांवरून दिसून आले आहे, की महाविकास आघाडीसोबत मराठा समाज अधिक दिसत आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी १७५ जागांवर ओबीसी मतदार आहेत, तर मराठा समाजाचा प्रभाव बहुतांशी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहे. ११६ जागांवर मराठा समाजाचा प्रभाव आहे. महाराष्ट्रामध्ये ओबीसी मते मिळविण्यासाठी विदर्भामध्ये मोठी लढत सुरू आहे. कारण येथील ६२ पैकी ३६ जागांवर ओबीसी जातीच्या मतदारांचा चांगला प्रभाव आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी मान्य केले, की महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ओबीसी पहिल्यांदाच इतक्या प्रमाणात एकत्र आले आहेत. ओबीसी चेहऱ्याचा हरियाणामध्ये भाजपला फायदा झाला. भाजप नेत्यांचे म्हणणे आहे की, आपल्या रणनीतीचा एक भाग म्हणून पक्ष ओबीसींमधील अज्ञात आणि लहान जाती गटांपर्यंत पोहोचत आहे आणि त्याचा फायदा नुकत्याच झालेल्या हरियाणा निवडणुकीमध्ये झाला आहे.

हरियाणा विधानसभा निवडणुकीमध्ये ओबीसी चेहरा नायबसिंग सैनी यांना आघाडीवर ठेवण्याचा भाजपला फायदा झाला. हरियाणातील काँग्रेसच्या जाट चेहऱ्याच्या भूपेंद्रसिंग हुडा यांच्या विरोधात ओबीसी जाती एकत्र आल्या आणि भाजपने अत्यंत अवघड समजली जाणारी निवडणूक जिंकली. महाराष्ट्रामध्येही भाजपला हरियाणाची पुनरावृत्ती करायची आहे. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील ओबीसींच्या छोट्या जाती समूहांवर लक्ष केंद्रित करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी मोदी सरकारने केंद्रीय ओबीसी यादीमध्ये सात नवीन जाती गटांचा समावेश केला होता आणि महायुती सरकारने ओबीसींसाठी क्रिमी लेयरदेखील वाढवले होते. हे पाऊल ओबीसी समाजाला आपल्या बाजूने आणण्यासाठी मानले जात होते.

**रण तापले**

महाराष्ट्रामध्ये भाजप ओबीसी गटांवर लक्ष केंद्रित करत आहे. त्यात तेली, बंजारा, पवार, भोयर, कोमटी, सोनार, गोंड आणि इतर दोन डझन जातींचा समावेश आहे. यापूर्वी १९८० मध्ये भाजपने 'माधव फॉर्म्युला' वापरला होता. माळी, धनगर आणि वंजारी समाजाला एकत्र आणले होते. यामुळे पक्षाला ब्राह्मण-बनिया समाज आणि मराठा समाजाच्या पक्षापासून वेगळे होऊन महाराष्ट्रामध्ये जातीय आधार निर्माण करण्यास मदत झाली.

काँग्रेस उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये ओबीसी समाजामध्ये मोडणाऱ्या धनगर समूहाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. ओबीसी लोकसंख्येपैकी नऊ टक्के धनगर समूह आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) धनगर समाजाला भाजपच्या अपूर्ण आश्वासनाची आठवण करून देत आहेत. भाजपने धनगर समाजाला अनुसूचित जमातींमध्ये समावेशाचे आश्वासन दिले होते; परंतु ते प्रत्यक्षात आले नाही.

# मावळात शेळके विरोधी सर्व

**मावळमध्ये अजित पवार गटापुढे अपक्ष उमेदवाराचे मोठे आव्हान आहे. या उमेदवाराला सर्व पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार सुनील शेळके विरुद्ध राष्ट्रवादीचे बंडखोर अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यामध्ये मुख्य लढत होत आहे.**

महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार सुनील शेळके आणि राष्ट्रवादीचे बंडखोर आणि संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्यातच मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये थेट लढत होत आहे. शेळके यांच्या उमेदवारीला सुरुवातीपासूनच विरोध करणाऱ्या मावळातील भाजप नेत्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मनसे या पक्षांच्या स्थानिक नेत्यांनी बापू भेगडे यांना पाठिंबा दिला आहे.

मावळ विधानसभा मतदारसंघामध्ये सहा जण आपले नशीब अजमावत आहेत. भेगडे यांना पिपाणी ही निशाणी मिळाली आहे. दरम्यान, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून शेळके आणि भेगडे दोघेही इच्छुक होते; मात्र भेगडे यांना उमेदवारी पासून बाजूला करण्यासाठी राज्य कृषी शिक्षण आणि संशोधन महामंडळाचे उपाध्यक्षपद पक्षाने देऊ केले होते; मात्र ते पद नाकारून मला मावळची उमेदवारी द्या असा आग्रह पक्षाकडे धरला होता; मात्र पक्षाने शेळके यांना उमेदवारी दिल्याने नाराज झालेल्या भेगडे यांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचाही राजीनामा देऊन पक्षाविरोधात बंड पुकारले होते. २०१९ मध्ये बापू भेगडे यांनीच पुढाकार घेऊन शेळके यांना भाजपमधून राष्ट्रवादीत प्रवेश करून अजित पवार यांना साकळ घालून सुनील शेळके यांना उमेदवारी देण्याचा आग्रह केला होता. भाजपचे बाळा भेगडे यांच्या विरोधात सर्व पक्ष एकत्रित येऊन शेळके यांना भरघोस मतांनी निवडून आणले होते; मात्र आता पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्या वेळी पाच वर्षासाठीच शेळके यांना आमदार करायचे आणि पुढल्या म्हणजेच २०२४ ला दुसऱ्या कोणाला तरी संधी द्यावी, असे ठरले होते असे राष्ट्रवादीचे कार्यकर्ते बोलतात; मात्र शेळके यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकिट जाहीर होताच भेगडे यांनी बंड करून सर्व मित्र पक्षांना सोबत घेऊन अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मावळमध्ये शेळके यांच्या वर नाराज असलेले सर्व राजकीय पक्ष एकवटले आहेत.

**लक्षवेधी लढत**

भेगडे यांना विजयी करण्यासाठी भाजप नेत्यांनी पदाचे राजीनामा दिले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष, काँग्रेस, मनसे, यांच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही भेगडे यांना समर्थन दिले आहे. भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असले, तरी शेळके यांनी ४२ हजार कोटी रुपयांचा निधी आणल्याचा दावा केला जात आहे.





मावळातील कान्हा फाटा येथे जिल्हा रुग्णालय तयार केले. एकविरा देवी गडावर रोपवे चेही भूमिपूजन करण्यात आले. पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोणावळ्यात स्काय वॉकसारखा मोठा प्रकल्प आणला. वडगाव येथे तहसील कार्यालय, पोलिस ठाणे, वन विभाग यासाठी मोठी इमारत तयार केली आहे. हे होत असताना मावळात मोठ्या प्रमाणात विकासकामे करत सिमेंटचे रोड पाणी यासारखे अनेक उपक्रम राबवून मावळचा विकास केला. त्यामुळे सध्या स्थितीत जनता शेळकेंच्या पाठीमागे राहते, की भेगडे यांच्यासोबत मावळातील सर्व नेते असल्याने बाजी कोण मारणार हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# या नेत्यांकडे सगळ्यांचे लक्ष

**मुद्दे आणि गुद्दे**

२०२४ च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांची रंगत रोजच वाढते आहे. विविध पक्ष, त्यांचे जाहीरनामे आणि प्रचार यांची रणधुमाळी चालू आहे. अनेक मतदारसंघांमध्ये यंदा अनेक तरुण उमेदवार उभे आहेत. त्यामुळे त्या ठिकाणच्या निवडणुका प्रतिष्ठेच्या ठरल्या आहेत. बारामती मतदारसंघामध्ये युगेंद्र पवार उभे आहेत. ते यंदा प्रथमच रिंगणात उतरले आहेत आणि त्यांची लढत त्यांच्या काकांशीच म्हणजे अजितदादा पवार यांच्याबरोबर होणार आहे. अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण भोकर मतदारसंघातून उभ्या आहेत. राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे माहीम मतदारसंघामधून लढत आहेत. त्यांचीही ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे पुन्हा एकदा वरळी मतदारसंघातून उभे राहिले आहेत. त्यांनी पर्यावरणमंत्री म्हणून काम केले आहे. रोहित पवार यांचीदेखील हे दुसरी विधानसभा निवडणूक आहे. ते पुन्हा एकदा कर्जत जमखेड येथूनच निवडणूक लढवणार आहेत. सुजय विखे पाटील प्रथमच लोकसभेसाठी उभे राहिले तेव्हा त्यांनी अहमदनगर मतदारसंघातून विजय मिळवला होता. पण यंदा लोकसभेला मात्र त्यांचा पराभव झाला. आता ते संगमनेरमधून निवडणूक लढवत आहेत. सुनील तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे बालकल्याण खाते सांभाळत होत्या. त्या यंदा श्रीवर्धन मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.



या तरुण उमेदवारांच्या लढतीकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# अमित देशमुख यांच्यापुढे भाजपचे तगडे आव्हान

**लातूर शहर विधानसभा मतदारसंघामधून विलासराव देशमुख यांचे ज्येष्ठ पुत्र अमित देशमुख चौथ्यांदा निवडणूक लढवत आहेत. यापूर्वी देशमुख यांनी तीन वेळा विधानसभा निवडणूक जिंकली आहे. या वेळी मात्र प्रथमच त्यांना भाजपकडून तगडे आव्हान देण्यात आले आहे.**

लातूर शहर विधानसभा मतदारसंघामध्ये जातीय गणिते महत्त्वाची असतात. येथे लिंगायत आणि मराठा समाज प्रबळ आहे. या वेळी भाजपने माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांची सून डॉ. अर्चना पाटील यांना तिकीट दिलेले आहे. लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी भाजपत प्रवेश केलेला आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीने विनोद खटके यांना उमेदवारी दिलेली आहे. त्यामुळे कागदावर तरी ही निवडणूक तिरंगी असली, तरी मुख्य लढत देशमुख आणि चाकूरकर घराण्यात होणार असल्याने दोन्ही घराण्याची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. देशमुख यांच्या आधी त्यांचे वडील आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख या मतदार संघाचे १९८० पासून प्रतिनिधीत्व करीत आलेले आहेत. या ठिकाणी विलासरावांचा वारसा अमित देशमुख यांनी २००९ पासून




चालविण्यास सुरुवात केली आहे. सलग तीन वेळा अमित येथून निवडून आलेले आहेत. भाजपकडून त्यांना फारसे तोडीचे उमेदवार दिले जात नाहीत अशी येथील मतदारांची धारणा होती. त्यामुळे अमित यांचा विजय एकहाती होत असे. त्यांना भाजपकडून फारसे तगडे आव्हान दिले जात नव्हते. यंदा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सुनेला भाजपने देशमुख यांच्या विरोधात उभे केले आहे.

डॉ. अर्चना पाटील सुशिक्षित असून आपल्या रुग्णालयाच्या माध्यमातून त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. २०१९ पासून त्या निवडणुकीची तयारी करीत आहेत; परंतु कौटुंबिक कारणांनी त्यांनी तेव्हा निवडणूक लढविली नव्हती. दुसरीकडे त्यांचे सासरे शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपली सून भाजपत गेली असली, तरी आपण भाजपत प्रवेश केलेला नाही असे म्हटले आहे. अनेक वर्षे शिवराज पाटील गेली सक्रिय नसल्याने त्यांचे कार्यकर्तेही देशमुख यांच्याकडे वळले असल्याचे म्हटले जात आहे.

**लढाई रंगली**

पाटील यांची भिस्त सासऱ्यांच्या पुण्याईवर अवलंबून आहे, तर अमित यांच्या पाठीशी वडीलांची पुण्याई आहे. त्यामुळे कोणाचा विजय होतो. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेसला दलित आणि मुस्लिम मते मिळालेली होती; परंतु लातूर शहर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची मते खाण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांचा काय फायदा होतो, यावर देशमुख यांचे भवितव्य अवलंबून आहे. डॉ. पाटील या लिंगायत समाजाच्या असल्याने त्यांना लिंगायत समाजाचा पाठिंबा मिळणार असल्याचे सांगितले जात असले, तरी देशमुख यांना लिंगायत समाजाची मते मिळण्याची शक्यता अधिक आहे.

# स्वप्ने खरी होतात का?

जनतेला दाखवली गेलेली ही स्वप्ने खरी होतात का? स्पष्ट सांगायचे तर उत्तर 'नाही' असेच आहे. कारण तिथे सत्ताधारी पक्षाची इच्छाशक्ती कमी पडते. त्याचबरोबर सत्तेवर येणाऱ्या पक्षाला काहीही काम करू न देण्याची शपथ घेणारा विरोधी पक्ष पुन्हा नव्या जोमाने आणि ताकदीने उभा राहतो आणि विरोधासाठी विरोध करत राहतो. पण खरेच लोकांना हे हवे आहे? आजवर झाले तेच आणि तसेच? खरेच का लोकांना या रेवडी योजना हव्या आहेत का? मुळात योजना अपेक्षित वर्गापर्यंत पोचतात का? बरेचदा तर त्यातील पळवाटा शोधून गरज नसलेल्या लोकांची घरे भरली जातात. हे सारे बंद व्हायला हवे. कारण लोकांना खरोखरच या फुकट योजना नको आहेत. त्यांना काही तरी ठोस हवे आहे. काही काळ चालू राहून नंतर बंद पडणारे कोणतेही फायदे मिळवण्यापेक्षा कायम उपयोगी ठरेल असे काही लोकांना हवे आहे. तसे पाहिले तर लोकांच्या अपेक्षा खूप कमी आहेत. त्यांना साधेसुधे आणि शांत जीवन हवे आहे. मोकळी आणि शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि सकस अन्न हवे आहे. चांगले शिक्षण हवे आहे. केवळ मुंबई किंवा पुण्यासारख्या कोंडलेल्या शहरात नव्हे तर जो जिथे राहतो तिथेच त्याला शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी हव्या आहेत. प्रवासासाठी विनाखड्ड्यांचे रस्ते हवे आहेत. गरज पडेल तेव्हा उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा हव्या आहेत. शहरात जागोजागी भरपूर झाडे आणि बगीचे हवे आहेत.

थोडक्यात, जगण्यासाठी आवश्यक ते लोकांना हवे आहे. लहान मुले, तरुण, ज्येष्ठ आणि अतीज्येष्ठ या प्रत्येकालाच सहज आणि सुखद जगण्यासाठी या किमान गोष्टी हव्या आहेत आणि महत्वाचे म्हणजे यासाठी कष्ट करायला जनता तयार आहे. आयत्या मिळणाऱ्या पैशांपेक्षा त्यांना स्वत: मेहनत करून जगायला अधिक आवडणार आहे. त्यांना माणसासारखे जगायचे आहे. जगण्याचा आनंद घ्यायचा आहे. लोकांना सुरक्षा हवी आहे. लहान मुलांना आणि महिलांना मोकळेपणाने जगण्याची संधी हवी आहे. शाळांच्या जवळपास, त्यांना आवडणाऱ्या गोळ्या चॉकलेट्सच्या माध्यमातून लहान मुलांना ड्रग्सच्या नादी लावणाऱ्या समाजविघातकांपासून सुरक्षा हवी आहे. विनयभंग आणि बलात्कारासारख्या संकटांना सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रियांना आणि मुलींना त्या क्रूर नराधमांपासून सुरक्षा हवी आहे. गैरव्यवहार करणारा, मग तो कुणीही असो, योग्य शिक्षा आणि तीही लवकरात लवकर झाली पाहिजे ही आज लोकांची अपेक्षा आहे. गुन्हे आणि अपराध करणाऱ्याला पाठीशी घालणारा कुणीही असो, शिक्षा झालीच पाहिजे अशी लोकांची अपेक्षा आहे. आपण निवडून देत असलेल्या उमेदवारांचे चारित्र्य स्वच्छ असावे, त्यांना खरोखरीच देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीची तळमळ असायला हवी, अशी लोकांची अपेक्षा आहे. खरा आणि कोणत्याही दबावाशिवाय मिळणारा न्याय लोकांना हवा आहे.



# माजीमंत्री जयदत्त क्षीरसागरांच्या पाठिंब्याने, अजित पवारांच्या सभेने योगेश क्षीरसागर अर्धा हळकुंडात पिवळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ नोव्हेंबर**

बीड विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी पाठिंबा दिला. दि.१३ नोव्हेंबर रोजी बीड शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा झाल्याने उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर हे अर्धा हळकुंडात पिवळे झाल्यासारखी अवस्था झाली आहे. आता माझा विजय कोणी रोखू शकत नाही अशी त्यांची मानसिकता झाली आहे. मात्र जयदत्त क्षीरसागर यांचे कार्यकर्ते डॉ.योगेश क्षीरसागरांना मदत करतील का ? तर त्याचे उत्तर नाही आहे. अनेक कार्यकर्त्यांनी बोलून दाखविले जयदत्त क्षीरसागर उमेदवार असते तर आम्ही जीवाचे रान केले असते. मात्र आम्ही कोणाचे गुलाम नाहीत. कार्यकर्ता गुलाम नसतो, त्यामुळे आता आम्ही कोणाचे काम करायचे हे आम्ही ठरवू असे बोलून दाखवत आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना राजकीय जीवनाचा कुठलाही अनुभव नाही. जनतेच्या प्रश्नाचे देणेघेणे नाही. केवळ कोणाचा तरी राजकीय वारसा, कोणत्या तरी राजकारणाचा मुलगा एवढीच आहर्यता आहे. त्यांनी प्रकाशित केलेला जाहीरनामा ही बालिश पणाचा होता. संस्थेतील कर्मचाऱ्याच्या जीवावर निवडणुकीचे मैदान मारण्याची त्यांचे मनसुबे कर्मचारी साध्य होऊ देतील का असा प्रश्न निर्माण होत आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे विधानसभा मतदार संघातील विकासाचे कुलेही व्हिजन नाही. विकासाचा आराखडा नाही. तरीही ते निवडणुकीच्या मैदानात आहेत. जनतेमध्ये तर त्यांच्याबद्दल लादलेला उमेदवार अशीच भावना आहे. बीड या ठिकाणी दि.१३ रोजी झालेल्या सभेमध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सुचक विधान केले, मी अनेकांचे ओझे हालके करणार आहे हे त्यांचे विधान प्रचाराच्या व्यासपीठावरून झाल्याने ते नेमके कोणाचे ओझे हालके करतात हे येणारा काळच ठरवेल. हा त्यांचा इशारा कोणासाठी होता ?

**बीड विधानसभा मतदारसंघामध्ये माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी योगेश क्षीरसागरांना दिलेला पाठिंबा याची जनतेमध्ये उलट सुलट चर्चा आहे. योगेश क्षीरसागर यांना निवडणूक जिंकणे वाटते तेवढी सोपी नाही. जरी कार्यकर्त्यांची संख्या असली तरी ती मतात परिवर्तीत होईल याची त्यांनाच शाश्वती नसल्याचे दिसते.**



## तांड्यावरच्या विकासात आमदार पवारांचाच पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ नोव्हेंबर**

गेवराई मतदारसंघातील तांड्यांचा टप्प्या टप्प्याने विकास करू म्हणणार्या पुढाऱ्यांनी नुसत्या थापा मारल्या. माझ्या दहा वर्षाच्या काळात तांड्यांचा विकास झाला असून ,येणाऱ्या काळात आणखी विकासाची शाश्वत गोष्टी इमानदारीने पार पाडू , मतदारसंघातील बंजारा समाजाने माझ्यावर केलेले प्रेम कधीच विसरलो नाही. या पुढे ही, तुमच्या हाकेला कधीही धावून येईल, आपण एकत्र बसून तांड्यावर सोयी सुविधा निर्माण करू, असे आश्वासन आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना दिले. दरम्यान, आमदार पवार यांच्यावर विश्वास ठेवून गोरसेनेचा पाठीबा जाहीर करण्यात आल्याने, आटो रिक्षाला बंजारा शक्ती मिळाली आहे.



आ. पवार म्हणाले, मतदारसंघात पहिल्या वेळेस फिरत असतांना तांड्या वाडी वस्तीवरच काय तर गावांना जाणायासाठी साधा रस्ता नव्हता. मतदारसंघातील जनतेने माझ्यावर विश्वास व्यक्त करत मला सेवा करण्याची संधी दिली. मतदारसंघातील प्रत्येक गाव हायवेशी जोडले. त्यानंतर गावातून तांडा वस्तीवर जाणारे रस्त्याचे काम करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करुन, अनेक तांड्यावर विकास करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले आहेत तरी आपण केलेल्या मागण्या मी वर्षाभरात पुर्ण करील. असे ही आ.लक्ष्मण पवार यांनी यावेळी बोलतांना सागितले आहे.

## मी काय पाप केलं;माझं आणि माझ्या भावाचे घर जाळलं

### घर जाळून आंदोलन करण्याची पद्धत होती काय गुन्हे दाखल केले म्हणून विरोधकांनी माझे बदनामी केली कॉर्नर बैठकीत आमदार सोळंके यांची मतदारांना साद

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ नोव्हेंबर**



मी असं काय पाप केलं की,माझं आणि माझ्या भावाचं घर जाळलं, घर जाळून आंदोलन करण्याची पद्धत होती काय ? पोलिसात गुन्हे दाखल केले म्हणून विरोधकांनी माझी बदनामी केली, गुन्हे दाखल केले असतील तर भर चौकात फाशी घेईन अशी भावनिक साद आमदार प्रकाश सोळंके यांनी प्रचारार्थ आयोजित कॉर्नर बैठकीमध्ये मतदारांना घातली.

माजलगाव तालुक्यातील ठिकठिकाणच्या कॉर्नर बैठकात ते बोलत होते.माजलगाव विधानसभेची निवडणूक दुसऱ्या टप्प्यातील निर्णायक वळणाकड सरकत आहे.यादरम्यान महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांनी आपल्या विकास कामाचा पाढा वाचून दाखवत अनेक प्रश्नांना वाचा फोडली.यावेळी ते मतदारांना संबोधित करताना ते म्हणाले की, माझे घर जाळले,माझ्या भावाचे घर जाळले.आमच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला.यात लोकांच्या आक्रोशाचे कारण पुढे करत विरोधकांनी यातही राजकारण केलं.सदरील प्रकरणात पोलीस फिर्यादी आहेत.तरी या जाळपोळीच्या घटनेत मलाच बदनाम करण्यात येत आहे.मी जर यात सहभागी असेल,असे कोणी सिद्ध केले,तर भर चौकात मी फाशी घेईल असेही ते यावेळी म्हणाले.दरम्यान प्रत्येक समाजाच्या आंदोलनात मी स्वतः रस्त्यावर उतरत आलो आहे.मराठा आरक्षण प्रश्नावरही वेळोवेळी मी विधानसभेत आवाज उठवला आहे.

रस्त्यावर उतरलो आहे.असेही त्यांनी यावेळी सांगितले.दरम्यान लोकशाहीमध्ये आंदोलने करणे म्हणजे लोकांचे घर जाळणे.ही काय आपली संस्कृती आहे काय? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना विचारला. मतदार संघात मी हजारो कोटीची कामे केली,तर विरोधक म्हणतात तुम्ही टक्केवारी घेतली.काहीच निधी आणला नसता तर तरीही विरोधक म्हणाले असते मी काहीच विकास केला नाही.हा डबल ढोलकी वाजवण्याचा धंदा विरोधकांनी बंद करावा असा टोलाही त्यांनी यावेळी विरोधकांना लगावला.माझी विनाकारण बदनामी थांबवावी असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपा तालुकाध्यक्ष अरुण राऊत,नाशेर पठाण,अच्युत लाटे, शिवाजी रांजवण,संभाजी शेजुळ, शेख मजीद, अच्युत लाटे, विद्रोही सेनेचे भास्कर शिंदे, हनुमान कदम, धनंजय सोळंके, अभिजीत कोंबडे यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमापुरचे आप्पासाहेब औटी राष्ट्रवादीत दाखल



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ नोव्हेंबर**

गेवराई विधानसभा मतदारसंघात माझ्यापासून दुर गेलेले माझे सहकारी आता जवळ आल्याने विजयचा विजय आता सुकर झाला आहे. राष्ट्रवादीत आलेल्या कोणत्याही कार्यकर्त्यांना अंतर दिले जाणार नाही. सर्वांनी हातात हात घालून काम करुन महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांनी ऐतिहासिक मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले आहे. उमापुर येथील जेष्ठ नेते आप्पासाहेब औटी यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला याप्रसंगी ते बोलत होते.

उमापुर येथील शिवसेनेचे जेष्ठ नेते तथा बदामराव पंडित यांचे समर्थक आप्पासाहेब औटी, माजी पंचायत समिती सदस्य अजय औटी यांच्यासह वसंतराव आहेर,अरुण जाधव, प्रदीप आहेर, जुबेर कुरेशी, रईस सौदागर, एजाज कुरेशी, बाळू मिसाळ, अर्जुन चेडे, बाबू शेख, सुरेश चेडे, जलाल शेख, सलीम भाई कुरेशी, मतीन कुरेशी, जनार्धन कापसे, संतोष दिलवाले आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करुन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उमापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

## बहुजन विकास मोर्चा, मा क प, लोकजन शक्ती पार्टी व प्रहारच्या वतीने पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा

### पत्रकार परिषदेत बाबुराव पोटभरे सह सर्वांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ नोव्हेंबर**

केज मतदार संघातील मागील ३५ वर्षाची मक्तेदारी, हुकूमशाही मोडीत काढण्या साठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट व महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आ पृथ्वीराज साठे यांना बहुजन विकास मोर्चाच्या वतीने जाहीर पाठिंबा देत असल्याची घोषणा पक्षाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी आयोजित पत्रकार परिषदे मध्ये केली. या प्रसंगी कॉ बब्रुवान पोटभरे यांनी मा क प च्या वतीने राजेश वाव्हळे यांनी लोकजन शक्ती पार्टीच्या वतीने तर फिरोज शेख यानी प्रहारच्या वतीने पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राजकिशोर मोदी, बबन भेय्या लोमटे, डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे, हारून भाई इनामदार, मा क प चे कॉ बब्रुवान पोटभरे, अशोक गंडले, विनोद शिंदे, महादेव आदमाने यांच्या सह बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## आ नमिता मुंदडा यांचा संवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ नोव्हेंबर**

भाजपा आणि महायुतीच्या उमेदवार आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारार्थ केज विधानसभा मतदार संघातील जिवाचीवाडी ता.केज येथील मतदारांशी संवाद साधला.

आपल्या नेत्या आदरणीय पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी नमिताताई मुंदडा यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करा असं आवाहन याप्रसंगी मतदार बांधवांना केले. प्रितमताई गोपीनाथ मुंडे यांनी केले नमिताताई मुंदडा यांनी मतदारांनी येणाऱ्या २० तारखेला मला प्रचंड मतांनी विजय करा तुमचे मत वाया जाणार नाही व विकासाच्या कामाला येईल असे महायुतीचे उमेदवार नमिताताई अक्षय मुंदडा यांनी सांगितले.दरम्यान प्रचार दौऱ्यानिमित्त नियोजित कार्यक्रमास जाताना ठिकठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

## राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ मलिकपुरा, वटसावित्री येथे रॅली

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ नोव्हेंबर**

परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष, काँग्रेस, शिवसेना उबाटा प्रणित महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी शहरात दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी ठीक-ठिकाणी प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी यावेळी मतदारांना राजेसाहेब देशमुख यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे व सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन केले. मतदार बंधू -भगिनींनो उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



महाविकास आघाडीचे विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी शहरातील मलिकपुरा, वटसावित्री, आदी भागात महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी रॅली काढून मतदारांना महाविकास आघाडीचे उमेदवार राजसाहेब देशमुख यांना मतदान करण्याचे आवाहन केले. प्रचार रॅलीत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे परळी शहराध्यक्ष जीवन देशमुख, काँग्रेस शहराध्यक्ष बहादुर भाई, युवा नेते शंभूराजे देशमुख, शशीशेखर चौधरी, बाळासाहेब देशमुख, रणजित देशमुख, वैजनाथ गाडेकर, बद्दरभाई, सद्दाम शेख, रसूल खान, दीपक शिरसाट, इतेशामा खतीब, सुभाष देशमुख, गफार शहा, जावेद भाई, मजहर बाबा शेख, अबूतला, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष महिला आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्या आदिसह महाविकास आघाडीतील विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदरील रॅलीस उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

## पंडितांच्या झुंडशाहीला झुगारून पुन्हा एकदा संधी द्या - आ.लक्ष्मण पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ नोव्हेंबर**

ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या योजना पंडितांनी भस्मासुरा सारख्या खाऊन टाकल्या. गुंडगिरी करून राशन धान्य, वाळू च्या माध्यमातून दहशत निर्माण केली. जनतेच्या योजनेत भ्रष्टाचार केला. त्यामुळेच, त्यांच्या झुंडशाहीला मी विरोध केला. सामान्य माणसाला, कार्यकर्त्याला पाठिंबा दिला. सरकारचा आलेला पैसा सरकारी योजनेत इमानदारीने खर्च व्हावा म्हणून, जागरूक राहीलो. दहा वर्षाच्या कालखंडात गोरगरीब जनतेच्या हितासाठी इमानदारीने राबलो आहे. आतापर्यंत तालुक्यातील रस्त्याचा कामाचा अनुशेष भरून काढला आता शेतीसाठी वीज व सिंचनावर काम करून आपली सेवा करायची इच्छा आहे.


म्हणून पंडितांच्या झुंडशाहीला झुगारून माझ्यावर पुन्हा एकदा विश्वास टाका, असे भावनिक आवाहन अपक्ष उमेदवार आ.लक्ष्मण पवार यांनी केले आहे.



गेवराई विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ जातेगाव येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी ग्रामीण भागातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आदेल्या प्रचार दौऱ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जि.प.सदस्य पांडुरंग थडके, प्रा.शाम कुंड, सिद्धार्थ नरवडे, जे.डी. शहा, राहुल जिजा खंडागळे, शिनुभाऊ बेदरे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## आ. प्रकाश सोळंके यांच्या प्रचारार्थ माजलगावात बंजारा समाज मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ नोव्हेंबर**



महायुतीचे उमेदवार विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या प्रचारार्थ जुना मोंढा मैदान येथे दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी स.१० वाजता बंजारा समाज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असुन कार्यकर्त्यांनी व समाजबांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन मा. सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

भाजपा - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस, आर.पी.आय आठवले गट, पी.आर.पी. कवाडे गट, लहुजी विद्रोही सेना, आझाद क्रांती सेना, अमोल शेरकर युवा मंच, अण्णाभाउ साठे क्रांती फोर्स पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रकाश सोळंके यांच्या प्रचारासाठी दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी स.१० वाजता जुना मोंढा मैदान येथे होणा-या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणुन पोहरादेवीचे महंत प. पू. जितेंद्र महाराज यांची उपस्थित असणार आहे. या बंजारा समाज मेळाव्यास समाजबांधव, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन मा. सभापती जयसिंग सोळंके यांनी केले आहे.

## आ.सोळंकेंच्या प्रचारासाठी संपूर्ण कुटूंबीय प्रचाराच्या मैदानात

### पत्नी,मुलगी,मुलगा,सुना,पुतणे यांचा मतदारांषी संवाद,मतदारांचा मिळतोय पाठींबा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१४ नोव्हेंबर**

महायुतीचे उमेदवार आ.प्रकाष सुंदरराव सोळंके यांच्या प्रचारासाठी संपुर्ण कुटूंबीय प्रचाराच्या मैदानात उतरले असुन पत्नी,मुलगी,मुलगा,सुना,पुतणे हे मतदारांषी संवाद साधत असुन मतदारसंघात केलेल्या विकासकामांची माहिती दिली जात असुन प्रचार दौ-यास मतदारांचा वाढता पाठींबा मिळत आहे. सोळंके कुटूंबीयांनी मतदारसंघ पिंजून काढला आहे.

माजलगाव विधानसभा निवडणुकीचा प्रचार मध्यान्हावर आला असुन आ.प्रकाष सोळंके हे प्रचारात व्यस्त आहेत. मतदारसंघ तिन तालुक्याचा असुन सर्व मतदारांपर्यंत पोहचणे उमेदवारास षक्य होत नाही. त्यामुळे आ.सोळंके यांचे संपुर्ण कुटूंबीय प्रचाराच्या रिंगणात उतरले असुन आ.सोळंके यांनी पस्तीस वर्शामध्ये केलेल्या विवीध विकासकामांचा पाढा मतदारांसमोर वाचला जात आहे तसेच आ.प्रकाष सोळंके यांना पुन्हा संधी द्या असे आवाहन केले जात आहे. प्रचारासाठी सुविद्य पत्नी मंगलाताई सोळंके,मुलगी षिवांजली सोळंके,मुलगा विरेंद्र सोळंके ,सुनबाई अॅड.पल्लवीताई सोळंके,ऐष्वर्याताई सोळंकेसह अनेकजण प्रचाराच्या रिंगणात उतरले आहेत. विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या आ.सोळंके यांना विजयी करा तसेच आगामी काळात अनेक विवीध विकासकामे मार्गी लावण्याचे आष्वासन दिले जात आहे.

मतदारसंघातील माजलगाव,वडवणी,धारूर या तिनही तालुक्यात सोळंके कुटूंबीयांचा झंझावात असुन प्रत्येक गाव - खेड्यात जाण्याचा यषस्वी प्रयत्न केला जात आहे. या प्रचार दौरा,संवाद बैठका,कॉर्नर बैठकांना मतदारांचा वाढता पाठींबा मिळत आहे.



## जयभवानीच्या गळीत हंगामाचा भव्य शुभारंभ

### ह.भ.प. महंत शिवाजी महाराज,माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१४ नोव्हेंबर**

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह. भ. प. महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, माजी चेअरमन जयसिंग पंडित, व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्यासह कारखान्याचे संचालक, सभासद, विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



प्रारंभी ह.भ.प. शिवाजी महाराज आणि कारखान्याचे कर्मचारी राजेंद्र नवले व शंकर ढाकणे यांच्या शुभहस्ते विधीवत पूजा करुन गव्हाणीत मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव (दादा) पंडित, म्हणाले की, साखरे बरोबरच उपपदार्थांचे उत्पादन होणार असल्यामुळे जयभवानी ऊसाला चांगला भाव देण्यास सज्ज आहे. बायप्रॉडक्टवर लक्ष केंद्रित करत १. १० लक्ष बल्क लिटर क्षमतेचा डीस्टलरी प्रकल्प पुढील हंगामात कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्यामुळे निधी उपलब्ध होईल आणि शेतकऱ्यांच्या ऊसाला जादा दर देताना अडचण येणार नाही. आपण राजकारणात शब्द पाळतो, आणि शब्द आपण खरा करुन दाखवला आहे. जयभवानी आपला हक्काचा कारखाना आहे, जयभवानीने शेतकऱ्यांना नेहमीच न्याय दिलेला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड कामगार, कर्मचारी आणि प्रशासन यांनी हातात हात घालून जय भवानीचा चालू हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## इति-उवाच...



काँग्रेसचा दावा होता, तिथे मित्रपक्षाने अगदीच चुकीचे उमेदवार दिले आहेत आणि आपला एकूण आकडा वाढविण्याच्या नादात त्या उमेदवारांची निवडून येण्याची अजिबात शक्यता नाही, असे उमेदवार पुढे आले आहेत. कुठल्या पक्षाचे त्याबद्दल मी बोलणार नाही.

**पृथ्वीराज चव्हाण,** काँग्रेसचे नेते



उद्धव ठाकरेंना समोर पराभव दिसत असल्याने ते बिथरलेत. लहान सहान गोष्टींवर कांगावा करताना दिसताहेत. अहो उद्धवजी, बॅगा फक्त तुमच्या तपासल्या जात नाही, तर प्रत्येकाच्या तपासल्या जातात. मात्र, तुमच्यासारखा पाणचटपणा कोणी करीत नाही. आम्हाला तेवढा वेळही नाही.

**चित्रा वाघ,** भाजपा



मोदी सरकारने वक्फ बिल आणले आहे, हा कायदा पास झाला, तर मशीद राहणार नाही, दर्ग्यांवर कब्जा केला जाईल. वक्फची संपत्ती ताब्यात घेणे हे त्यांचे एकच ध्येय आहे. पण, याचा मालक अल्ला आहे, त्यांना अल्लाची संपत्ती ताब्यात घ्यायची आहे.

**असदुद्दिन ओवैसी,** एमआयएमचे नेते



फक्त हातवारे करून आमदार होता येत नाही. एक युवराज वरळीकरांनी निवडून दिला. त्या युवराजाला निवडून तेथील जनता पश्चात्ताप करीत आहे. एका युवराजाला मत देऊन, जर मतदार पाच वर्षे पश्चात्ताप व्यक्त करीत असतील, तर या 'राज'पुत्राला तुम्ही मतदान करणार का?

**प्रिया सरवणकर**

## बोगस निवडणूक तपासणी पथकाने २५ लाख लांबविले

◆ **कोल्हापूर, १४ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने शासनाच्या तपासणी पथकांकडून सुरू असलेल्या तपासणीची हुबेहुब नक्कल करून बोगस पथकाने एका व्यावसायिकाची २५ लाख ५० हजारांची रोकड लांबविली. हा प्रकार पुणे-बंगळुरू महामार्गालगत तावडे हॉटेल उड्डाणपुलाजवळ घडला.

याबाबत व्यापारी सुभाष लक्ष्मण हारणे यांनी गांधीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांची पाच पथके संशयितांचा शोध घेत आहेत. व्यापारी सुभाष हारणे हे यात्रेत पाळणे लावण्याचा व्यवसाय करतात. ते सोमवारी झालेल्या व्यावसायाची रक्कम घेऊन पहाटेच्या सुमारास कारमधून तावडे हॉटेल येथे आले.

दरम्यान, २५ ते ३० वयोगटांतील अज्ञात पाच जणांनी हारणे यांची कार अडवली. विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर तपासणी सुरू आहे. (वृत्तसंस्था)


# जुनी शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केले

### छगन भुजबळांचा गौप्यस्फोट

◆ **नाशिक, १४ नोव्हेंबर**

शरद पवारांनी माझ्याबाबत आता का बोलले, हे मला कळले नाही. मात्र, शिवसेना फोडण्याचे पुण्यकर्म पवार साहेबांनी केले. पवार साहेबांनीच हे चांगले काम केले. ते जर केले नसते, तर आज फुटाफूट झाली नसती, असा सनसनाटी आरोप करीत शरद पवार यांनी केलेल्या टीकेवर छगन भुजबळ यांनी पलटवार केला आहे.

भुजबळांना आम्ही विधानसभा, विधानपरिषदेत संधी दिली, विरोधी पक्षनेते पद दिले. पण, त्यांनी काही उद्योग केले, त्यांना पद सोडावे लागले. ते तुरुंगात गेले. त्यांना भेटायला कोणी जात नव्हते. माझी मुलगी, आम्ही त्यांना भेटायला गेलो.



त्यांना पुन्हा संधी देत निवडून आणले, असे म्हणत शरद पवारांनी छगन भुजबळांवर थेट हल्लाबोल केला. त्यावर भुजबळ यांनी उत्तर दिले.

काँग्रेसमधून तुम्हाला दूर केले तेव्हा एकमेव माणूस छगन भुजबळ तुमच्या सोबत होता. मुकुल वासनिकांसह सर्व सांगत होते तुम्ही जाऊ नका, मी तुम्हाला मुख्यमंत्री करतो पण मी गेलो नाही. पवार साहेब तुमच्या प्रेमापोटी मी आलो होतो. माझ्यावर हल्ला झाला, तेव्हा पवार साहेब मला भेटण्यासाठी आले होते. पवार साहेब असे कसे काय विसरतात? आता हे सर्व मुद्दे काढण्याचे काय गरज आहे, जुने मुडदे उकरू नका, नव्या गोष्टी बाहेर आल्या, तर 'बात दूर तक जायेगी.' मात्र, पवार साहेबांबद्दल मला आदर आहे. तो कायम राहणार. पण, तुम्ही काही बोललात म्हणून मला खुलासा लागतोय्, असेही भुजबळ म्हणाले. (वृत्तसंस्था)

### ...तर मला पद दिले नसते!

बाळासाहेब ठाकरे यांनी मला आमदार, मंत्री केले. याबाबत मी आभार मानले आहे. शरद पवारांनी माझ्याबाबत आता का बोलले ते मला कळले नाही. माझ्यात काही तरी असेल म्हणूनच बाळासाहेबांनी मला मंत्रिपद दिले. माझ्यात काही नसते, तर मला पवार साहेबांनी पद दिले नसते, असे भुजबळ म्हणाले.

# अशोक चव्हाण यांनी अनुभवले चारही सभागृहांचे सदस्यत्व



### पित्याच्या विक्रमाची बरोबरी

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १४ नोव्हेंबर**

शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण या पिता-पुत्रांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सांभाळण्याचे भाग्य लाभले. देशात असे भाग्य आतापर्यंत चार राजकीय पिता-पुत्रांनाच लाभले. चव्हाण पिता-पुत्रांच्या राजकीय कारकीर्दीत आणखी दोन-तीन बाबतीत साम्य आहे.



शंकरराव चव्हाण आणि अशोक चव्हाण यांनी प्रत्येकी दोनवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवले. दुसरे साम्य म्हणजे शंकरराव चव्हाण यांनी संसदेच्या लोकसभा आणि राज्यसभा तसेच विधिमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद अशा चारही सभागृहांचे सदस्यपद भूषवले. तसेच भाग्य अशोक चव्हाण यांनाही लाभले. अशोक चव्हाण चारवेळा विधानसभेचे तर एकवेळा विधानपरिषदेचे सदस्य होते. लोकसभेत दोनदा सदस्य राहिलेले चव्हाण सध्या राज्यसभेत आहे.

चव्हाण पिता-पुत्रातील आणखी एक साम्य म्हणजे शंकरराव चव्हाण यांच्याप्रमाणेच अशोक चव्हाण यांनीही काँग्रेस सोडली. शंकरराव चव्हाण यांनी काँग्रेस सोडत महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसची स्थापना केली. दोन वर्षांतच शंकरराव चव्हाण स्वगृही परतले. अशोक चव्हाण यांनी काँग्रेस सोडत आपला पक्ष न काढता भाजपात प्रवेश केला. पक्षात आल्याबरोबर चव्हाण यांना भाजपाने राज्यसभेत पाठवले आणि आपल्या वडिलांच्या चारही सभागृहाचे सदस्य होण्याच्या विक्रमाची बरोबरी केली.

शंकरराव चव्हाण यांनी केंद्रात अनेक महत्त्वाची मंत्रिपदे सांभाळली. अशोक चव्हाण यांना मात्र केंद्रात आतापर्यंत तरी एकदाही मंत्रिपद भूषवण्याची संधी मिळाली नाही. शंकररव चव्हाणांचा राजकीय वारसा जसा अशोक चव्हाण यांनी सांभाळला, तसाच आता अशोक चव्हाण यांचा राजकीय वारसा त्याची मुलगी श्रीजया सांभाळत आहे. भाजपाने श्रीजयाला विधानसभेची उमेदवारी दिली आहे.

वडिलांनंतर त्याच राज्याचे मुख्यमंत्रिपद मुलाला मिळण्याच्या चार घटना देशात घडल्या. तामिळनाडूत द्रमुकचे करुणानिधी अनेक वेळा मुख्यमंत्री होते. आता त्यांचा मुलगा एम. के. स्टॅलिन मुख्यमंत्री आहे. उत्तरप्रदेशात मुलायमसिंह यादव यांच्यानंतर त्यांचा मुलगा अखिलेश यादव मुख्यमंत्री झाला होता. जम्मू-काश्मिरात शेख अब्दुल्ला यांच्यानंतर त्याचा मुलगा उमर अब्दुल्लाही मुख्यमंत्री झाला, आताही आहे. वडील मुलानंतर देशात बाप-लेकही मुख्यमंत्री होण्याची घटना घडली. मुफ्ती मोहम्मद सईद यांच्यानंतर त्यांची मुलगी मेहबुबा मुफ्ती मुख्यमंत्री झाल्या होत्या.

१९८५ मध्ये अशोक चव्हाणांनी राजकारणात प्रवेश केला. येताच प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस म्हणून त्यांच्यावर जबाबदारी आली. शंकरराव चव्हाण केंद्रातून महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून आल्यानंतर त्यांनी नांदेड लोकसभा मतदारसंघातील खासदारकीचा राजीनामा दिला. या जागेवर १९८७ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने अशोक चव्हाण यांना उमेदवारी दिली. आपल्या पहिल्याच निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांचा पराभव करत चव्हाण विजयी झाले.

# भाजपासोबत जाण्याच्या बैठकीत अदानीही उपस्थित

### अजित पवारांचा मोठा गौप्यस्फोट

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**



उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पहाटेच्या शपथविधीवर मोठा गौप्यस्फोट केला आहे. एका युट्यूब चॅनलला मुलाखत देताना अजित पवार म्हणाले, भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसला एकत्र आणण्यासाठी महत्त्वाची बैठक पार पडली होती त्यात उद्योगपती गौतम अदानीदेखील होते. नंतर मात्र अजित पवारांनी घूमजाव केला.


अजित पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाचे सरकार राज्यात आणण्यासाठी दिल्लीत पाच बैठका झाल्या. एक बैठक उद्योगपती गौतम अदानींच्या घरी झाली. यामधील एका बैठकीला अमित शाह, गौतम अदानी, देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल, पवार साहेब आणि आपण स्वतः उपस्थित होतो. त्या गोष्टी सगळ्यांनाच माहिती आहेत, असे अजित पवार म्हणाले. त्या गोष्टी आता काढून काही उपयोग नाही. त्याचा सर्व दोष माझ्यावर आला. त्याची संपूर्ण जबाबदारी मी घेतली आणि इतर नेत्यांना वाचवले, असे स्पष्टीकरण पवारांनी दिले आहे. पुढे अजित पवारांना त्या वेळी शरद पवारांच्या मनात काय होते, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, शरद पवारांच्या मनात काय आहे, हे जगातील कोणताही व्यक्ती सांगू शकत नाही. आमच्या काकीसुद्धा सांगू शकत नाहीत. (वृत्तसंस्था)

### अशी बैठक झालीच नाही : सुप्रिया सुळे



सुप्रिया सुळे म्हणाल्या, त्या बैठकीबद्दल अजित पवारांनाच विचारावे लागेल. अशी बैठक झाल्याची मला माहिती नाही. पहाटेच्या शपथविधीबाबत आम्हाला कुणालाच माहिती नव्हते. हे मी अनेकवेळा बोलले आहे. मला अजूनही तो दिवस आठवतो. मी झोपलेले होते. सदानंद सुळे यांनी मला उठवले आणि टीव्हीवर काय चालले ते बघायला सांगितले.

### माझी सगळ्यांमध्येच उठबस : शरद पवार



मी गौतम अदानी नव्हे, तर रतन टाटा असो वा किर्लोस्कर यांच्यासह अनेकांच्या घरी जातो. महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांची इच्छा असलेल्यांच्या कामांना गती देणे, त्यांच्याशी सुसंवाद ठेवणे या गोष्टी राज्य म्हणून गरजेच्या असतात. माझी उद्योग जगतातील अनेकांकडे उठबस आहे, असे शरद पवार म्हणाले. अजित पवारांनी सांगितलेली एकही गोष्ट सत्य नाही, असा दावा त्यांनी केला.




झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात बुधवारी मतदान केल्यानंतर राज्याचे राज्यपाल संतोषकुमार गंगवार यांनी मतदान केल्याची खूण दाखवत मतदानाप्रती जागृती केली

# शिवसेनेतील सात जणांची हकालपट्टी

◆ **नवी मुंबई, १४ नोव्हेंबर**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील बंडखोर उमेदवार विजय नाहटा यांना मदत करणाऱ्या पक्षातील सात प्रमुख पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्याचा निर्णय अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

नाहटा यांच्या बंडखोरीला साथ देऊ नका, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली होती. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनीही वाशीतील मेळाव्यात तशी भूमिका मांडली होती. त्यानंतरही नाहटा यांना साथ देणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बेलापूर विधानसभा मतदारसंघात भाजपाने मंदा म्हात्रे यांना उमेदवारी दिली असून, त्यामुळे पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी बंडखोरी करीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. महायुतीतील भाजपामध्ये हे बंड सुरू असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा यांनीही बंड करीत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

संदीप नाईक यांच्या पक्ष प्रवेशापूर्वी काही दिवस नाहटा यांनी एका जाहीर कार्यक्रमात आपण शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करीत असल्याचे जाहीर केले होते. मात्र, संदीप नाईक यांच्या बंडाचा सुगावा लागताच शरद पवार यांनी नाहटा यांचा प्रवेश थांबिवला. पुढे संदीप नाईक यांच्या प्रवेशामुळे नाहटा यांना तुतारी हाती घेणे शक्यच झाले नाही. (वृत्तसंस्था)

# बॅगा तपासल्या, चकल्या सापडल्या!

### अजितदादा म्हणाले, खा-खा बाबा...!!!

◆ **बारामती, १४ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बारामती येथे हेलिकॉप्टर आणि बॅगांची तपासणी करण्यात आली.

बारामतीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी अजित पवारांच्या हॅलिकॉप्टरची तपासणी केली. अजित पवारांच्या सर्व बॅगा तपासण्यात आल्या. अजित पवारांनी फोनवर बोलत असताना स्वतः बॅगा तपासण्यासाठी दिल्या. यावेळी एका बॅगेत चकल्या होत्या. बॅगेत चकल्या हातात घेऊन खा-खा बाबा...सगळ्या बॅगा तपास...त्या डब्यात पैसे आहेत का चेक कर...असे अजित पवार अधिकाऱ्यांना दिसले. दुसरीकडे गुलाबी जॅकेट देखील होते. एका बास्केटमध्ये थंड पाण्याच्या बाटल्यादेखील ठेवण्यात आल्या होत्या. (वृत्तसंस्था)




# शिवाजी पार्कवर रविवारी घुमणार मनसेचा आवाज

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सांगता १८ नोव्हेंबरला होणार आहे. तत्पूर्वी रविवारी दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर मनसे प्रमुख राज ठाकरेंची जाहीर सभा पार पडणार आहे. १७ नोव्हेंबरला शिवाजी पार्क मैदान मिळावे यासाठी उद्धव ठाकरे आग्रही होते. १७ नोव्हेंबरला बाळासाहेब ठाकरे स्मृती दिन असल्याने आमच्याशिवाय कुणाला परवानगी देऊ नका, अन्यथा संघर्ष होण्याची शक्यता आहे, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. मात्र, नगरविकास विभागाकडून मनसेला सभेसाठी परवानगी मिळाल्याचे समोर आले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेसाठी शिवाजी पार्क मैदान मिळावे यासाठी उद्धवसेना आणि मनसे यांनी केलेले अर्ज आणि स्मरणपत्रे मुंबई महापालिकेच्या संबंधित विभागाने नगरविकास खात्याकडे पाठवले होती. शिवाजी पार्कवर १० नोव्हेंबरला एकनाथ शिंदेंची सभा होणार होती. १२ नोव्हेंबरला भाजपाचीही सभा झाली नाही. १४ नोव्हेंबरला अजित पवार गटाला मैदानात सभा घेण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे याच दिवशी महायुतीची एकत्रित सभा होण्याची शक्यता आहे.

सभा आणि विविध कार्यक्रमांसाठी शिवाजी पार्क ४५ दिवस आरक्षित असते. उद्धव ठाकरे गटाने अर्ज करण्यापूर्वीच मनसेने अर्ज केला होता. त्यामुळे प्रथम येणाऱ्या प्राधान्य या धर्तीवर मनसेला या मैदानावर सभा घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिवाजी पार्क मैदानावरील राजकीय सभा या कायम चर्चेचा केंद्रबिंदू राहिल्या आहेत. मुंबईतील ३६ मतदारसंघातील माहीम, वरळी, शिवडी, भांडुप यासह विविध मतदारसंघांतील प्रमुख लढतीकडे सगळ्यांचे लक्ष लागून आहे. (वृत्तसंस्था)

# उद्धव ठाकरे अन् मी एकत्र न येण्यासाठी प्रयत्न

### राज ठाकरेंचे खळबळजनक वक्तव्य

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**

मी आणि उद्धव एकत्र येऊ नये, यासाठी अनेक लोक प्रयत्न करीत आहेत. त्यामध्ये आतले आणि बाहेरचे अशा सगळ्यांचा समावेश आहे, असे वक्तव्य मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी केले. राज ठाकरे यांच्या या वक्तव्याने महाराष्ट्रातील राजकारणाला पुन्हा नवे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत यासंदर्भात भाष्य केले. तुम्ही उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकत्र येणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर राज ठाकरे यांनी उत्कंठा वाढवणारी अनेक वक्तव्ये केली. मी माझ्याकडून 'अलर्ट' असतो. अनेक गोष्टी माझ्या कानावर येत असतात. हा असे बोलला... तो तसे म्हणाला... अशा गोष्टी मला कळतात. पण, असल्या गोष्टी मी ऐकत नाही. उद्धव ठाकरे आणि मी एकत्र यायला पाहिजे, असे वाटणे वेगळे आहे. असे व्हायचे असते, तर ते कधीच झाले असते. समोरून त्यांच्याकडून काही लोक बोलत असतात, सांगत असतात, पण मी काय करणार, असे राज ठाकरे यांनी म्हटले.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकत्र येणे हा माझ्या इच्छेचा विषयच नाही. प्रश्न असा आहे की, यात चर्चा होणे गरजेचे आहे. चर्चा जर होतच नसेल, तर त्या बोलण्याला काय अर्थ आहे. उद्धव ठाकरे यांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस जवळची वाटते, असे राज ठाकरे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### भाजपासोबत 'कम्फर्टेबल'

मनसेच्या पाठिंब्यावर भाजपाचा मुख्यमंत्री होणार, असे विधानही राज ठाकरेंनी केले होते. त्यासंदर्भात ते म्हणाले, सध्याचे वातावरण तसे आहे, ज्यामुळे राज्यात महायुतीचे सरकार हे आमच्या पाठिंब्याशिवाय स्थापन होऊ शकणार नाही. जर विषय भाजपाचा असेल तर, मी जेव्हा शिवसेनेत होतो तेव्हापासून आणि माझा पक्ष काढल्यानंतरही माझे चांगले संबंध भाजपासोबत चांगले राहिले. प्रमोद महाजन, गोपीनाथराव, नितीनजी या सर्वच नेत्यांसोबत माझे सुरुवातीपासून संबंध आले. त्यामुळे, आपल्यासाठी एक कम्फर्ट झोन असतो, मला वाटते भाजपासोबत मी पहिल्यापासून कम्फर्टेबल आहे, ज्यांसोबत मी चर्चा करू शकतो.

# स्थिर पथकाला हेलिकॉप्टर-विमान तपासणीचा अधिकार

### आचारसंहिता नियमावली काय सांगते?

◆ **मुंबई, १४ नोव्हेंबर**

सध्या निवडणुकीतील प्रचाराच्या रणधुमाळीत नेत्यांच्या बॅगा तपासण्याचा मुद्दा जोर धरत आहे. विरोधी पक्षातील नेत्यांना आमच्याच बॅगा तपासल्या का जात आहेत, असा प्रश्न पडत असून दुसरीकडे सत्तापक्षातील नेत्यांच्याही बॅगा तपासल्या जात आहेत.

निवडणूक काळासाठी लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेमध्ये मतदारांना राजकीय पक्षांनी अथवा उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखवू नये, अशी तरतूद आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अंलबजावणी यंत्रणा आणि प्रत्येक विधानसभा मतदार संघामध्ये स्थिर सर्वेक्षण पथके (एसएसटी) व भरारी सर्वेक्षण पथके (एफएसटी) यांची नेमणूक केलेली असते. दरम्यान, निवडणूक आयोगाने याबाबत पत्रक प्रसिद्धी करून माहिती दिली आहे.



### स्टार प्रचारकांच्या हेलिकॉप्टर्स व विमानाची तपासणी

महाराष्ट्रात निवडणुकीसाठी अशी एकूण सहा हजार पथके तैनात असून १९ अंमलबजावणी यंत्रणा कार्यरत आहेत. स्थिर सर्वेक्षण पथके व भरारी सर्वेक्षण पथकांना यांना प्रत्येकच वाहन तपासून संशयास्पद काही आढळले, तर पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आहेत. निवडणूक काळात विविध पक्षांचे मान्यवर नेते व स्टार प्रचारक हवाई दौरे करतात. त्यांच्या हेलिकॉप्टर्स अथवा विमानाची देखील तपासणी केली जाते. अशा प्रकारे सर्वच नागरिकांच्या वाहनांची तपासणी केली जाते व त्यामध्ये राजकीय पक्ष किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अपवाद केला जात नाही.

### स्थिर सर्वेक्षण पथकात कोण?

स्थिर सर्वेक्षण पथक ज्या ठिकाणी नेमलेले असते तेथून जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी होते. पथकामध्ये एका पोलिस कॉन्स्टेबलसह महसूल व अन्य विभागाच्या समावेश असतो. अशी तपासणी करताना संशयास्पद काही आढळले नाही, तर नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. संशयास्पदरीत्या आढळून आलेला पैसा, दारू, मौल्यवान धातू आणि इतर वस्तू जप्त करून नियमाप्रमाणे कारवाई केली जाते. सर्वच नागरिकांनी याबाबत सहकार्य करून निष्पक्ष व चांगल्या वातावरणात निवडणुका पार पाडण्यामध्ये सहभागी होणे आवश्यक असते. (वृत्तसंस्था)



केरळातील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीदरम्यान काँग्रेसच्या नेत्या प्रियांका वढेरा यांनी बुधवारी मतदान केंद्राला भेट दिली